नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष १६ * अंक ३०५ * * भंडारा * | गुरुवार, दिनांक १ मे २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त




## पाकने रिकाम्या केल्या सीमेवरील चौक्या

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३० :**

पहलगाम हल्ल्याच्या ८ दिवसांनंतर बुधवारी, पाकिस्तानी सैन्याने आंतरराष्ट्रीय सीमेवरील अनेक चौक्या रिकाम्या केल्या. पाकिस्तानी सैन्याने या चौक्यांवरील झेंडेही काढून टाकले आहेत. कठुआच्या परगल भागातील चौक्या रिक्त करण्यात आल्या आहेत.

पाकिस्तानी सैन्य नियंत्रण रेषेवर सतत शस्त्रसंधीचे उल्लंघन करत आहे. बुधवारी, पहिल्यांदाच पाकिस्तानी सैन्याने आंतरराष्ट्रीय सीमेवर युद्धबंदीचे उल्लंघन केले. ज्याला भारतीय सैन्याने लगेच प्रत्युत्तर दिले. भारत आणि पाकिस्तानच्या लष्करी ऑपरेशन्स महासंचालकांनी हॉटलाइनवरून संवाद साधला आणि युद्धबंदी उल्लंघनांवर चर्चा केली.

# जात जनगणना होणार!

## बिहार निवडणुकीपूर्वी केंद्राचा निर्णय : सप्टेंबरपासून सुरू होण्याचे संकेत : वर्षभरानंतर येईल आकडेवारी

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३०:**

देशात जातीय जनगणना केली जाईल. केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी जातीय जनगणनेला मान्यता दिली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, ते मूळ जनगणनेसोबतच केले जाईल.

काँग्रेससह सर्व विरोधी पक्ष जातीय जनगणनेची मागणी करत आहेत. अशा परिस्थितीत सप्टेंबरमध्ये जात जनगणना सुरू होऊ शकते, असा अंदाज वर्तवला जात आहे. तथापि, जनगणना प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी एक वर्ष लागेल. अशा परिस्थितीत, जनगणनेचे अंतिम आकडे २०२६ च्या अखेरीस किंवा २०२७ च्या सुरुवातीला उपलब्ध होतील.

देशातील शेवटची जनगणना २०११ मध्ये झाली होती. ती दर १० वर्षांनी केली जाते. त्यानुसार, पुढील जनगणना २०२१ मध्ये होणार होती, परंतु कोविड-१९ साथीच्या आजारामुळे ती पुढे ढकलण्यात आली.

२०११ पर्यंत, जनगणनेच्या फॉर्ममध्ये एकूण २९ स्तंभ होते. यामध्ये, फक्त अनुसूचित जाती आणि जमाती प्रवर्गातील व्यक्तींची नोंद करण्यात आली आणि त्याचबरोबर नाव, पत्ता, व्यवसाय, शिक्षण, रोजगार आणि स्थलांतर यासारखे प्रश्नही नोंदवण्यात आले. आता जात जनगणनेसाठी त्यात अतिरिक्त स्तंभ जोडले जाऊ शकतात.

१९४८ च्या जनगणना कायद्यात एससी-एसटीची गणना करण्याची तरतूद आहे. ओबीसी गणनेसाठी यामध्ये सुधारणा करावी लागेल. यामुळे २,६५० ओबीसी जातींचा डेटा उघड होईल. २०११ च्या जनगणनेनुसार, मार्च २०२३ पर्यंत १,२७० अनुसूचित जाती आणि ७४८ अनुसूचित जमाती आहेत. २०११ मध्ये अनुसूचित जातींची लोकसंख्या १६.६% आणि अनुसूचित जमातीची ८.६% होती.

**जातीय जनगणनेवर विरोधकांची भूमिका**

**विरोधी पक्ष :** बीजेडी, सपा, राजद, बसपा, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारसह देशात जातीय जनगणनेची मागणी करत आहेत. टीएमसीची भूमिका अद्याप स्पष्ट नाही. राहुल गांधी अलिकडेच अमेरिकेला भेट देऊन आले होते, जिथे त्यांनी म्हटले होते की जातीय जनगणना योग्य आहे.

**एनडीए :** पूर्वी भाजप जातीय जनगणनेच्या बाजूने नव्हता. एनडीएने काँग्रेससह इतर विरोधी पक्षांवर जातीय जनगणनेद्वारे देशाचे विभाजन करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला होता. तथापि, बिहारमध्ये भाजपनेच जातीय जनगणनेला पाठिंबा दिला. बिहारने ऑक्टोबर २०२३ मध्ये जातीय जनगणनेचा डेटा प्रसिद्ध केला होता.

देशाच्या हितासाठी एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्वसमावेशक विकासासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. ● **चिराग पासवान**

आम्हाला जातीयवादी म्हणणाऱ्यांना योग्य उत्तर मिळाले आहे. ● **लालू यादव**

ही काँग्रेसच्या तोंडावर एक कडक चपराक आहे. काँग्रेस फक्त म्हणते, मोदी सरकार ते करते. काँग्रेस पक्ष फक्त ढोंग करत होते. ● **केशव मौर्य**

हा आमचा विजय आहे. सरकारला मुद्दा मान्य करावा लागला. ● **तेजस्वी यादव**

हा काँग्रेसचा विजय आहे. आमची सुरूवातीपासूनची मागणी होती. शेवटी मोदी सरकारला जातीय जनगणना करावीच लागतेय. ● **काँग्रेस नेते उदित राज**

जात जनगणनेचा निर्णय हे दर्शवितो की सरकार देश आणि समाजाच्या विकासासाठी वचनबद्ध आहे. ● **केंद्रीय मंत्री नित्यानंद राय**

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## जनगणनेचा मतितार्थ

अखेर जनगणनेचे गंगेत घोडे न्हाले. आपल्या सरकारला विरोधी पक्षाच्या हातातील हुकमाचा एक्का आपल्याकडे कसा घेता येईल. याचे कौशल्य कसे आत्मसात आहे. हे आम्ही सांगण्याची गरजच नाही. गेल्या काही वर्षांपासून राहुल गांधी यांच्यासह छोट्या अनेक गांद्या ते मोठ्या अनेक गांद्यां पर्यंत जनगणनेचा मुद्दा चांगलाच प्रभावी ठरत होता, असे दिसून आले. मागे लोकसभेच्या निवडणुकीत राहुल गांधी यांनी हातात संविधान घेऊन जनगणनेचा मुद्दा तेव्हा चांगलाच उचलून धरला होता. आता सरकारने जनगणना करायचीच आहे. असे सांगून तो मुद्दा आपल्या हाती घेतलेला आहे. 2001 साली तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी जनगणनेचा मुद्दा 25 वषार्साठी स्थगित केलेला होता. ही जनगणना झाल्यावर किंवा त्यानंतर जी धोकादायक परिस्थिती निर्माण होणार आहे. ती वेळ आपल्या देशासमोर अनेक प्रश्न घेऊन उभी राहणार आहे. त्यातील महत्त्वाचा मुद्दा असा की, या आधीची जनगणना झाल्यावर देशात मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या वाढली. हे लोकसंख्येच्या वाढीचे प्रमाण उत्तर भारत, पूर्व भारत, मध्य भारत आणि दक्षिण भारत यांच्यासह वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे समस्यांचे डोंगर घेऊन उभे आहे. दक्षिण भारतातील पाच राज्ये विचारात घेतली. तर जनगणनेत त्यांची संख्या माफक प्रमाणात वाढलेली आहे. मग उत्तर भारतासह बिहारचा, किंबहुना फक्त उत्तर प्रदेशचा विचार केला. तर त्या राज्यातील लोकसंख्या वाढीचा दर दक्षिण भारतापेक्षा जवळ जवळ 40 टक्के जास्त आहे. जनगणना झाल्यावर त्यात जातीय मुद्दा महत्त्वाचा ठरणार आहे आणि त्यातून पोट जातींचा मुद्दा तर अनेक प्रश्न घेऊन उभा राहील. तो तर अजून वेगळाच विषय आहे. पण लोकसभेच्या मतदारसंघांची पुनर्रचना करताना दक्षिण भारताला मोठाच फटका बसणार आहे. त्याचे कारण दक्षिण भारतातील पाच राज्यांनी कुटुंब नियोजनावर जास्त भर दिला. त्यामुळे त्यांची लोकसंख्या हवी त्या प्रमाणात वाढली नाही. उत्तर भारतात 'हरसाल कॅलेंडर छाप दिया, परिवार नियोजन को साफ किया' या मनोज कुमारच्या एका चित्रपटातील गीताप्रमाणे परिवार नियोजन 'परिवार अनियोजना' पर्यंत जाऊन पोहोचलेले आहे. यामुळेच उत्तर प्रदेश हा सरकार स्थापन करण्यासाठी नेहमीच अग्रेसर असतो. हे दिसून आलेले आहे. आताच्या लोकसंख्येचा तुलनात्मक अभ्यास केला. तर जनगणना झाल्यावर या दक्षिण भारतातील पाच राज्यांच्या एवढे खासदार एकट्या उत्तर प्रदेशात तयार होऊ शकतात. अशीच परिस्थिती वाढलेल्या लोकसंख्येमुळे उद्भवणार आहे. ज्यांनी देशाचा विचार करून परिवार नियोजनाचा आदर्श स्वतः समोर ठेवला आहे. त्यांनी आपली लोकसंख्या वाढवली नाही. याचा त्यांच्या सत्ता कारणावर परिणाम होऊन द्यायचा नसेल. तर उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांच्यातील असमान वाढलेल्या लोकसंख्येला वेगवेगळे निकष लावावे लागतील. म्हणजेच सध्या ज्या ज्या राज्यात जेवढे जेवढे मतदारसंघ असतील. त्यात वाढ करताना लोकसंख्येचे निकष विचारात घेतल्यावरही वाढलेले मतदार संघ सर्व देशात सध्याच्या मतदारसंघाच्या तुलनेत विशिष्ट टक्केवारीनेच ते वाढले पाहिजेत. हे सुद्धा पहावे लागेल. याचा सरळ अर्थ असा आहे की, उत्तर प्रदेशच्या लोकसभा मतदारसंघात वीस लाख मतदार असतील. तर दक्षिण भारतातील लोकसभेच्या मतदार संघात दहा ते बारा लाख मतदारांचाच मतदार संघ असेल. महाराष्ट्रात तोच मतदारसंघ दक्षिण भारतापेक्षा थोडा मोठ्या लोकसंख्येचा आणि उत्तर भारतापेक्षा थोड्या छोट्या लोकसंख्येचा ठेवावा लागेल. घटनेत नमूद केल्याप्रमाणे हे करता येणे शक्य नाही. आधीच उत्तर विरुद्ध दक्षिण असा मोठा वाद नेहमी चर्चिला गेला आहे. अशावेळी दक्षिण भारत म्हणणार की आम्ही देशहितास्तव लोकसंख्या वाढीला आळा घातला. ती आमची चूक झाली काय, याचे उत्तर सत्तेवर कोणीही असला तरी तो देऊ शकणार नाही. म्हणजे इकडे आड आणि तिकडे विहीर अशी परिस्थिती निर्माण होणार आहे. जाती जातींमधील उपजातींचा प्रश्न सुद्धा महत्त्वाचा आणि कळीचा मुद्दा ठरणार आहे. या सगळ्या प्रश्नांच्या उत्तरा दाखल कविवर्य सुरेश भट यांनी म्हटल्याप्रमाणे,

*'एक साधा प्रश्न माझा लाख येती उत्तरे,*
*हे खरे की ते खरे की ते खरे की ते खरे'*

अशा प्रकारचा घोळ निर्माण होणार आहे. सरकारने आतापर्यंत या बाबत मौन धारण केले होते. पण विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी जनगणनेचा मुद्दा चुलीवरील तव्याप्रमाणे तापवून ठेवलेला आहे. आता हा तापलेला तवा कोणाकोणाला हवा आहे आणि कोणा कणाला नको आहे. हे सुद्धा लवकरच दिसून येणार आहे. जनगणना आता लवकरच होईल. पण ही जनगणना 'सर्वजनहिताय' कशी होईल. याचे कोष्टक तयार करताना केवळ सरकारचीच नाही. तर विरोधी पक्षांचीही चांगलीच भंबेरी उडणार आहे. ते काहीही असो. सरकारने विरोधी पक्षाच्या हातातील कोलीताला पेट्रोल पुरवून तेच कोलीत अजून कसे जळत राहील. याची तरतूद केलेली दिसत आहे. आता जनगणना होणारच आहे. तेव्हा भारतातील जनतेने त्याचा मुकाबला करण्यासाठी तयार राहिले पाहिजे. जनाजनांची गणना करताना हीच जनगणना देशात अनेक प्रश्नांची निर्मिती करणार आहे. एवढाच या जनगणनेचा मतितार्थ आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023



## हॉटेलमध्ये आग
## १४ जणांचा होरपळून मृत्यू

■ **वृत्तसंस्था कोलकाता, दि. ३०:**

मंगळवारी रात्री उशिरा कोलकात्यातील फलपट्टी मासेमारी क्षेत्रातील एका हॉटेलमध्ये लागलेल्या आगीत १४ जणांचा मृत्यू झाला. २२ जणांना वाचवण्यात आले.

रात्री ऋतुराज हॉटेलमध्ये आग लागली. माहिती मिळताच अग्निशमन दल आणि पोलिसांच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मदत आणि बचाव कार्य सुरू केले. आतापर्यंत १४ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. अपघाताच्या चौकशीसाठी एक विशेष पथक तयार करण्यात आले आहे. हॉटेलच्या चौथ्या मजल्यावर बसवलेल्या वीज मीटरमध्ये शॉर्ट सर्किट झाल्यामुळे आग लागली.

### सुटीची सूचना

**महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनानिमित्त गुरूवार दि. १ मे २०२५ रोजी महासागर कार्यालयास सुटी असल्याने शुक्रवार दि. २ मे २०२५ चा अंक प्रकाशित होणार नाही.**

**सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

■ **व्यवस्थापक**

## मंदिराची भिंत कोसळली ८ जण ठार

### ४ जण गंभीर जखमी

■ **वृत्तसंस्था, विशाखापट्टणम, दि. ३०:**

आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे मंगळवारी रात्री श्री वराह लक्ष्मी नृसिंह स्वामी मंदिराच्या भिंतीचा २० फूट लांबीचा भाग कोसळला. वरिष्ठ अधिकारी विनय चान यांच्या मते, या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला आणि ४ जण जखमी झाले.

मंदिरात चंदनोत्सव चालू होता. तो दरवर्षी साजरा केला जातो. भगवान नृसिंहाचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक येथे येतात. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, रात्री उशिरा २:३० ते ३:०० वाजेच्या दरम्यान मुसळधार पावसामुळे हा अपघात झाला. जिल्हाधिकारी हरेंद्र प्रसाद म्हणाले की, एनडीआरएफ आणि एसडीआरएफने बचावकार्य पूर्ण केले आहे.

राज्याच्या गृह आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री वंगालपुडी अनिता यांनीही तात्काळ घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचा आढावा घेतला. जखमींवर उपचार, मदत आणि बचाव कार्यात कोणतीही हलगर्जीपणा करू नये, असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. घटनेची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## पहलगाम हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या शुभमच्या कुटुंबाचे राहुलकडून सांत्वन



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३०:**

पहलगाम हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या कानपूर येथील शुभम द्विवेदी यांच्या कुटुंबियांची राहुल गांधींनी भेट घेतली. राहुलला पाहून शुभम यांची पत्नी ऐशन्या रडू लागली. यावेळी राहुल यांनी त्यांचे सांत्वन केले.

राहुल गांधी म्हणाले, ज्यांनी हे केले आहे, ते कुठेही असले तरी त्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतील.' संपूर्ण विरोधी पक्ष सरकारला १००% पाठिंबा देतो. नरेंद्र मोदींना कारवाई करावी लागेल आणि तीही कडक.






## शेतकऱ्यांना शिक्षा का? रोहिणी खडसे यांचा हल्लाबोल



■ **मुंबई :** सरकारने सुरू केलेली एक रुपयात पिकविमा योजना बंद करण्याच्या निर्णयावरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा अ‍ॅड. रोहिणी खडसे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. या योजनेच्या बंदमागील कारणे आणि सरकारच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्यांनी योजना पुन्हा सुरू करण्याची मागणी केली आहे.

सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टमध्ये रोहिणी खडसे म्हणाल्या, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सरकारने एक रुपयात पिकविमा योजना सुरू केली होती. आता निवडणुका संपल्यानंतर ही योजना बंद करण्यात आली आहे. जर योजनेत गैरव्यवहार झाले असतील, तर ती सरकारची चूक आहे. मग त्याची शिक्षा आमच्या शेतकऱ्यांना का दिली जात आहे? असा थेट सवाल त्यांनी सरकारला विचारला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वक्तव्याचा समाचार घेताना त्या पुढे म्हणाल्या, सरकारमधील लोक म्हणतात की शेतकऱ्यांनी आम्हाला चुना लावला. पण खरे तर, ही योजना सुरू करून त्याचा फायदा शेतकऱ्यांना न देता काही पिकविमा कंपन्यांना आणि आपल्या जवळच्या मित्रांना देऊन सरकारनेच शेतकऱ्यांना फसवले आहे. शेतकऱ्यांना बदनाम करण्याऐवजी सरकारने पारदर्शकता दाखवावी, असेही त्या म्हणाल्या.

रोहिणी खडसे यांनी सरकारला काही कठोर प्रश्न विचारले आहेत. ₹मागील दीड वर्षांत कोणत्या कंपन्यांचे आणि कोणत्या जवळच्या लोकांचे खिसे भरले गेले? याचे उत्तर सरकारने द्यावे. तसेच, शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची असलेली ही योजना तातडीने पुन्हा सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. या योजनेच्या बंदमुळे शेतकरी वर्गात नाराजी पसरली असून, रोहिणी खडसे यांच्या या मागणीला शेतकऱ्यांचा पाठिंबा मिळत आहे.

## तोपर्यंत शांत बसणार नाही... संजय राऊत यांचा इशारा



■ **मुंबई :** राज्यातील दहा हजार शेतकऱ्यांच्या नावावर बोगस कर्ज आणि कर्जमाफीचा प्रकार समोर आला असून तीन वर्षांपूर्वी आम्ही हा विषय मांडला होता. त्यावेळी माझे डोके ठिकाणावर नसल्याचे त्यांनी म्हटले होते. मात्र आता सुप्रीम कोर्टाचं देखील डोके ठिकाणावर नाही? असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतील का? असा प्रश्न उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला.

2004 ते 2006 या गळित हंगामात सभासद शेतकऱ्यांच्या नावाने बेसल डोस साठी कर्ज काढून रकमेचा अफरातफर करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. कर्जमाफी योजनेस पात्र नसतानाही कर्जमाफी प्राप्त करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी बाळासाहेब केरू विखे (या. लोणी, बु.) यांनी पद्मश्री डॉक्टर विठ्ठलराव पाटील सहकारी साखर कारखान्याचे तत्कालीन चेअरमन संचालक तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह 54 जणांविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणी संशयित पदाधिकारी व अधिकाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणावरून राऊत यांनी विखे पाटील आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली.

विखे पाटील यांना नैतिकतेच्या आधारावर मंत्रिमंडळातून काढून टाकावे, अशी मागणी देखील आता संजय राऊत यांनी केली आहे. असे मंत्री जर राज्य सरकारमध्ये असतील तर स्वच्छ कारभार, पारदर्शक कारभार या विषयावर मुख्यमंत्र्यांनी आता विरोधी पक्षांना सल्ले देऊ नये, असे देखील राऊत यांनी म्हटले आहे.

विखे पाटील यांच्या राजीनामा घेतला नाही तर या राज्यात मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पूर्ण अभय असल्याचे स्पष्ट होईल, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे. दहा हजार शेतकऱ्यांच्या नावे भ्रष्टाचार करण्यात आला. हे कोणी केले? तर सहकार सम्राटाने केले. याबाबत गुन्हा देखील त्यांच्याच लोणी गावात झाला आहे. हा विषय मी लावून धरणार असल्याचा इशारा राऊत यांनी दिला आहे.

## शेतकरी आत्महत्या मदतीची प्रलंबित प्रकरणे एका महिन्यात मार्गी लावा : मंत्री पाटील

■ **मुंबई :** शेतकरी आत्महत्या प्रकरणातील मदत वेळेत मृत शेतक?्याच्या वारसांना मिळणे आवश्यक आहे. यासाठी प्रलंबित प्रकरणांना प्राधान्य देऊन ती एका महिन्यात मार्गी लावावीत, असे स्पष्ट निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले.

मंत्रालयात आयोजित शेतकरी आत्महत्या मदत प्रकरणांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला सहसचिव कैलास गायकवाड, अवर सचिव सुनील सामंत उपस्थित होते, तर नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर विभागीय आयुक्त दृकश्राव्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

मंत्री जाधव-पाटील यांनी सन २०२३ आणि २०२४ मधील शेतकरी आत्महत्या मदत प्रकरणांचा सविस्तर आढावा घेतला आणि ही प्रकरणे तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या. त्यांनी सांगितले की, तालुकास्तरीय समितीने संबंधित यंत्रणांकडून आवश्यक अहवाल त्वरित प्राप्त करावेत. तसेच, जिल्हास्तरावर प्रलंबित प्रकरणांचा नियमित आढावा घेऊन त्यांचे प्राधान्याने निराकरण करावे. विभागीय आयुक्तांनीही या प्रकरणांचा सातत्याने आढावा घ्यावा, असे त्यांनी निर्देशित केले. शेतकरी आत्महत्या मदतीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही मंत्री जाधव-पाटील यांनी दिली.

# शिक्षक भरतीसाठी मंत्रालयात घुसून आंदोलन

## थेट मुख्यमंत्री कार्यालयाबाहेर घोषणाबाजी : आश्वासनानंतर आंदोलन मागे

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३० :**

राज्यातील जिल्हा परिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरण्याच्या मागणीसाठी शेकडो उमेदवार मंत्रालयात घुसले.

थेट मुख्यमंत्र्यांच्या सहाव्या मजल्यावर धडक देत घोषणाबाजी केल्याने सुरक्षा रक्षकांची तारांबळ उडाली. अखेर मंत्री नितेश राणे आणि मंत्री शंभूराज देसाई यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.



राज्यातील दुसऱ्या टप्प्याचया शिक्षक पद भरतीसाठी जिल्हा परिषद अस्थापना पोर्टलवरील पद भरतीस जागा मिळत नसल्याने शासनाच्या विरोधात दोनशे ते अडीचशे शिक्षक उमेदवारांनी मंत्रालयात घुसून आंदोलन केले. यावेळी आंदोलन कर्त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहाव्या मजल्यावरील कार्यालयाकडे धाव घेतली.

**या आहेत मागण्या**

पहिल्या टप्प्यात कपात झालेल्या जिल्हा परिषदेच्या १० टक्के तसेच रिक्त अपात्र व गैरहजर जागा तातडीने पवित्र पोर्टलवर उपलब्ध करून देण्यास जिल्हा परिषद यांना निर्देश देऊन शिक्षक भरती प्रक्रियेला गती आतातरी द्यावी.

आदिवासीबहुल पेसा क्षेत्रातील नॉन पेसा क्षेत्राच्या बिंदू नामावली बाबत नवीन आरक्षण एसईबीसी च्या संदर्भात शासनाने तातडीने निर्णय जारी करावा. वारंवार परीक्षा घेऊन बेरोजगारांना लुटणे सुरू आहे.

२०२२ मध्ये २१ हजार ६०० पदांसाठी जाहीरात काढली. त्यावेळी २ लाख ४३ हजार ४१३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. ११ हजार पदांची भरती प्रक्रिया करण्यात आली.

४९ हजार पदांची भरती करण्याचे आश्वासन ग्रामविकास मंत्री आणि शिक्षक मंत्र्यांनी देऊनही करण्यात आली नाही. पहिल्या भरतीच्या जागा असूनही ती बंद करून आता दुसऱ्या टप्प्यातील भरती केली जात असल्याचा आरोप मंत्रालयासमोर जमलेल्या अनेक उमेदवारांनी केला आहे.

# फ्री हँड दिला हे बोलणे चुकीचे



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३० :**

जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाला यात प्रामुख्याने हिंदू कुटुंबीयांना टार्गेट करण्यात आले. या हल्ल्यावरून विरोधकांनी सरकारवर हल्लाबोल केला आहे. यावर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आवाज उठवला आहे.

भारताचे राष्ट्रपती हे भारतीय सशस्त्र दलांचे सर्वोच्च कमांडर असतात, पंतप्रधान नसतात. म्हणून, पंतप्रधानांनी मोकळीक दिली आहे असे म्हणणे चुकीचे आहे. त्यांना ते करण्याचा अधिकार नाही. राष्ट्रपतींना लष्करी कारवाईची शिफारस करणे हे मंत्रिमंडळाचे काम आहे. पंतप्रधान एकटे हा निर्णय घेऊ शकत नाहीत.

दुसरे असे की, ही मुक्त संधी म्हणजे मोदींनी स्वतःला जबाबदारीतून मुक्त करण्याचे काम केले आहे. भारतीय सैन्य आपले काम खूप चांगले करते आणि ते कधीही पंतप्रधानांवर अवलंबून राहिलेले नाही. लष्करी निर्णय हे राष्ट्रपती, पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ यांच्यातील सहयोगी प्रक्रियेचा परिणाम असतात.

मंत्रिमंडळ आणि विरोधी पक्षाच्या अनुपस्थितीत ही बैठक झाली याचे मला आश्चर्य वाटते. मोदी राष्ट्रपती का होत आहेत? जसे पाणी थांबवले हा वाक्यांश होता, तसेच हे देखील मुक्त हात आहे. उद्या जर भारताने पाकिस्तानविरुद्ध लष्करी कारवाई केली तर त्याचे श्रेय फक्त आणि फक्त भारतीय सशस्त्र दलांनाच गेलं पाहिजे, असे विधान प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे.

दरम्यान, सध्या देशात हिंदू विरुद्ध मुस्लिम असे वातावरण निर्माण झाले. त्याला पार्श्वभूमी म्हणजे पहलगाम येथे जो हल्ला झाला त्यात दहशतवाद्यांनी नाव आणि धर्म विचारून हत्या केली. यामुळे देशात हिंदू विरुद्ध मुस्लिम असे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे महाराष्ट्राच्या देखील राजकारणात बदल झाले आहेत.

## पालकमंत्रिपदावरून राजकीय संघर्ष तीव्र

### ध्वजवंदनावरून नवा वाद

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**

रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावरून राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे. शिवसेना (शिंदे गट) चे मंत्री भरत गोगावले आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या मंत्री आदिती तटकरे यांच्यात गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या वादात महाराष्ट्र दिनी ध्वजवंदन कार्यक्रमाने नव्याने पेट घेतला आहे.

राज्य शासनाच्या अधिकृत परिपत्रकानुसार रायगड जिल्ह्यातील ध्वजवंदन सोहळा आदिती तटकरे यांच्या हस्ते होणार आहे. या घोषणेनंतर गोगावले यांना पालकमंत्रिपदाच्या शर्यतीतून मागे टाकल्याची चर्चा रंगली असून, यामुळे त्यांच्यात नाराजी निर्माण झाली आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, ह्ध्वजवंदनाचा अधिकार म्हणजे पालकमंत्रिपद नव्हे. मी रायगडचा मावळा आहे; तलवार म्यान केलेली नाही.

रायगडचे पालकमंत्री आपणच होणार असल्याचे भरत गोगावले यांनी अनेक वेळा जाहीर केले होते. मात्र अद्याप त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा न झाल्याने त्यांच्या भूमिकेला सुरुंग लागल्याचे चित्र आहे. दुसरीकडे, आदिती तटकरे यांना झेंडावंदनाची जबाबदारी देऊन सरकारने एकप्रकारे त्यांच्याच पारड्यात वजन टाकल्याचे संकेत दिले आहेत, असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील युती सरकारमध्ये जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदाच्या वाटपावरून अनेक नेते नाराज आहेत. यामध्ये भरत गोगावले यांचा समावेश असून, त्यांच्या सारख्या स्थानिक प्रभावशाली नेत्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होतो आहे.

महाराष्ट्र दिनी राज्यभरात होणाऱ्या झेंडावंदन कार्यक्रमासाठी मंत्र्यांची यादी प्रसिद्ध झाली असून, ठाण्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पुण्यात अजित पवार, नागपूरमध्ये बावनकुळे, मुंबईत मंगलप्रभात लोढा, नाशिकमध्ये गिरीश महाजन अशा प्रमुख नेत्यांना जबाबदारी देण्यात आली आहे. रायगडसाठी आदिती तटकरे यांचं नाव आल्यानेच हा वाद उफाळला.

राजकीय निरीक्षकांच्या मते, ध्वजवंदन ही एक प्रतीकात्मक परंतु महत्त्वाची जबाबदारी असते आणि कोणत्याही मंत्र्याला ही जबाबदारी देणे, हा त्या जिल्ह्याच्या नेतृत्वासाठीचा संकेत मानला जातो. त्यामुळे गोगावले यांची नाराजी समजण्यासारखी असून, हे केवळ प्रशासकीय नियोजन नव्हे तर राजकीय डावपेचही असू शकतो.

## ग्रंथालयांच्या डिजिटलायझेशनसाठी निधीची कमतरता नाही : पाटील



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ३० :**

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ग्रंथालयांना अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी, शासन प्रयत्न करीत असून या निधीच्या माध्यमातून ग्रंथालये अद्यावत करण्यात येणार आहे तसेच राज्यातील शासकीय व सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्व अडचणी सोडण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी केले.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय शासकीय विभागीय ग्रंथालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने श्री संत गाडगे महाराज अकुल धर्मशाळा सोमवार पेठ येथे आयोजित राजा राम मोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकत्ता यांच्या अर्थसाहयाच्या विविध योजना विषयी माहिती देण्यासाठी दोन दिवशीय विभागस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी पाटील बोलत होते. कार्यक्रमाला संचालक उच्च शिक्षण शैलेंद्र देवळाणकर राजा राम मोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कोलकत्ताचे महासंचालक प्रा. अजय प्रतापसिंह, प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष गजानन कोटेवार, प्रमुख कार्यवाहक सोपानराव पवार, कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील, विभागीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष विजय कोलते, ग्रंथमित्र रमेश सुतार उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले, समाज माध्यमांच्या युगात वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी शासन विविध उपक्रम राबवत असून शासकीय व खाजगी ग्रंथालयांचे डिजिटलायझेशन करून वाचकांना ऑनलाइन पुस्तके उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करावेत यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

## जरांगे हा येडपट, खुळचट

### लक्ष्मण हाके यांनी वापरले अपशब्द



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३० :**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हा अतिशय येडपट, खुळचट व बावळट माणूस आहे. ते ज्या दिवशी मुंबईत उपोषणाला बसतील त्याच दिवशी आम्ही माळेगावच्या खंडोबाला नारळ फोडून मुंबईच्या दिशेने लाँग मार्च करू, अशा शब्दांत ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी बुधवारी मनोज जरांगे पाटील यांच्यावर निशाणा साधला आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी 29 ऑगस्टपासून मुंबईत उपोषणाला बसण्याची घोषणा केली आहे. सरकारने यापूर्वी मराठा समाजाच्या मागण्या मान्य केल्या नाही, तर त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा त्यांनी दिला आहे. त्यांच्या या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर लक्ष्मण हाके यांनी जरांगे यांच्यावर उपरोक्त टीका केली आहे. मनोज जरांगे ज्या दिवशी उपोषणाला बसतील त्याच दिवशी महाराष्ट्रातील ओबीसी समाज मुंबईकडे कूच करेल. आम्ही माळेगावच्या खंडोबाला नारळ फोडून मुंबईच्या दिशेने लाँग मार्चला सुरुवात करू, असे ते म्हणाले.

मनोज जरांगे हा अतिशय येडपट, खुळचट व बावळट माणूस आहे. सरकारने त्यांना फार महत्त्व न देता आमच्याकडे लक्ष दिले पाहिजे. सत्तेची झूल बाजूला सारून ज्या माणसांनी तुम्हाला निवडून दिले, त्यांचा प्रश्न सभागृहात मांडला पाहिजे. शिंदे समितीची माहिती पूर्ण आली आहे. हे खरे असेल तर महाराष्ट्रातील ओबीसी आरक्षण संपल्यात जमा आहे. ही माहिती मी महाराष्ट्रातील ओबीसी नेत्यांना देत आहे. एक-दोन नव्हे तर तब्बल 8 लाख कुणबी प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेत. यामुळे ज्या ओबीसी जाती आजही अलिप्त आहेत, त्या आता राजकीय व्यवस्थेत दिसणार नाहीत. असे असेल तर ओबीसी आरक्षण कसे वाचेल? हे मुख्यमंत्री आम्हाला सांगावे. दोन कोटी मराठे ओबीसी झालेत. ओबीसींची घटनात्मक चौकट ओलांडली गेली आहे. फडणवीसांनी याचे उत्तर दिले पाहिजे, असे लक्ष्मण हाके म्हणाले.

## आयसीएसई, आयएससी बोर्डाचे निकाल जाहीर

■ **मुंबई, दि. ३० :**

भारतीय शालेय प्रमाणपत्र परीक्षा परिषदेने आज आयसीएसई आणि आयएससी बोर्ड परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत.

आयसीएसई म्हणजेच दहावीमध्ये 99.09% विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत आणि आयएससी म्हणजेच बारावीमध्ये 99.02% विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षांचे निकाल सकाळी 11 वाजता बोर्ड कार्यालयात एकाच वेळी जाहीर करण्यात आले.

उमेदवार संकेत स्थळावर जाऊन त्यांची गुणपत्रिका डाउनलोड करू शकतात. डिजिलॉकर ॲपच्या मदतीने मार्कशीट देखील डाउनलोड करता येते. यासाठी



तुम्हाला तुमचा परीक्षा रोल नंबर आणि रोल कोड वापरून लॉगिन करावे लागेल.

**दिविजा फडणवीसला ९२.६०%**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कन्या दिविजा फडणवीस हिला दहावीच्या परीक्षेत तब्बल 92.60 टक्के गुण पडले आहेत. अमृता फडणवीस यांनी एका ट्विटद्वारे ही माहिती दिली आहे.

निकाल पोर्टल results.digilocker.gov.in ला भेट द्या. CISCE DigiLocker निकाल पृष्ठावर जा. वर्ग प्रविष्ट करा आणि निकाल बटणावर क्लिक करा. पुढील पानावर इंडेक्स क्रमांक, युनिक आयडी आणि जन्मतारीख प्रविष्ट करा.

## बापानेच आवळला मुलाचा गळा

■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. ३० :**

शहरात ९ वर्षांच्या मुलाची वडिलांनी गळा आवळून निर्घृण हत्या केली आहे. बाप एवढ्यावरच थांबला नाही. मुलाची हत्या केल्यानंतर त्याला एका गोणीत टाकून सासरवाडीत नेऊन पलंगावर टाकले.

सुमित पुजारी (३५) असे आरोपी वडिलांचे नाव आहे. घरात सतत वादाचे वातावरण असायचे. सुमित पुजारी हे काही दिवसांपासून तणावात होते. कौटुंबिक कलह वाढला आणि त्याच्या रागाच्या भरात वडिलांनी मुलाचा खून केला. परंतु नेमके वाद काय होते? मुलाचा दोष काय होता? कौटुंबिक वाद किती गंभीर होता? या सगळ्याचा तपास पोलिस करत आहेत. दरम्यान, मुलाच्या मृत्यूने संपूर्ण कुटुंबावर दुःखाचे डोंगर कोसळले आहे. पोलिस घटनेचा तपास करत असून आरोपी वडिलांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'महामानवाचा' आंतरराष्ट्रीय दर्जाचा पुतळा घेतोय अंतिम आकार

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३० :**

मुंबईतील इंदू मिल परिसरात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे 450 फूटांचे स्मारक उभारले जात आहे. त्यामध्ये 350 फूट उंच भव्य पूणाकृती पुतळा साकारला जात आहे. या ऐतिहासिक प्रकल्पाची कामे आता अंतिम टप्प्यात आहे.

पुढील दीड ते दोन वर्षात स्मारक पूर्ण होईल, असे संकेत पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष व महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) जयदीप भाई कवाडे यांनी दिले. या स्मारक प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी जयदीप कवाडे यांनी भेट देऊन पाहणी केली.



जयदीप कवाडे यांनी केली इंदू मिल स्मारकाची पाहणी

या पाहणी दौऱ्यात प्रकाश भांगरे (मुख्य अभियंता, एमएमआरडी), मनोज इंगळे (कार्यकारी अभियंता, एमएमआरडी), अतुल कवटीकवार (टीम लीडर शशी प्रभू आणि असोसिएट्स), विनय बेडेकर (निवासी आर्किटेक्ट डिझाइन असोसिएट्स), कुणाल मेहता (निवासी अभियंता शशी प्रभू असोसिएट्स), उमेश साळुंखे (प्रकल्प व्यवस्थापक शापूरजी पालोनजी अँड कंपनी प्रा. लि.), वाजिद शेख (वरिष्ठ नियोजन व्यवस्थापक शापूरजी पालोनजी अँड कंपनी प्रा. लि.), पीरिपाचे प्रदेश संघटक कपिल लिंगायत, आनंद कडाळे, अतुल तांबे दिलीप कापसे, सचिन ऊपल, संदीप साळवी उपस्थित होते.

या ऐतिहासिक स्मारकाचे 100 फुटांचे काम पूर्ण झाले आहे. पद्मभूषण राम सुतार यांच्या गाझियाबाद येथील कार्यशाळेत 350 फूट उंच पुतळ्याचे काम अंतिम टप्प्यावर आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडी) या प्रकल्पाची जबाबदारी पार पाडत आहे.

स्मारक स्थळी पाहणी करताना एमएमआरडी अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. बाबासाहेबांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि घटनात्मक कार्याचा प्रभावी दस्ताऐवज तयार करण्यासाठी स्मारकात डिजिटल तंत्रज्ञान, ऑडिओ-विज्युअल माध्यमे, इंटरेक्टिव्ह डिस्प्ले, लेझर शो यांचा समावेश करण्यात येणार आहे.

कवाडे यांनी सांगितले की, हे स्मारक जागतिक दर्जाचे असावे आणि बाबासाहेबांचे विचार जगभर पोहोचावेत, यासाठी देश-विदेशातील स्मारकांचा अभ्यास करून त्याचा उपयोग आपल्या नियोजनात करावे अशी सूचना जयदीप कवाडे यांनी केली.

## सुरक्षा रक्षक मंडळाच्या कर्मचाऱ्यांचा गणवेश खाकी




### १ मेपासून अंमलबजावणी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**

राज्यातील नोंदणीकृत सुरक्षा कर्मचाऱ्यांसाठी खाकी रंगाच्या गणवेशास मान्यता देण्यात आली. यामध्ये टोपी निळ्या रंगाची असून, त्यावर सुरक्षा रक्षक मंडळाचा लोगो व नाव असणार आहे. त्याचबरोबर कामगार दिनाचे औचित्य साधून हा खाकी गणवेश दिनांक १ मे २०२५ पासून राज्यभरात अंमलात येणार असल्याची घोषणा मंत्री फुंडकर यांनी केली.

महाराष्ट्र राज्यातील सुरक्षा रक्षक मंडळाच्या नोंदणीकृत सुरक्षा कर्मचाऱ्यांसाठी नव्याने निश्चित करण्यात आलेल्या खाकी रंगाच्या गणवेशाचे अनावरण आज कामगार मंत्री अ‍ॅड.आकाश फुंडकर यांच्या हस्ते आज नरिमन भवन, मुंबई येथे करण्यात आले. सुरक्षा रक्षकांच्या गणेशाच्या रंग खाकी असावा, अशी मागणी विविध संघटना व सुरक्षारक्षकांनी शासना कडे केली होती. कामगार मंत्री यांनी ही मागणी मान्य करत केली आहे. राज्यभरात जिल्हानिहाय १६ सुरक्षा रक्षक मंडळे कार्यरत असून आता १ मे पासून राज्यातील सर्व सुरक्षा रक्षकांच्या गणवेशात एकसमानता असणार आहे.

या उपक्रमामुळे सुरक्षा रक्षकांची ओळख एकसंध राहील व त्यांच्या शिस्तबद्धतेत भर पडेल. तसेच या नव्या गणवेशामुळे राज्यातील सुरक्षा व्यवस्थेला अधिक सुसंगत व व्यावसायिक स्वरूप प्राप्त होणार असल्याचेही फुंडकर यांनी यावेळी सांगितले.

# सिहोरा येथे मुलीचा दुकानदाराने केला विनयभंग

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा ,दि.३०:** किराणा दुकानात चॉकलेट घेण्यासाठी गेलेल्या ११ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला.

ही घटना सिहोरा येथील बाजार चौकात, मंगळवारी (दि. २९) सकाळी १०:३० वाजताच्या सुमारास घडली. या प्रकरणी देवेंद्र धनराज बिसेन (५८)रा. सिहोरा याच्यावर पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

पीडित मुलगी तिच्या मैत्रिणीसोबत चॉकलेट घेण्यासाठी बाजार चौकातील किराणा दुकानात गेली होती.

तिने दुकानदाराला चॉकलेट मागितले असता तिचा विनयभंग केला. मुलगी घरी गेल्यावर तिच्या आई व मावशीला सर्व प्रकार सांगितला.

त्यानंतर आईच्या तक्रारीवरून सिहोरा पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीविरुद्ध तपास सुरू केला आहे.

# जांब नाल्यावर बंधारा बांधकामाची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**जांब (लोहारा) ,दि.३०:** लोहारा ते जांब नाल्यावर बबन कुथे यांच्या शेताजवळ मागील अनेक वर्षापुर्वी बंधारा बांधण्यात आला होता परंतु आता तो जिर्ण झाला आहे .

त्यामुळे या नाल्यात पाणी साचुन राहत नाही व मागील अनेक वर्षांपासून या नाल्याची खोलीकरण काम करण्यात आले नाही .

तरी सबंधित अधिकारी यांनी लक्ष देऊन बबन कुथे यांच्या शेताजवळील नाल्यावर बंधारा बांधकाम करण्याची मागणी ग्रामपंचायत सदस्य दुर्गेश कुथे यांनी केली आहे

# लाखांदूर बनले सुगंधित तंबाखाचे कोठार

***तालुक्यातील अनेक गावांत तंबाखूचा पुरवठा *अन्न प्रशासन विभागाची भूमिका संशयास्पद**

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा , दि. ३० एप्रिल :** अख्ख्या राज्यात सुगंधित तंबाखू व गुटखाबंदी असतांना लाखांदूर तालुक्यात बिनबोभाटपणे सुगंधित तंबाखाची व गुटख्याची खुलेआम विक्री योजनांना होत असून स्थानिक लाखांदूरातीलच तंबाखू किंग संपूर्ण तालुक्यातील चिल्लर विक्रेत्यांना सुगंधित तंबाखूचा पुरवठा होत असल्याची ओरड सध्या तालुक्यातील काही सुजाण नागरिक करित आहेत. भंडारा जिल्ह्याच्या अगदी शेवटच्या टोकावर लाखांदूर तालूका वसलेला असून सहा किलो मीटरवर गडचिरोली जिल्ह्याची सीमा प्रारंभ होत असून तालुक्यापाठोपाठ गडचिरोली जिल्ह्यातही सुगंधित तंबाखाची तसेच गुटख्याची तस्करी लाखांदूरातूनच होत असल्याचीही माहिती सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. मात्र यासंबंधीत अन्न प्रशासन विभाग झोपेचे सोंग घेऊन सर्वकाही निमूटपणे बघत असल्याचीही ओरड आहे. गत काही दिवसांपूर्वीच सदर तस्करीवर आळा घालण्याहेतू लाखांदूर तालुक्यातील चंप्राड येथील एका दुकानावर धाडसत्र चालवित कारवाई केल्याचेही माहीती उघड आहे मात्र त्याहीवेळेला तस्कर सोडून सन्यासालाचा जेरबंद केल्याचे उघड असल्याने सध्या अन्न प्रशासन विभागावरही अविस्वास तालुक्यातील नागरीक दाखवित आहेत तर यात संबंधित विभागाची भूमिका संशयास्पद दिसते मात्र कारवाई करणार कोण असा सूर तालुक्यात झळकत आहे. प्रसार माध्यमातून अनेकदा चाललेल्या गैरप्रकारांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न सतत केला जात आहे मात्र कुंपणच शेत खात असल्याने कारवाईचा दणका पडताना दिसत नाही.सुगंधीत तंबाखाच्या व्यवसायातून लाखांदूरातील काही मोठे व्यापारी गब्बर झाले असून आमचं कोण काय वाकडे करणार या उर्मीत दिसून येत आहेत तालुक्याला सध्या सुगंधित तंबाखाचे कोठार संबोधणे ही वावगे ठरणार नाही. यात अन्न प्रशासन विभागाने गांभीर्य दाखवित उचीत कारवाईची मागणी सर्वत्र केली जात आहे.

***कसा चालतो तस्करीचा प्रकार***

तालुक्यातील गावात किराणा सामान काही किरकोळ दुकानदार यांना पोहचता करण्यासाठी ठोक विक्रेते आपल्या चारचाकी टेम्पो, ट्रक च्या माध्यमातून किराणा सामानाच्या मधोमध सुगंधित तंबाखू व गुटख्याची छूप्या मार्गाने तस्करी करीत असतात.

***जादा पैसे कमविण्यासाठी कृत्रिम तुटवडा***

वर्षातून दोनदा तालुक्यातील मोठ्या व्यावसायिकांकडून सुगंधित तंबाखू व गुटख्याचा कुत्रिम तुटवडा निर्माण करून आपल्याच गोदामात तंबाखूचा साठा छपवून किरकोळ दुकानदारांकडून दुप्पट किमतीत त्याची विक्री करून जादा पैसे कमविण्याचा गोरखधंदा होत असतो.

***माव्याच्या किंमतीत दुप्पट वाढ***

सध्या तालुक्यात तंबाखाची कृत्रिम टंचाई निर्माण झाली असून याचाच फटका पानटपरी चालकांना बसलेला दिसून येत आहे यामुळे अगोदर २०ते२५रूपयाला मिळणारा मावा सध्या ३०ते३५रूपयाला विकताना दिसत आहेत.

# लग्नमंडपातच वधूपित्याचा मृत्यू





**हृदयविकाराचा तीव्र झटका : झारली येथील आनंद सोहळ्यावर पसरली शोककळा**

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा , दि. ३० एप्रिल :** एकीकडे नवरदेवाच्या वऱ्हाडाचा गजर, शहनाईचे सूर, नवदाम्पत्याच्या लग्नाचे मंगलाष्टक आणि शुभेच्छांचा वर्षाव सुरू असताना, दुसरीकडे वधूपित्याच्या काळजात तीव्र वेदना जाणू लागल्याने अचानकच खाली पडले. आणि क्षणभरात संपला एका बापाचा मुलीच्या सुखासाठी चाललेला जीवन प्रवास. तुमसर तालुक्यातील झारली येथे मंगळवारी (दि. २९) दुपारी २ वाजता एका लग्नसोहळ्यात घडलेली ही विदारक घटना परिसरात शोककळा पसरवून गेली. झारली येथील गणेश तुळशीराम खरवडे (५४) हे आपल्या मुलीच्या लग्नात आनंदाने सहभागी झाले होते. वऱ्हाडी पाहुण्यांचे स्वागत, कन्यादान, मंगलाष्टक अशा सर्व विधी अत्यंत आनंदाने पार पडत होते. बापाने आपल्या पोटच्या मुलीला औक्षण करून दोन्ही हात जोडून नवदाम्पत्याला सुखी संसाराच्या शुभेच्छा दिल्या. परंतु, नियतीने काही वेगळाच डाव खेळला. शुभविधी संपताच अचानक त्यांच्या छातीत तीव्र वेदना जाणवू लागल्या आणि काही क्षणांतच ते खाली पडले. लग्नमंडपातच उपस्थितांच्या डोळ्यांसमोर त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

उपस्थितांनी तातडीने वैद्यकीय मदतीचा प्रयत्न केला, परंतु तोपर्यंत त्यांच्या जीव गेला होता. डॉक्टरी तपासणीत त्यांचा मृत्यू हृदयविकाराच्या तीव्र झटक्यामुळे झाल्याचे स्पष्ट झाले. एकीकडे नवदाम्पत्याच्या आयुष्याचा शुभारंभहोत असतानाच, दुसरीकडे वधूपित्याचा अचानक झालेला मृत्यू संपूर्ण लग्नसोहळ्याला गहिवरून गेला. आनंदाने गजबजलेला मंडप क्षणातच शोकमय झाला. नातेवाईक, मित्रमंडळी, आणि संपूर्ण गावावर शोककळा पसरली. गणेश खरवडे हे आपल्या शांत, मनमिळावू स्वभावासाठी ओळखले जात होते. आपल्या मुलीच्या लग्नाचे सर्व आयोजन त्यांनी अगदी बारकाईने, आनंदाने केले होते. त्यांच्या अचानक जाण्याने संपूर्ण कुटुंबावर आभाळ कोसळल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. या घटनेनंतर नवविवाहित वधू व तिचे संपूर्ण कुटुंब मानसिक धक्क्यात असून गावातील ग्रामस्थ, नातेवाईक आणि विविध सामाजिक संस्थांनी सहवेदना व्यक्त केली आहे.

***सजलेल्या मंडपातूनच अंत्ययात्रा***

झारली येथे अख्खे गाव पलुवीच्या लग्न सोहळ्यात उपस्थित होते. मात्र अचानक वडील दगावल्याने लग्न घरासह संपूर्ण गावात शोककळा पसरली. तुमसर रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित करून इतर वैद्यकीय सोपस्कार पार पाडले. त्यांना नातेवाईकांच्या सुपूर्त करून त्याचे पार्थिव गावात येताच संपूर्ण परिसर अक्रांतात गेले. मुलीच्या लग्नासाठी सजलेल्या मंडपातूनच वधूच्या वडिलांची अंत्ययात्रा निघाल्याने दुःख शेकडो लोकांच्या डोळ्यात दिसून आले.

***पलुवी झाली पोरकी***

आपल्या लग्नाच्या आनंदात स्टेजवर उभ्या वधू पलुवीला वडील दगावल्याचे कळताच ती बेशुद्ध पडली. शुध्दीवर येताच पलुवीचे अश्रू आक्रोश करत वाहू लागले. ऐन लग्नाच्या दिवशी घडलेल्या घटनेने पलुवी पोरकी झाली. आनंद दुःखात बदलून गेले.

# सानगडी ग्रामपंचायतचा अभिनव उपक्रम

**महाराष्ट्र दिनी होणार बांधकाम करणारे गवंडी (बेलदार )कामगारांच्या हस्ते ध्वजारोहण**

**महासागर प्रतिनिधी**

**सानगडी , दि. ३० एप्रिल :** येथील सरपंच सविता उपरीकर या जनतेच्या फायद्यासाठी आणि गाव विकासासाठी नवनवीन उपक्रम राबवत असतात मागील वर्षी १ मे महाराष्ट्र दिनी घरकाम करणाऱ्या कामवाली बाईच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावर्षी सुद्धा त्यांनी स्वतःच्या संकल्पनेतून १मे कामगार दिनानिमित्त कामगारांच्या हस्ते ध्वजारोहण करण्याचा निर्णय केला.प्रत्येक मानवाचे एक स्वप्न असते आपले छोटेसे घर असावे.हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पैसा मनुष्यबळ याची गरज असते.घर बांधायचं तर गवंडी, बांधकाम मजूर, कारागीर आवश्यक आहे. उन्हा तान्हाची,पावसाची,थंडीची तमा न करता बेलदार म्हणून काम करतात याच विषयाला धरून दिनांक २९ /४/२०



२५ च्या मासिक सभेत ध्वजारोहणा संबंधाने चर्चा करण्यात आली. बांधकाम बेलदार म्हणून सदस्याकडून माहिती घेण्यात आली.जवळ जवळ ४० ते ४२ बेलदार कामगारांची नावे आले. या सर्वांचे लकी ड्रॉ च्या माध्यमातून निवड करण्यात आली. यातील प्रथम चिठ्ठी निघाली.यांच्या हस्ते महाराष्ट्र दिनी ध्वजारोहण करण्याचे ठरले. लकी ड्रॉ मध्ये 'राजकुमार लहानु गोस्वामी' यांच्या नावे निघालीअसून त्यांच्या हस्ते १मे कामगार दिनी ध्वजारोहण होणार आहे.याकरिता ग्रामपंचायतीचे सचिव व संपूर्ण सदस्य गण कर्मचारी वर्ग यांनी सहभाग नोंदविला.

# पिंपळगाव ते नेरी हा रस्ता ठरत आहे मृत्यूमार्ग !

**मोहाडी :** पिंपळगाव ते नेरी रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून नागरिकांना या रस्त्यावरून मार्गक्रमण करतांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. रस्त्यावरील खड्डे चुकवितांना वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. किरकोळ अपघात तर नित्याची बाब झाली आहे. परिणामी रस्त्यावर खड्डे की खड्ड्यात रस्ते अशी संभ्रमावस्था वाहन चालकांची होत आहे. या रस्त्याची त्वरित दुरुस्ती करून तातडीने डांबरीकरण करून रहदारीस रस्ता सुरळीत करून देण्याची मागणी नागरिक करीत आहेत. पिंपळगाव ते नेरी हा रस्ता येथे स्थानिक नागरिकांचा मुख्य मार्ग आहे. आणि हा रस्ता सरळ जिल्ह्याशी जोडलेला आहे. त्यामुळे कोणतेही शासकीय कामे करण्यासाठी तहसील, जिल्हा परिषद येथे जाण्याचे झाल्यास याच रस्त्याने मार्गक्रमण करावे लागते . रहदारीचा मुख्य मार्ग असल्याने वाहनांची सतत वर्दळ सुरू असते. परंतु या रस्त्याची अत्यंत बिकट दुरावस्था झाली आहे. हा शेतकऱ्यांना शेतात जाण्याचा आणि विद्यार्थ्यांना शाळेत जाण्याचा मार्ग आहे. रस्त्यावरील खड्डे चुकवितांना वाहने उसळत असल्याने अनेक नागरिक मणक्याचे आणि पाठीचे आजाराने बेजार झाले आहेत. रात्रीच्या वेळी खड्ड्यांचा अंदाज येत नसल्यामुळे खड्ड्यातून अनेक गाड्या उसळून पडल्यामुळे अपघात झाले आहेत . तर कित्येक लोक जखमी झाले. खड्डेमय रस्त्यामुळे दूध तसेच भाजीपाल्याची आवक जावक करन्यासाठी वाहन चालक आपली वाहने भाड्याने देत नाही असे बोलले जात आहे. अनेकांची वाहने खराब रस्त्यामुळे क्षतीग्रस्त होत असून याचा वाहन चालकांना चांगलाच फटका बसत आहे. रोजच रस्त्यावरून मार्गक्रमण करताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे . रस्त्याची अनेकदा थातुरमातुर डागडुजी करण्यात आली. परंतु काही महिने लोटत नाही तोच रस्ता जैसे थे स्थितीत दिसून येत आहे . या रस्त्याचे तात्काळ दुरुस्तीकरण व डांबरीकरण करण्यात यावे , अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

## बपेरा आठवडी बाजारातून मोटार सायकलची चोरी

**सिहोरा :** महेश झनकलाल भलावे रा. डोंगरीया ता. खैरलांजी जि. बालाघाट हा हाडगे यांचे दुकानासमोर त्याने आपली मोटार सायकल लॉक करून ठेवली होती. त्याची मोटारसायकल पेंशन प्रो क्र. एमएच ३५ वु ५०४६ ने बपेरा येथे आठवडी बाजार करण्यासाठी आला होता. बपेरा येथील अमरीश अज्ञात चारोनने संधी साधून ती चोरून नेली. पोलीस स्टेशन सिहोरा येथे गुन्हा नोंद असून तपास श्रेणी उपनिरीक्षक मेश्राम करीत आहेत.

# पालकमंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते ध्वजवंदन

**पोलीस मैदानावर महाराष्ट्र दिनाचा १ मे रोजी सकाळी शासकीय समारंभ**

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा , दि. ३० एप्रिल :** महाराष्ट्र राज्याचा ६६ वा स्थापना दिवस समारंभ गुरूवार १ मे २०२५ रोजी पोलीस मुख्यालय कवायत मैदान ,भंडारा येथे सकाळी ८ वा. राष्ट्रध्वज वंदन व संचलन समारंभ होणार आहे. राज्याचे वस्त्रोद्योग तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते ध्वजवंदन होणार आहे. या समारंभास उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

या मुख्य शासकीय कार्यक्रमास सर्वांना उपस्थित राहता यावे यासाठी इतर सर्व कार्यालय, संस्था, आदींनी त्यांचे ध्वजवंदनाचे समारंभ सकाळी ७.१५ पुर्वी किंवा ९ वाजेनंतर आयोजित करावेत. सर्व निमंत्रितांनी राष्ट्रीय पोशाखात समारंभ सुरू होण्यापूर्वी २० मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे. सुरक्षिततेच्या दृष्टीने कृपया बँग सोबत आणू नये, असेही आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या दिनानिमित्त विविध कार्यक्रम, समारंभ आदी ठिकाणी राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पध्दतीबाबत शासन परिपत्रक तसेच ध्वज संहितेतील सूचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. गृहविभागाच्या राष्ट्रध्वजाच्या उचित सन्मानाबाबतच्या परिपत्रकात नमूद केलेल्या निर्देशनानुसार राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिकचा वापर होणार नाही, याची दक्षता संबंधितानी घ्यावी, असेही आवाहनही केले आहे.

महाराष्ट्र राज्याचा ६६ वा स्थापना दिवस समारंभ गुरूवार १ मे २०२५ रोजी साजरा करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाचे २८ एप्रिल २०२५ रोजी परिपत्रक निर्गमित झाले आहे. या परिपत्रकात नमूद केल्यानुसार सर्व विभाग प्रमुखांनी कार्यक्रमाचे आयोजन करावे, असे जिल्हा प्रशासनाच्या वतीने कळविले आहे.

# भंडारा नगरपरिषद निवडणुका लांबणीवर; समस्यांकडे दुर्लक्ष

## इंटकने दिले जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा , दि. ३० एप्रिल :** मागील तीन वर्षापासून भंडारा नगर परिषदेसह राज्यातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. त्यामुळे भंडारा नगरपरिषद अध्यक्ष आणि सदस्यांची पदे रिक्त असून, सध्या प्रशासनाचा कारभार अधिकाऱ्यांच्या हाती आहे. मात्र, या अधिकाऱ्यांकडून नागरिकांच्या समस्या गंभीरतेने घेतल्या जात नसल्याचा आरोप करत इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस (INTUC) भंडारा जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात इंटकचे जिल्हाध्यक्ष धनराज साठवणे यांनी भंडारा शहरामध्ये आरोग्य, पाणीटंचाई आणि रस्त्यांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे नमूद केले आहे. निवडणूक प्रक्रिया लांबणीवर गेल्यामुळे नागरिकांच्या प्रश्नांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून, मुख्याधिकाऱ्यांनी या समस्यांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. नगरपरिषदेमधील अधिकारी आणि कर्मचारी यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित राहून नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी तत्पर राहावे, यासाठीही निवेदनातून आग्रह धरण्यात आला आहे. या वेळी इंटकचे विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त अन्न धान्य किट चे वितरण

**भंडारा :** थोर समाजसुधारक व प्रेरणादायी व्यक्तिमत्व असलेल्या संत महापुरुषांची जयंती साजरी करतांना विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन मागील काही वर्षांपासून प्रहार विद्यार्थी संघटना जिल्हा भंडारा तर्फे करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून ह्या वर्षी सुद्धा महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंता निमित्त दिवसभर काबाडकष्ट करून आपली भाकरी निर्माण करणारे तसेच कधीकाळी उपाशी राहून तर कधी एकवेळचे जेवण करणारे अत्यंत गरजू अश्या नागरिकांना प्रहार विद्यार्थी संघटना जिल्हा भंडारा च्या वतीने अन्न धान्य आणि किराणा कीट चे वितरण करण्यात आले. यावेळी प्रहार विद्यार्थी संघटनेचे भंडारा जिल्हाध्यक्ष चारुल रामटेके, शहराध्यक्ष भंडारा आदेश मेश्राम, शहर उपाध्यक्ष तुषार मेंढे, शहर सचिव साहेबराव साखरकर, सदस्य स्वप्नील मेश्राम, सदस्य निहार वासनिक आदी उपस्थित होते.



## जाहीर नोटिस

आम जनतेस या जाहीर नोटिस द्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार अमिन शबन शाह शेख रा. पवनी ता. पवनी जि. भंडारा यांनी मौजा -पवनी येथील सिटी सव्हे क्रं. ७८४ शिट नं. १७ मालमत्ता क्रं. १११, आराजी ७९ चौ.मि. असून सदर मालमत्ता दि. १७/०७/२०२० रोजी दस्त क्रं. ९९४/२०२० अन्वये जाहिदखॉ जलीलखॉ पठाण यांचेपासुन खरेदी केलेला असून सदर मिळकत दस्त क्र. १२९२/२०१५ दिनांक १९/१२/२०१५ नुसार वसीउररहमान शफीकुररहमान खाँ यांनी जाहिदखॉ जलीलखॉ पठाण चा नावाने विकीपत्र करून दिला आहे.सदर मालमत्तेची चर्तुसिमा पुर्व -जमिरबेग यांचे मकान, पश्चिम न.प. रोड, उत्तर-अशफाक पटेल यांचे मकान, दक्षिण-जमिरबेग यांचे मकान आहे. व परंतू उपरोक्त दस्त क्र.१२९२/२०१५ दिनांक १९/१२/२०१५ ची मुळ प्रत गहाळ झालेले आहे. सदर उपरोक्त मालमत्ता विकीपत्रान्वये माहो पक्षकाराचे नाव राजस्व अभिलेखात मालक व कब्जेदार म्हणून दर्ज करण्यात आलेले आहे. सदर वरील वर्णन केलेल्या मालमत्तेचे माझे पक्षकार एकमेव मालक नाहीत असे कुणासही समजायचे असेल किंवा सदर मालमत्तेच्या माझे पक्षकाराचे मालकी हक्काविषयी कुणालाही कोणताही आक्षेप असल्यास हा नोटिस प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह खालील पत्यावर आक्षेप सादर करावा. अन्यथा माझे पक्षकार सदर मालमत्तेचे एकमेव मालक व कब्जेदार आहेत असे कायदेशिर रित्या गृहित धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**भंडारा**
**दिनांक: ३०/०४/२०२५**

**पक्षकार तर्फे अधिवक्ता**
**(ॲड. जयंत. जे. बिसेन)**
**मो. क. ९३२६१११६१७**









# हिंदू मुस्लिमांनीच ठरवलंय आता दंगली नकोच!




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

पुलवामा आणि पहलगाम हल्ल्याचा निषेधार्थ ताबडतोब पाकिस्तानचे कंबरडे मोडावे असे प्रत्येकाला वाटते. पण मागील काळात प्रदीप कुरुलकर, संदीप शर्मा, ध्रुव सक्सेना, निशांत अग्रवाल, अच्युतानंद मिश्रा हे रेड हँड पकडलेले सर्व कोण होते, हे पुन्हा पुन्हा सांगण्याची गरज नाही. ते सर्व पाकिस्तानचे एजंट म्हणून काम करीत होते ना? त्यांचा एकाच वेळी एन्काउंटर केला असता तरी पाकिस्तानचे कंबरडे यापूर्वीच मोडले गेले असते. एक सहज उदाहरण पाहू या. पहलगाम आणि दीनानाथ प्रकरणातली मानसिकता समानच दिसते की नाही? दीनानाथमध्ये कसं, दुनिया सोडून गेलेली भगिनी भाजपाच्या आमदाराच्या पीएची बायको, हॉस्पीटलचे मोदींच्या हस्ते उद्घाटन आणि फडणवीसांनी जमीन दिलेली म्हणजे सर्वकाही भाजपाच्याच मर्जीतलं, आंदोलन करून मोडतोड करणाऱ्या भगिनी भाजपाच्याच, आंदोलनाच्या विरोधात पत्र लिहिणाऱ्या खासदार भाजपच्याच, डॉक्टर कोण आहे म्हणून आंदोलन करू नका म्हणत जोरदार लॉबींग करणारे लोक भाजपाचेच. सबकुछ भाजपा. इकडेही तसंच आहे. कलम 370 वर आवाज उठवणारे भाजपाचेच, काश्मिरात पर्यटन वाढवा म्हणून 370 नंतर आरोळ्या ठोकणारे भाजपाचेच, दोनशे किमी आत घुसून अतिरेकी लोकांना मारून गेले तरी त्याचा पत्ता न लागलेले डोवाल, मोदी, शहा भाजपाचेच, सरकार भाजपचेच, अतिरेकी पकडले नाही तरी त्यावर 'ब्र' देखील न काढता फक्त नफरती मोर्चे काढणारे भाजपाचेच आणि काश्मिरच्या पर्यटनावर आता बहिष्कार टाका असा बिनडोक आग्रह करणारे, आपल्याच दुकानातून माल घ्या असा बिनडोक आग्रह धरणारेही भाजपाचेच. सांगा बर आता काय करायचे? काश्मिरात मुस्लिम अतिरेक्यांनी हल्ला केला म्हणून सगळ्या मुस्लिमांवर बहिष्कार घालायचा असेल तर मग कुरुलकर, कर्नल पुरोहित, प्रज्ञा सिंग, डीएसपी देवेंद्रसिंग यांच्या धर्मावर पण बहिष्कार टाकायचा का? दारूची बाटली, बाईच आमिष किंवा काही हजार रुपयांसाठी हेरगिरी करून देशाची गुपित पाकिस्तानला विकणारे सुद्धा देशद्रोही आणि अतिरेकी आहेत ना ? यांच्या जन्मदाखल्यावर त्यांची जातधर्म बघून त्यांचाही हुक्कापाणी बंद करायचा का ? सरसकट लेबलिंगचा रोग जोपर्यंत दुसऱ्याला लेबलिंग करतो तोपर्यंत गोड वाटतो ना ? माणूस स्वधर्मीय असला म्हणून तो बाय डिफॉल्ट देशप्रेमी आहे, अस तुम्हाला वाटत असेल, तर अशांच्या मेंदूची तातडीने तपासणी करून घेणे गरजेचे आहे.

कथित बहिष्कार मोहिमेच्या निमित्ताने सगळ्यांनाच विचार करावा लागेल. देशातल्या नेत्याने किंवा देशातल्या अधिकारपदावर मुस्लिमाने असणे गुन्हा आहे का? जन्माने मुस्लीम असणेच मुळात गुन्हा आहे का? मुस्लीम असण एवढ घृणास्पद आहे का?

माठ आणि मंदबुद्धी असलेले अनेकजण चांगले मुस्लीम आणि वाईट मुस्लीम अशी विभागणी सांगायला येतीलच. मुळात चांगला आणि वाईट मुस्लीम ठरवणार कोण? याचे अधिकार नेमके कुणी कुणाला दिलेत? देशातल्या प्रचलित कायद्यांनी वागणारा नागरिक चांगला आणि न वागणारा वाईट ही साधी मांडणी लक्षात घेतली, तर मग चांगला वाईट हे हिंदुना तेवढच लागू होतं आणि सगळ्या धर्मियांना लागू होत. मग नेमके कोणते मुस्लीम चांगले आणि कोणते वाईट ? भाजपमध्ये असणारे शहानवाज हुसेन, मुख्तार अब्बास नक्वी, जम्मू मधला खालिद चांगले मुस्लीम आणि नवाब मलिक वाईट का? मुळात चांगल वाईट ठरवण्याचा मक्ता आणि अधिकार यांना दिलाय कुणी ? की मुस्लीम मंचाला हा अधिकार दिलाय कुणी? राष्ट्रभक्ती, राष्ट्रद्रोही, चांगला मुस्लीम, वाईट मुस्लीम हे सगळे प्रमाणपत्र वाटण्याचा ठेका स्वतःकडे का घेता?

भ्रष्टाचार करणारे, खून करणारे, गोळ्या घालणारे, अतिरेकी कारवाया करणारे, हेरगिरी करणारे, बेकायदेशीर शस्त्र बाळगणारे तर सगळ्याच धर्मातले आहेत. वेळोवेळी हे सिद्ध झालेलं आहे. पाकिस्तानला गुपित विकणारा कुरुलकर कोण आहे? तो कोणत्या संघटनेचा कार्यकर्ता? स्त्रियांना अश्लील धमक्या देणारे, खुनाच्या, बलात्कार करण्याच्या धमक्या देणारे, हेट स्पीच सातत्याने करणारे नेमके कुठल्या संस्कारी धर्माचे आहेत हेही वारंवार सिद्ध झालेलं आहेच की.

सरसकट सगळेच हिंदू चांगले नसतील तर सरसकट सगळे मुस्लीम वाईट नसणारच की? बर सरसकटीकरण करायचचं ठरलं तर मग या लोकांच नेमक काय करायचं? दिलीपकुमार, मधुबाला, नर्गिस आणि अनंत मुस्लीम कलाकारांचे सिनेमे पहायचे नाहीत की त्यांच्या तोंडावर काही कापड वगैरे टाकून झाकायचं ? रफी, तलत मेहमूद, नौशाद, शकील यांची गाणी ऐकायची नाहीत की कानात बोळे घालून घ्यायचेत? झाकीर हुसेन, अल्लारख्खा यांचे तबले फोडायचे की विलायत खाँ ची सतार तोडायची की बिस्मिल्ला खानची शहनाई गंगेत टाकायची, की बडे गुलामअली खाँ ला अडगळीत टाकून द्यायचे?

मुस्लीम लेखक, कलाकार, गायक, चित्रकार यांच योगदान सरसकट नाकारायचं का फक्त जन्माने मुस्लीम आहेत म्हणून? ज्या ज्या गावांत आमिरखानच्या पाणी फाउंडेशने काम केलेले आहे त्या गावातले बंधारे ताली तलाव फोडून टाकायचे का? अझीम प्रेमजींनी उभारलेल्या न्यासाच्या माध्यमातून हजारो मुलांना शिक्षण दिलं जात ते बंद करायचं का? मुसलमान असणं घृणास्पद आणि वाईट असेल तर तुमच्या आयुष्यात समोर येणाऱ्या प्रत्येक मुसलमान व्यक्तीला तुम्ही अशीच वागणूक देणार आहात का ?

यापुढे कुणीही कुठल्याही प्रकरणात अमका मुस्लीम आहे अस म्हटल्यावर तो मुस्लीम आहे की नाही यापेक्षा त्यान केलेलं कृत्य अयोग्य की योग्य याची चर्चा केली पाहीजे. मुस्लीम आहे म्हणजे वाईट आहे, घृणास्पद आहे हा विषय डोक्यातून काढून टाकला पाहीजे. मुस्लीम असणं पाप, गुन्हा, वाईट नाही आणि हो हे सांगण्याची जबाबदारी मुस्लिमांची नाही, तर तुमची आमची सगळ्यांची आहे.

भारतात बहुजन हिंदू आणि मुस्लिमांमध्ये दंगल होत नाही म्हणून काही संघटना गेल्या अनेक वर्षापासून परेशान आहेत. सुरुवातीला 'कश्मीर फाईल' चित्रपट काढून बहुजन हिंदू आणि मुस्लिमांमध्ये दंगली घडवण्याचा प्रयत्न केला. परंतु हा प्रयत्न असफल ठरल्यावर त्यांनी पुन्हा एकदा अतिरंजित 'केरला स्टोरी' हा चित्रपट काढला. त्यामध्ये 'सिनेमॅटिक लिबर्टी' चा गैरफायदा घेत पुन्हा एकदा बहुजन हिंदूंच्या भावना भडकवण्याचा प्रयत्न केला.

पण भारतातील सुज्ञ जनतेने पुन्हा एकदा धूर्त डाव ओळखला. त्यामुळे भारतात बहुजन हिंदू आणि मुस्लिमांमध्ये दंगली घडवून आणण्याचा हा प्रयत्न सुद्धा फसला. दोन्ही प्रयत्न फसल्यावर पुन्हा कंबर कसून आणखी एक ऐतिहासिक चित्रपट बनवला. पण इतिहासातील घटना तोडूनमोडून पुन्हा एकदा कादंबरी आधारित चित्रपट आहे असे सांगून पुन्हा एकदा 'सिनेमॅटिक लिबर्टी' चा गैरफायदा घेऊन अतिरंजित छ. संभाजी महाराज यांच्या वरील 'छावा' चित्रपट दाखवला.

भारतात गावागावात नागरिकांना फ्री मध्ये चित्रपट दाखवून बहुजन हिंदूंना मुस्लिमांविरोधात भडकवण्याचा पुन्हा एकदा असफल प्रयत्न केला. पण जनतेला आधीच खरा वास्तव इतिहास माहिती असल्याने आणि रयतेच्या राज्याचे खरे शत्रू मुस्लिम नसून विदेशी 'मुखपुत्र' असल्याचे माहिती असल्याने बहुजन हिंदूंमध्ये दंगल काही घडून आली नाही.

त्यामुळेच अतिशय हताश झालेल्या काहींनी आता त्यांच्या हातात असलेले शेवटचे अस्त्र बाहेर काढले आहे ते म्हणजे कश्मीर मध्ये निरपराध पर्यटकांना टार्गेट करणे आणि आज ते त्यांच्या या कार्याला सफल बनवण्यात यशस्वी झाले.

यापूर्वी पुलवामा दुर्घटना घडवून आणि त्याचे भांडवल करून मतांची भीक मागितली होतीच. मग आता भारतात पुन्हा एकदा बहुजन हिंदू विरोधात मुस्लिम दंगली घडून येतील का? तर उत्तर आहे 'नाही'. कारण पुन्हा एकदा काश्मीर मधील मुस्लिमांनी या पाकिस्तानी अतिरेक्यांना केलेला विरोध व प्रसंगी स्वीकारलेले हौतात्म्य. बहुजन हिंदूंना आपल्या स्वतःच्या घरात आसरा देऊन केलेले संरक्षण.

अनेक मानवतावादी घटना जरी मीडियाने दाखवल्या नाहीत, तरी सोशल मीडिया मार्फत संपूर्ण भारतातील बहुजन हिंदूंनी पाहिल्या आहेत. त्यामुळे यावेळीही त्यांचे मनसुबे सफल होणार नाहीत याची शंभर टक्के गॅरंटी आहे. कारण या देशातील मुस्लिम आपल्या मातीशी इमानदार आहे. तो याच मातीत जन्मला आहे आणि याच मातीत दफन होणार आहे, हे त्याला चांगलेच माहिती आहे.

याच मातीसाठी आणि अर्थात मातृभूमीसाठी नेहमीच त्यांच्या पूर्वजांप्रमाणे तो आपल्या मातृभूमीच्या रक्षणासाठी आपले प्राण पणाला लावायलाही नेहमीच तयार असतो. त्याला हे पण माहिती आहे की, बहुजन हिंदू हे त्यांच्याच रक्ताचे आहेत. मुस्लिमांचा आणि बहुजन हिंदूंचा डीएनए एकच आहे. त्यामुळे कुणी कितीही बहुजन हिंदू आणि मुस्लिमांमध्ये वाद घडवून आणण्याचा, दंगली घडवून आणण्याचा प्रयत्न केला तरी त्यात ते कधीच यशस्वी होऊ शकत नाही.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी भारतातील शेकडो हजारो मुस्लिम बांधवांनी आपले प्राण पणाला लावले आहेत. शेकडो जण हुतात्मा झाले आहेत. आजही त्यांची नावे मुंबई मधील 'गेट वे ऑफ इंडिया'च्या भिंतीवर कोरलेली आढळेल.

भारतातील बहुजन हिंदू बांधवांना चांगला इतिहास माहिती आहे की, स्वातंत्र्यलढ्यात काडीचेही योगदान कोणाचे नाही. एक. नक्की की, बहुजन हिंदू आणि मुस्लिम यांच्यातील एकी कधीच तुटू शकत नाही. त्यामुळे भारतात हिंदू मुस्लिम दंगे होणारच नाही.

■ ■ ■

## काश्मीर समस्येवर हा काय अघोरी उपाय?

काश्मीरला जाऊ नका, अमरनाथ यात्रा करू नका, सर्वांनी तीन-चार वर्षे अमरनाथ यात्रा करणे थांबवले तर आपण मरणार आहोत का? आपली ही सहल काश्मिरींसाठी उपजीविकेचे साधन आहे. हेच काश्मिरी आपल्या सुरक्षा दलांवर जसे की बीएसएफ, एसआरपीएफ, सीआरपीएफ, आयपीएस, आयएएस जवानांवर हल्ला करतात, दगडफेक करतात आणि भारतीय सैन्याला विरोध करतात. काश्मीरवर दोन वर्षांसाठी आर्थिक बहिष्कार घाला, आझादी असल्याचा दावा करणाऱ्या सर्व यासीन मलिक आणि गिलानींचे तंबू कोसळतील. मग बघा, पाकिस्तान आणि चीन किती काळ आणि किती काश्मिरींना निधी देत राहतील? काश्मीरला जाऊ नका, त्याऐवजी शिमल्याला जा, दार्जिलिंगला जा, केरळला जा, कन्याकुमारीला जा, ऊटीला जा, ओडिशाला जा, उत्तराखंड, गुजरातला जा, तुम्ही कुठेही जा, पण काश्मीरला जाणे म्हणजे दहशतवाद्यांचे हात बळकट करण्यासारखे आहे. कोणीही कोणत्याही काश्मीर एम्पोरियममधून काहीही खरेदी करू नये. राष्ट्राच्या भल्यासाठी फक्त दोन वर्षे हे करून पहा, संपूर्ण चित्र बदलेल असे संदेश समाज माध्यमातून फीरवले जात आहे. म्हणजेच महाराष्ट्रात यापूर्वी मटन कोणाकडून घ्यावे व घेवू नये असे संदेश राज्यकर्तेच देत होते. आता तर निमित्तच झाले. पण असे अघोरी उपाय या देशाला सोसेल का? याचा विचार भारतीयांनीच करायचा आहे.

## द्वेष पेरलात तर द्वेषच उगवणार

पर्यटकांच्या हत्या झाल्या व बदला म्हणून मुसलमानांवर आर्थिक बहिष्काराची भाषा सुरु झाली. एक रुपयाची पण खरेदी त्यांच्याकडून करु नका, त्यांना वठणीवर आणा. ग्रुपवर मेसेजेसचा पूर आला. अरे भावांनो जेव्हा हल्ला झाला, तेव्हा मोदीसाहेब सौदी अरेबियात होते. सौदी नामक मुस्लिम देशाबरोबर व्यापारी करार करत होते. भारत आणि सौदीचा वार्षिक व्यापार ४३ बिलियन डॉलर्सचा आहे. ती उलाढाल वाढावी म्हणून देशाचे पंतप्रधान प्रयत्न करताय आणि क्षुल्लक कार्यकर्ते इथल्या स्थानिक मुसलमानांवर डोळे वटारतात? कोकणातील आंब्याच्या बागा मोठ्या संख्येने कराराने उस्मान नावाच्या व्यापाऱ्याला दिली जाते, उस्मान देखभाल करतो, उस्मानच आंबे विकतो. आपण डोक्यावर पेटी घेऊन आंबे विकू का? दुबईतील तथाकथित मसाला किंग धनंजय दातार ! त्यांच्या कंपनीचे नाव अल आदिल. अल म्हणजे अल्ला. दातारांनी दुबईतील धंदा बंद करुन भारतात गोशाळा काढावी का? दातारने दुबईत दिऱ्हाम कमावलेले चालतात. पण, गरीब मुस्लिमाने भारतात पोट भरु नये? जुन्या काळापासून अरबांशी भारताचा व्यापार आहे. भारतात येणाऱ्या अरबी व्यापाऱ्यांसाठी जगातील दुसरी मशीद केरळच्या राजाने बांधली. महाराज देखील अरबी घोडे अरबी व्यापाऱ्यांकडून घेत होते, हा इतिहास आहे. रिलायन्स इंडस्ट्रीजच्या बोर्डावर सौदीचा मुस्लिम राजकुमार आहे. त्याची गुंतवणूक मुकेशभाईला चालते? पण स्थानिक मुसलमानांकडून पाव, खारी, बटर घेऊ नका? सौदीतून आलेल्या पेट्रोलवर आपल्या गाड्या चालतात. आता त्या गाड्यांत गोमूत्र भरायचे का? अॅपल कंपनीची काही टक्के मालकी सौदी घराण्याकडे आहे. म्हणून आयफोन वापरणं बंद करायचे का? वोक्हार्ट, विप्रो, सिप्ला या भारतीय औषध कंपन्यांचे मालक मुसलमान आहेत. त्यांची औषधं घेणं बंद करायचे का? देशी गाईचं शेण खाऊन रोग बरा होईल? लक्षात ठेवले पाहिजे की, स्थानिक भारतीय मुसलमानांना छळण्यात काहीच अर्थ नाही. त्याचे परिणाम फार भयानक होतील. लाखो भारतीय गल्फ देशांमध्ये नोकरी करतात त्यांना धोक्यात आणायचे का? द्वेष पेरलात तर द्वेषच उगवणार.

# समाजाचं वास्तव आत्मभान : 'दौलत'

(डी. बी. जगतपुरिया लिखीत दौलत या कथासंग्रहाची समिक्षा यापूर्वी तीन सलग भागात प्रकाशित करण्यात आली होती. विस्तृत समिक्षेचा हा अंतिम भाग.)

----------------

'झुंज' ही कथा एका बुध्दीमान गरीबी, नियतीवर मात करून वैद्यकीय अधिकारी होणाऱ्या शबनमची यशोगाथा आहे. भाजीपालाचा व्यवसाय करून तीन मुलींनाच मुलं म्हणून सांभाळणारा मौलाना हा खरा स्त्रीपुरूष समतेचा वारसदार आहे. गरीबांना नियती कधीही पुढे जाऊ देत नाही. या संग्रहातील कथा प्रचंड आशावादी, प्रेरणादायी नवीन पिढीला शिक्षण घ्यायला,जीवन जगायला बळ देणाऱ्या आहेत. साहित्य शेवटी माणसाचं हित आणि गीत गाते हे कार्य जगत्पुरिया यांच्या कथा प्रामाणिकपणे करताहेत हे विशेष होय.




डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे
उदगीर. ९९२२९६६५२६

'गिरजा' ही हृदयद्रावक कथा आहे. गिरजा आणि तिचा पती गिरीधर जमीन विकून मुलांना शिकवलं. मुलं राम्या शाम्या मोठे साहेब झाले. त्यांचे लग्न झाले आणि आईवडीलांना वाऱ्यावर सोडले. याचा पश्चाताप गिरीधर करीत होता. गिरजा त्याला धीर देत होती. या दोघां नवरा बायकोंनी जगण्यावरची निष्ठा आणि स्वतःवरचा आत्मविश्वास कमी होऊ दिला नाही. अप्पाच्या मदतीने त्यांना मोक्यावर जागा मिळते. अप्पांनी गिरजा आणि गिरधरचे संयुक्त खाते काढून पाच लाख डिपॉजेट केले. मधू नि माधव हे दोघेही हॉटेलमध्ये वेटर होते. गिरजाई त्यांना त्यांची आईचं वाटते. काळं सर्वांची परीक्षा घेत असतो. गिरजाईचा मोठा मुलगा रामूच्या हातून दारूच्या नशेत गाडी चालवताना दोघांचा जीव गेला त्यामुळे तो जेलमध्ये जातो. लहान शाहू बँकेत होता त्याने पैशाची अफरातफर केल्यामुळे त्याचीही नोकरी गेली. शामू स्वतःच्या कुटुंबाला व रामूच्या बायकोला घेऊन आईवडिलांना भेटायला आला. चुकलो म्हणत आई वडिलांच्या पायावर लोटांगण घालतो. आईबापाला खडी फोडायला लावणाऱ्या सायबांनो,आरं तुमास्नी दया - माया हाय का नाय? तुमास्नी आमी आमचं का मानावं? त्या मधू माधवकडं बगा. ती आमची पोरं हायेत. आमा माताऱ्याची सेवा करत्यात.

पुढे श्यामने एका खोलीत स्वतंत्र रहावे. दोन्ही सुनांनी हॉटेलमध्ये काम करावं. पोटं भरावं हे ठरलं. नंतर अचानक हृदयविकाराच्या धक्क्याने गिरीधर बाबा गेले. हा धक्का गिरजाईंना सहन झाला नाही, तिचिही प्राणज्योत मालवली दोघांच्या प्रेताला मधू माधवने अग्नी दिला. रक्ताच्या नात्यापेक्षा जपलेली मानलेली नातीच खरी असतात याची जाणीव करून देणारी ही कथा आहे.

'अनुबंध' ही या संग्रहातील रंजन खरोटे हा शिक्षक असून त्याचे व्यक्तिमत्त्व कसे अष्टपैलू होते. कला,साहित्याचा कशा अनुबंध होता. एक विनोदी इरसाल रंजन खरोटे यांची पत्नी उदार अंतःकरणाची होती.तिचे अचानक निघून जाणे रंजन खरोटेसाठी धक्कादायक बाब होती याचे वेधक चित्रण या कथेत आले आहे.

'सुरूंग' ही कथा भ्रष्ट, अनैतिक, गुंडागिरी करणाऱ्या राजकिय लोकांचे पितळ उघडे करून त्यांना कसे सुरूंग लावले जाते याचे चित्रण या कथेत आले आहे. जय चॅनलचे संचालक प्रणव परिहार हे भूमाफिया, व्याजाने पैसे देऊन गोरगरिबांवर कसे अन्याय करतात. भांडवलदार त्यांना कसे मदत करतात.अशा राजकीय पुढाऱ्यांचे वस्त्रहरण दृकश्राव्य माध्यम, वृत्तपत्र, समाजमाध्यमेच करू शकतात म्हणून पत्रकारितेला लोकशाहीचे चौथे खांब मानले जाते. कसल्याही अमिषाला बळी न पडता 'जय चॅनेल'चे संचालक प्रणव परिहार अभिमानाने, प्रतिष्ठेने आपले कार्य चोखपणे पार पाडतात.

'राबणारे हात' ही कष्ट करून जीवन जगणाऱ्या माणसाला नियतीही साथ देते यांची जाणीव करून देणारी ही कथा आहे. 'जिगरबाज', 'इंधन', 'डॉक्टर कैलास', 'चैतन्ययात्री', 'दौलत' अशा एकापेक्षा एक सरस कथा या संग्रहात आहेत . लोकव्यवहारातील लोकम्हणीचा वापर योग्य ठिकाणी केल्यामुळे या कथा भाषिक अंगाने उजव्या आहेत याची जाणीव होते.

या कथा अनुभवाच्या, सामाजिक जाणिवेच्या आहेत. आपल्या सोबत जगलेल्या, पाहिलेल्या माणसाचे जीवनदर्शन अधिक आपुलकीने, जिव्हाळ्याने घडविल्यामुळे या कथेला गडद रुप प्राप्त झाले आहे त्यामुळे या कथा अधिक भावतात . वेगवेगळ्या आशय अभिव्यक्तीचा कलात्मक आविष्कार म्हणजे या संग्रहातील कथा होतं. आरणीय जगत्पुरिया यांच्या आश्वासक कथालेखनाच्या वाटचालीस शुभेच्छा.... ■ ■

# पाकिस्तानातही अबीर गुलालवर बंदी



२२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. जेव्हा पाकिस्तानच्या लष्कर-ए-तैयबा या संघटनेने हल्ल्याची जबाबदारी घेतली तेव्हा भारत आणि पाकिस्तानमधील संबंध पुन्हा बिघडले. आगामी चित्रपट 'अबीर गुलाल'ला याचा फटका बसत आहे.

दहशतवादी हल्ल्यानंतर भारतात पाकिस्तानी कलाकारांवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. यासोबतच पाकिस्तानी अभिनेता फवाद खानचा 'अबीर गुलाल' हा चित्रपट भारतात प्रदर्शित होऊ दिला जाणार नाही, असे सांगण्यात आले आहे. भारतानंतर आता पाकिस्तानातही 'अबीर गुलाल' चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घालण्यात आली आहे.

पाकिस्तानी अभिनेता फवाद खानवर भारताचा आक्षेप असताना, पाकिस्तानी वितरक भारतीय अभिनेत्री वाणी कपूरचा चित्रपट पाकिस्तानमध्ये प्रदर्शित करण्यास नकार देत आहेत. सतीश आनंद यांच्या मते, या बंदीमुळे चित्रपट निर्मात्यांचे मोठे नुकसान होईल. पहलगाम हल्ल्यानंतर, या चित्रपटाच्या प्रदर्शनाची वेळ आधीच खूपच चुकीची निवडण्यात आली होती.

२२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर, अबीर गुलाल चित्रपटावर बंदी घालण्यात आली आहे, जरी त्याचा निषेध त्यापूर्वीच सुरू झाला होता. या चित्रपटाचा ट्रेलर १ एप्रिल रोजी प्रदर्शित झाला, त्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) या चित्रपटाचा निषेध करण्यास सुरुवात केली. मनसेचे प्रवक्ते अमेय खोपकर यांनी म्हटले होते की, हा चित्रपट कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात प्रदर्शित होऊ दिला जाणार नाही.

सोशल मीडियावर त्यांनी लिहिले की, पाकिस्तानी कलाकारांचा चित्रपट भारतात प्रदर्शित होणार नाही असे अनेक वेळा सांगूनही, काही वाईट लोक जीवन कठीण करत आहेत, अशा लोकांना चिरडणे हे मन सैनिकांचे काम असेल. आम्ही ते करू आणि करत राहू. याचा अर्थ असा नाही की अबीर गुलाल भारतात प्रदर्शित होणार नाही.

फवाद खानच्या चित्रपटाबद्दल शिवसेनेचे ज्येष्ठ नेते संजय निरुपम म्हणाले, 'भारतात पाकिस्तानबद्दल प्रचंड द्वेष आहे. जेव्हा पाकिस्तानातून एखादा चित्रपट प्रदर्शित होतो तेव्हा भारतीय लोकांना तो पहायला आवडत नाही. एका मिनिटासाठी एक-दोन चित्रपट पाहणे ही वेगळी गोष्ट आहे, पण पाकिस्तानी कलाकारांचे चित्रपट भारतीय प्रेक्षकांमध्ये फारसे लोकप्रिय होत नाहीत. म्हणूनच पाकिस्तानी स्टार खेळाडू भारतात कधीही यशस्वी होऊ शकले नाहीत. मी पाकिस्तानी लोकांना सल्ला देईन की भारतीय बाजारपेठ शोधण्याऐवजी त्यांच्याच देशात काम करणे चांगले.

अबीर गुलाल हा चित्रपट ९ मे रोजी प्रदर्शित होणार होता. या चित्रपटात फवाद खान आणि वाणी कपूर मुख्य भूमिकेत आहेत, तर लिसा हेडन, सोनी राजदान, रिद्धी डोगरा, फरीदा जलाल, परमीत सेठी आणि इतर कलाकार सहाय्यक भूमिकांमध्ये आहेत.

या चित्रपटाचे चित्रीकरण २९ सप्टेंबर रोजी लंडनमध्ये सुरू झाले आणि त्याचे दिग्दर्शन आरती एस. बागरी यांनी केले. विवेक अग्रवाल, अवंतिका हरी आणि राकेश सिप्पी हे त्याचे निमार्ते आहेत. या चित्रपटात भारत आणि ब्रिटनमधील अनेक महान कलाकार सहाय्यक भूमिकेत दिसतील.

■ ■ ■ ■

# हिरवी मिरची नव्हे गुणांचा खजिना म्हणा







निरोगी आरोग्यासाठी रोगप्रतिकारकशक्ती चांगली असणे आवश्यक असते. रोगप्रतिकारकशक्ती वाढवण्यासाठी आहारामध्ये पोषक तत्वांचा समावेश करणे गरजेचे असते. जर हिरव्या मिरच्या अन्नपदार्थांमध्ये घातल्या तर चव द्विगुणित होते. लोकांना हिरव्या मिरच्या सॅलड म्हणून खायलाही आवडतात. हिरवी मिरची चवीला तिखट असते, पण ती औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण असते. आयुर्वेदात हिरवी मिरची आरोग्यासाठी फायदेशीर असल्याचे म्हटले आहे.

जर दररोज एक हिरवी मिरची खाल्ली तर ती तुमच्या शरीराला आश्चर्यकारक फायदे देऊ शकते. हिरव्या मिरचीमध्ये व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के आणि इतर अनेक पोषक घटक असतात. हिरव्या मिरच्यांमध्ये बीटा कॅरोटीन आणि अँटी-ऑक्सिडंट्स देखील आढळतात. हिरवी मिरची खाल्ल्याने मधुमेह नियंत्रित होण्यास मदत होते. पोटाच्या आरोग्यासाठीही हिरव्या मिरच्यांचे सेवन फायदेशीर मानले जाते. हिरवी मिरची केवळ डोकेदुखी, थकवा, निद्रानाश यापासून आराम देत नाही तर शरीराला डिटॉक्सिफाय करण्यास देखील मदत करते.

आयुर्वेदात हिरव्या मिरचीला कुमरीचा म्हणतात. हिरवी मिरची खाल्ल्याने आतड्यांमध्ये जमा होणारे बॅक्टेरिया ष्ट होतात. हिरव्या मिरच्यांमध्ये अँटी-ऑक्सिडेंट असतात जे संसर्ग दूर करतात. हिरवी मिरची रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते. दररोज हिरव्या मिरच्या खाल्ल्याने चयापचय वाढतो. हिरव्या मिरचीमध्ये कॅप्सेसिन नावाचा घटक असतो, जो शरीराचे तापमान सामान्य ठेवतो. हिरवी मिरची खाल्ल्याने हृदयरोगाचा धोका कमी होतो आणि हृदयाचे आरोग्य सुधारते.

दररोज एक किंवा दोनपेक्षा जास्त हिरवी मिरची खाऊ नये. जास्त प्रमाणात सेवन केल्याने पोटात जळजळ होऊ शकते. ज्या लोकांना मूळव्याधांची समस्या आहे, पोटात जळजळ, गॅस, अल्सर, आम्लता किंवा आतड्यांशी संबंधित कोणतीही जुनाट समस्या आहे त्यांनी हिरवी मिरची टाळावी. गर्भवती महिला आणि लहान मुलांनीही कमीत कमी प्रमाणात हिरवी मिरची खावी.

हिरवी मिरची रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करते, ज्यामुळे मधुमेहाचा धोका कमी होतो. हिरव्या मिरचीतील कॅप्सेसिन मूड सुधारण्यास मदत करते. हिरव्या मिरचीमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स विविध आजार रोखण्यास मदत करतात. हिरवी मिरचीत व्हिटॅमिन सी, ए आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. हे रोगप्रतिकारशक्ती वाढवतात. ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### महाराष्ट्र दिन ..!

जनतेने दिलेल्या कौलाला
पाच वर्षे जागलच पाहिजे
व्यक्तिपेक्षा पक्ष मोठा
पक्षापेक्षा देश
हे जाणलच पाहिजे ..

महाराष्ट्राच्या राजकारणात
राहिली नाही नितिमत्ता
जो तो गिधाढावाणी पहातो
कशी हस्तगत करता येईल सत्ता

एकमेकांचे पाय ओढण्याची
राज्यात लागलीय शर्यत
विरोधासाठी विरोध करून
देशाचा विकास नसतो घडत ..

# चांदीतील सुलभ गुंतवणुकीसाठी डीएसपी म्युच्यूअल फंडातर्फे डीएसपी सिल्व्हर इटीएफ फंड ऑफ फंड योजनेचा शुभारंभ

**मुंबई, ३० एप्रिल :** डीएसपी म्युच्यूअल फंडाने डीएसपी सिल्व्हर इटीएफ फंड ऑफ फंड या मुदतमुक्त श्रेणीतील योजनेचा शुभारंभ केला आहे. म्युच्यूअल फंडाच्या माध्यमातून चांदी या मौल्यवान धातूमध्ये अतिशय सुटसुटीत आणि सुनियोजित पध्दतीने गुंतवणूक करण्याचा मार्ग हा फंड गुंतवणूकदारांना प्रदान करत आहे. ही नवीन फंड ऑफ फंड प्रकारची योजना डीएसपी सिल्व्हर इटीएफच्या युनिटसमध्ये गुंतवणूक करणार असून त्याव्दारे स्थानिक बाजारपेठेत चांदीच्या कामगिरीनुरूप परतावा प्रदान करणार आहे.
योजनेचा एनएफओ प्राथमिक गुंतवणूकीसाठी खुला झाला असून येत्या ९ मे २०२५ रोजी बंद होणार आहे.
व्यवहारांसाठी डिमॅट खाते उघडण्याच्या आवश्यकतेविना डिजीटल स्वरुपात अतिशय सुटसुटीत पध्दतीने चांदीसारखा मौल्यवान धातूची मालकी प्राप्त करण्याचा फायदा डीएसपी सिल्व्हर फंड ऑफ फंड प्रदान करत आहे. त्याचबरोबर एसआयपीच्या माध्यमातून चांदीत गुंतवणूक करण्याचा अतिशय सुनियोजित मार्गसुध्दा हा फंड प्रदान करत आहे. याव्यतिरिक्त विशिष्ट कालावधीसाठी गुंतवणूक कायम ठेवण्याच्या अटीविना युनिट विक्रीची लवचिकताही हा फंड गुंतवणूकदारांना प्रदान करतो.
डीएसपी म्युच्यूअल फंडाच्या पॅसिव्ह इनव्हेस्टमेंटस अँड प्रॉडक्टसचे प्रमुख आणि सीएफए अनिल घेलानी नवीन फंडाच्या शुभारंभप्रसंगी बोलताना म्हणाले, जागतिक पातळीवर भूराजकीय तणाव आणि अनिश्चिततेच्या काळात चांदी आणि सोन्यासारखे मौल्यवान धातू हे गुंतवणूकदारांसाठी सुरक्षित गुंतवणूक आहे. तसेच सध्याच्या व्यापार युध्द आणि व्यापार शुल्क तणावामुळे महागाई उसळेल, अशी भिती वाटणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी महागाईपासून बचावासाठी हे मौल्यवान धातू बचावाची ढाल आहे. परंतु गुंतवणूकीच्या मागणीबरोबरच चांदीसाठी ५० टक्क्यांपेक्षा अधिक वार्षिक मागणी ही औद्योगिक क्षेत्रातील वापरासाठी आहे. जगभरातील अनेक देश स्वच्छ ऊर्जा आणि नवनवीन तंत्रज्ञानाकडे वाटचाल करत असल्याने ईव्ही वाहने, सौर पॅनेल्स आणि फाईव्हजी नेटवर्क यात चांदीचा औद्योगिक वापर भविष्यात आणखी वाढत जाणार आहे. आपण जर सध्याचे सोने/चांदीचे गुणोत्तर तपासले आणि दीर्घकालीन आकडेवारीशी त्याची तुलना केल्यास, चांदीच्या किमती तुलनेने कमी असल्याचे निदर्शनास येते आणि पुढील काळात चांदी आणखी चमकदार कामगिरीची शक्यता आहे. तथापि, गुंतवणूकदारांनी अल्प-मुदतीत परताव्यात चढ-उतारांची शक्यता गृहीत धरणेसुध्दा आवश्यक आहे.
डीएसपी सिल्व्हर इटीएफ फंड ऑफ फंडचा शुभारंभ करत म्युच्युअल फंडांच्या माध्यमातून चांदीसारख्या मालमत्तेत प्रवेश करणे आम्ही गुंतवणूकदारांसाठी आणखी सोपे करत आहोत. आमचा उद्देश कमोडिटींद्वारे वैविध्य आणि दीर्घकालीन वाढीची क्षमता शोधणाऱ्यांसाठी पारदर्शक, तरल आणि किफायतशीर उपाय प्रदान करणे हा आहे, अशी टिप्पणी डीएसपी सिल्व्हर इटीएफ फंड ऑफ फंडचे फंड व्यवस्थापक दीपेश शाह यांनी याप्रसंगी केली.

# नथिंगच्या या सबब्रँडने तीन एअरबड्ससह सेकंड-जनरेशन स्मार्टफोन सादर केले

**नागपूर, ३० एप्रिल :** नथिंग या लंडनस्थित टेक्नॉलॉजी कंपनीच्या सीएमएफ या सबब्रँडने आज चार नव्या उत्पादनांची घोषणा केली. या ब्रँडतर्फे सीएमएफ फोन २ प्रो, बड्स २, बड्स २ प्लस आणि बड्स २ ही उत्पादने सादर करण्यात आली आहेत.
नथिंगने या वर्षाची सुरुवात दमदार केली. काऊंटरपॉईंट रिसर्च क्यू१ २०२५ इंडिया स्मार्टफोन शिपमेंट अहवालानुसार या तिमाहीत हा ब्रँड भारतात सर्वाधिक वेगाने वाढणारा स्मार्टफोन ब्रँड आहे. या काळात ब्रँडने मागील वर्षीच्या तुलनेत लक्षणीय १५६ टक्के वाढ अनुभवली. सलग पाचव्या तिमाहीत नथिंगने सर्वाधिक वेगाने वाढणारा ब्रँड हे आपले स्थान कायम राखले आहे.
सीएमएफ फोन २ प्रोमध्ये या विभागातील सर्वोत्कृष्ट थ्री कॅमेरा प्रणाली, अप्रतिम ब्राइट डिस्प्ले आणि प्रीमिअम डिझाइन असल्याने सीएमएफ फोन २ प्रो दैनंदिन वापरासाठी अप्रतिम स्मार्टफोन आहे. फक्त ७.८ मिमी. जाड आणि १८५ ग्रॅ. वजन असलेला हा फोन नथिंगचा आजवरचा सगळ्यात पातळ आणि हलक फोन आहे. सीएमएफ फोन १ च्या तुलनेत हा ५ टक्के पातळ आहे.
सीएमएफ फोन २ प्रोमधील थ्री कॅमेरा प्रणालीमध्ये ५० एमपी मेन कॅमेरा आहे. सीएमएफ फोन १ च्या तुलनेत हा कॅमेरा ६४ टक्के अधिक प्रकाश कॅप्चर करतो. दूरवरच्या दृश्यांसाठी यातील ५० एमपी टेलिफोटो लेन्समध्ये २ ऑप्टिकल झूम आणि २० पर्यंत अल्ट्रा झूम मिळते. या विभागातील ही अभूतपूर्व सोय आहे. थोडक्यात सांगायचे तर यातील ८ एमपी अल्ट्रा वाईड कॅमेरा दृश्याचा मोठा परिघ मिळवून देतो. ज्यामुळे भूभागापासून आकाशापर्यंत सर्व काही कॅमेऱ्यात कैद करता येते. तर १६ एमपी कॅमेरामुळे अत्यंत सुस्पष्ट सेल्फीज घेता येतात.
यातील नव्याने अपग्रेड झालेला मीडियाटेक डायमेंसिटी ७३०० प्रो ५जी प्रोसेसर आता सीएमएफ फोन १ च्या तुलनेत १० टक्के जलद प्रोसेसिंग आणि ग्राफिक्समध्ये ५ टक्के अधिक चांगला रिझल्ट देतो. यातील ५००० एमएएच बॅटरी फोन १ च्या तुलनेत एक तास अधिक चालते. सीएमएफ फोन २ प्रो एका चार्जमध्ये दोन दिवस अगदी सहज चालतो. या फोनमध्ये आकर्षक ६.७७ एफएचडी+ लवचिक अमोलेड डिस्प्ले आणि १.०७ दशलक्ष रंग, अल्ट्रा एचडीआर क्षमता आणि ३००० नीट्सचा सर्वोच्च ब्राइटनेस आहे.

# स्टॉक ब्रोकिंगमधील एचडीएफसी सिक्युरिटीजची २५ वर्षे

*मुंबई, ३० एप्रिल : भारतातील आघाडीच्या स्टॉक ब्रोकरपैकी एक असलेल्या एचडीएफसी सिक्युरिटीज स्टॉक ब्रोकिंग उद्योगातील आपला २५वा वर्धापन दिन अभिमानाने साजरा करत आहे. गेल्या काही वर्षांत कंपनी भारतातील पहिली पारंपरिक स्टॉक ब्रोकिंग फर्म ते नवोपक्रमाने प्रेरित डिजिटल-फर्स्ट इन्व्हेस्टमेंट प्लॅटफॉर्ममध्ये रूपांतरित झाली आहे. या संपूर्ण प्रवासात, एचडीएफसी सिक्युरिटीजने तंत्रज्ञान आणि ग्राहक अनुभवात धोरणात्मक गुंतवणूक केली - ज्यासाठी इन्व्हेस्टराईट ॲप आणि एचडीएफसी स्काय - विशेषतः तरुण, डिजिटली जाणकार गुंतवणूकदारांसाठी डिझाइन केलेले मोबाइल-फर्स्ट डिस्काउंट ब्रोकिंग प्लॅटफॉर्म लाँच करून दिले आहे.*
*२००० मध्ये स्थापनेपासून, एचडीएफसी सिक्युरिटीजने उल्लेखनीय वाढ अनुभवली आहे, सातत्याने नवीन टप्पे गाठले आहेत. कंपनीचे ब्रोकरेज उत्पन्न १,२६० कोटी रुपयांच्या सर्वकालीन उच्चांकावर पोहोचले आहे. जे सुरू झाल्यापासून अंदाजे ३.५ कोटी रुपयांपेक्षाही जास्त रकमेने वाढले आहे. त्याचप्रमाणे, एकूण उत्पन्नात प्रभावी वाढ दिसून आली आहे, ज्यामुळे आर्थिक वर्षाच्या अखेरीस ३,२६५ कोटी रुपये झाले आहेत, जे २५ वर्षांपूर्वी ७.७ कोटी रुपये एवढे होते.*
*२५ प्रमुख स्टॉकवर प्रकाश टाकणाऱ्या या अहवालात, भारताच्या आर्थिक मार्गाशी सुसंगत दीर्घकालीन वाढीच्या संधींचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या गुंतवणूकदारांना एक महत्त्वाचे साधन देण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. हे प्रयत्न आमच्या ग्राहकांना समृद्ध आर्थिक भविष्याचे मार्गदर्शन करण्याच्या एचडीएफसी सिक्युरिटीजच्या वचनबद्धतेचे प्रतिनिधित्व करते, असे एचडीएफसी सिक्युरिटीजचे एमडी आणि सीईओ धीरज रेल्ली म्हणाले.*
*आर्थिक साक्षरता ही आर्थिक सक्षमीकरणाची आधारशीला आहे, हे आम्ही जाणतो आणि आमच्या नो युअर मनी या उपक्रमाद्वारे, आम्ही आर्थिक समज आणि समावेशातील अंतर भरून काढण्यासाठी प्रयत्नशील आहोत. माहितीपूर्ण आर्थिक निर्णय घेण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि साधनांनी व्यक्तींना सुसज्ज करण्याचा आम्ही प्रयत्न करतो. भारताला आर्थिकदृष्ट्या लवचिक करण्यासोबतच देशभरातील समुदायामध्ये अर्थपूर्ण प्रभाव पाडण्याच्या आमच्या वचनबद्धतेवर हा उपक्रम भर देतो, असे रेल्ली पुढे म्हणाले. जानेवारी २०२५ मध्ये लाँच झाल्यापासून, 'नो युअर मनी' ने अनेक उल्लेखनीय टप्पे गाठले आहेत. आर्थिक साक्षरता मॉड्यूल आता हिंदी आणि इंग्रजीसह १० भारतीय भाषांमध्ये उपलब्ध आहेत. आर्थिक समावेशन ॲप यशस्वीरित्या सुरू करण्यात आले आहे आणि सरकारी शाळांमधील ५०,००० हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत. पुढील आर्थिक वर्षात २,५०,००० व्यक्तींपर्यंत पोहोचण्याची योजना आहे. देशभरातील २.५ कोटी लोकांना याचा फायदा करून देण्याचा या उपक्रमाचा मानस आहे.*

# वोक्हार्ट हॉस्पिटल्सची जागतिक तंबाखू विरोधी दिना निमित्त तंबाखूविरोधात विशेष आरोग्य मोहीम




**नागपूर, ३० एप्रिल :** तंबाखूचे सेवन हे अजूनही एक गंभीर सार्वजनिक आरोग्याचं संकट आहे, जे अनेक जीवघेण्या आजारांना कारणीभूत ठरतं. हे कॅन्सरचं मुख्य कारण आहे, विशेषतः फुफ्फुसांचा कॅन्सर. पण तंबाखू सेवनाने तोंड, घसा, अन्ननलिका, पोट, ब्लॅडर, किडनी आणि पॅनक्रियाजमध्ये देखील कॅन्सर होण्याचा धोका वाढतो. तंबाखूमुळे क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव पल्मोनरी डिसीज (सीओपीडी), इम्फायसेमा आणि क्रॉनिक ब्राँकायटिस यांसारखे फुफ्फुसांचे आजार होतात. तंबाखूचे सेवनहृदयविकार जसे की हार्ट अटॅक, स्ट्रोक आणि हायपरटेंशन यांना देखील कारणीभूत ठरतो. धूम्रपान प्रतिकारशक्ती कमकुवत करतं, त्यामुळे तंबाखू खाणारे न्यूमोनिया आणि टीबीसारख्या श्वसनविकारांना जास्त बळी पडतात. तंबाखू सेवनाने तोंडाच्या आरोग्यावरही परिणाम होतो जसे की हिरड्यांचे आजार, दातांचा रंग बदलणे आणि यामुळे तोंडाचा कॅन्सरदेखील होतो.
तंबाखूचे प्रजनन क्षमतेवरही वाईट परिणाम होतात. वंध्यत्व, गर्भधारणेतील गुंतागुंत आणि वेळेपूर्वी बाळंतपण होण्याचा धोका वाढतो. तसेच यामुळे लैंगिक कमजोरी, वेळेआधी वृद्धत्व आणि स्किन डॅमेज होते. विशेषतः तंबाखूच्या धुराच्या संपर्कात आलेल्या इतर व्यक्तींनाही हा धोका असतो. विशेषतः लहान मुलांना मोठ्या प्रमाणात श्वसनविकार होतात आणि अचानक होणाऱ्या बालमृत्यूचा (एसआयडीएस) धोका उद्भवतो.
या आरोग्य संकटाला उत्तर म्हणून आणि ३१ मे रोजी साजरा होणाऱ्या जागतिक तंबाखू निषेध दिनानिमित्त, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर संपूर्ण मे महिना 'त्वरित निदान व प्रतिबंधात्मक काळजी' याविषयावर आरोग्यविषयक मोहीम सुरू करत आहे. या मोहिमेची थीम सेव्ह युवर स्मोकर फ्रेंड अँड बिकम ए वॉकहार्ट-नागपूर लाईफ सेव्हर. ही आहे. ही मोहीम १ मे ते ३१ मे २०२५ दरम्यान चालणार आहे.
कार्डियोलॉजी कन्सल्टंट डॉ. नितीन तिवारी म्हणाले, डॉक्टर म्हणून आम्ही दररोज पाहतो की तंबाखू व्यक्तीच्या हृदय आरोग्यावर किती वाईट परिणाम करतो. तंबाखू सेवनाने होणाऱ्या आजारांचे त्वरित निदान झाल्यास अनेकांचे प्राण वाचू शकतात. इंटर्नल मेडिसिन व क्रिटिकल केअर कन्सल्टंट डॉ. जयेश तिमाणे म्हणाले, तंबाखू शरीराच्या महत्वाच्या अवयवांना हळूहळू नुकसान पोहोचवतो. जनजागृती आणि नियमित तपासणी ही अशा आजारांना प्रतिबंध घालण्यातील महत्त्वाची पावले आहेत. वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूरचे सेंटर हेड श्री. रवी बागळी म्हणाले, ही मोहीम म्हणजे आरोग्यदायी नागपूरसाठी आमची बांधिलकी आहे. आपण एकत्र येऊन तंबाखूमुक्त मजबूत समाज निर्माण करू शकतो.
या मोहिमेच्या अंतर्गत वोक्हार्ट हॉस्पिटल्सचे विशेषज्ञ शैक्षणिक चर्चा व डिजिटल जनजागृती मोहीम राबवणार आहेत, ज्यामुळे तंबाखूमुक्त जीवनशैलीला प्रोत्साहन मिळेल. यामध्ये सामाजिक सहभाग वाढवण्यासाठी, ज्या व्यक्तीने किंवा डॉक्टरने सर्वात जास्त असामान्य तपासणीकरता रुग्णांचे रेफरन्स दिले असतील, त्यांना खास सरप्राईज गिफ्ट व एक मोफत आरोग्य कूपन (अटी व शर्ती लागू) देऊन सन्मानित केले जाईल. तसेच त्यांच्या जीवनरक्षक कार्याची दखल घेण्यासाठी त्यांच्याद्वारे दिला गेलेला संदेश वोक्हार्ट हॉस्पिटल्सच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर दाखवला जाईल.

# क्वालिटी वॉल्सकडून दि डेअरी फॅक्टरी हा नवीन आइस्क्रीम ब्रँड बाजारात

**नागपूर, ३० एप्रिल :** आपल्या उत्पादनांना अधिक वैविध्यपूर्ण बनवण्याच्या दृष्टीकोनातून क्वालिटी वॉल्स या ख्यातनाम ब्रँडने घरच्या घरी आइस्क्रीमचा अनुभव अधिक चांगला करण्यासाठी डेअरी फॅक्टरी हे स्लो चर्न्ड आइस्क्रीम्स बाजारात आणले आहेत. डेअरी फॅक्टरी ही खऱ्या दुधापासून बनवलेली उत्तम दर्जाची क्रीमी आइस्क्रीम्सची श्रेणी आहे. त्याचे रिच टेक्श्चर प्रत्येक चवीसोबत जिभेवर रेंगाळते. या आइस्क्रीम्सचे पार्टी पॅक्स आणि सुंदर टब्स चार लोकप्रिय प्रकारांमध्ये उपलब्ध आहेत- व्हॅनिला, बटरस्कॉच, मँगो आणि चॉकलेट. त्यामुळे तुमच्या घरी तुम्हाला उत्तम दर्जाच्या आइस्क्रीमची जादू अनुभवता येईल. ते तुम्हाला जवळच्या स्टोअर्समध्ये आणि क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर उपलब्ध होतील.




मागील अनेक पिढ्यांपासून लोकांना हाताने बनवलेल्या आइस्क्रीम्सच्या चवीचा आनंद घ्यायला आवडतो. आपला अनुभव आणि अद्वितीय चवींचा संगम यांच्याद्वारे डेअरी फॅक्टरी स्लो चर्निंगच्या अनुभवसिद्धतेचा गौरव साजरा करते. त्यात संयम आणि अचूकतेमुळे प्रत्येक स्कूप एक अद्वितीय आनंदात रूपांतरित होतो. ही नवीन श्रेणी अत्यंत संथ वेगाने आइस्क्रीम चर्न करण्याच्या खास तंत्राद्वारे तयार केलेली आहे. त्यामुळे बर्फाचे बारीक खडे तुटतात आणि हवा या मिश्रणात भरली जाते. याचा परिणाम म्हणून एक उत्तम टेक्श्चर आणि वेल्वेटसारखी मऊसूत चव. त्यामुळे तुम्ही अत्यंत हळूहळू, चवीचवीने प्रत्येक घासाचा आनंद घेऊ शकता.
एचयूएलच्या आईस्क्रीम व्यवसायाचे प्रमुख टोलॉय तानरीदागली म्हणाले, आम्ही लोकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यासाठी कार्यरत आहोत आणि प्रत्येकासाठी काहीतरी उपलब्ध व्हावे यासाठी आम्ही सातत्याने नवनवीन उपक्रमांमध्ये गुंतवणूक करत आहोत. आज क्वालिटी वॉल ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी संपूर्ण आणि वैविध्यपूर्ण आनंदाची श्रेणी देते. अगदी चविष्ट आइस्क्रीमपासून ते सुलभ मल्टी-फॉर्मेट फ्रोझन डेझर्ट आणि बरेच काही त्यात आहे. डेअरी फॅक्टरीचे स्लो चर्न्ड आइस्क्रीम हे दुग्धजन्य पदार्थ आणि उत्तम साहित्यापासून बनवलेली एक अद्भुत नावीन्यपूर्ण श्रेणी आहे. त्यातून तुमचा अनुभव समृद्ध होतो, पारंपरिक गोष्टी जपून ग्राहकांच्या आधुनिक आवडीही जपल्या जातात.
लोकांच्या आवडत्या क्लासिक फ्लेवर्सपासून सुरूवात करून डेअरी फॅक्टरी देशभरातील तुमच्या घराजवळच्या क्वालिटी वॉल्स रेफ्रिजरेटरमध्ये उपलब्ध असेल. आम्ही उन्हाळ्यासाठी सज्ज होत असून, सुट्टीसाठीही तयार होत आहोत. त्यामुळे गृहिणी, गोड पदार्थांचे चाहते आणि खवय्यांना या चविष्ट आइस्क्रीम्सचा आनंद घेता येईल.

# एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनल नॅसडॅकवर सूचीबद्ध



**नागपूर, ३० एप्रिल :** जागतिक व्यासपीठावर भारतीय वैद्यकीय तंत्रज्ञानासाठी एक महत्त्वाचा टप्पा गाठत, स्वदेशी एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक सिस्टीमचे निर्माते एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनल नॅसडॅकवर (एनएएसडीएक्यू) सूचीबद्ध झाले आहे.
एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनलचे संस्थापक, अध्यक्ष आणि सीईओ डॉ. सुधीर श्रीवास्तव म्हणाले, नॅसडॅकवर सूचिबद्ध होणे हे एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनलसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे, जो जागतिक दर्जाच्या एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक सिस्टम विकसित करण्यात आमच्या टीमच्या यशाचे प्रतिबिंब आहे. या प्रणालीमुळे जगभरातील रुग्णांना परवडणाऱ्या किमतीत उच्च दर्जाच्या, सुरक्षित आणि प्रभावी आधुनिक रोबोटिक शस्त्रक्रिया उपलब्ध होतात. या 'मेड इन इंडिया फॉर द वर्ल्ड' नावीन्यपूर्णतेसह, आम्ही जागतिक आरोग्यसेवा क्षेत्रात भारताची उपस्थिती मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहोत.
ही नोंदणी अशा वेळी आली आहे जेव्हा आम्ही भारताबाहेर जगभरातील अनेक देशांमध्ये विस्तार करत आहोत. आम्ही आमच्या एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक सिस्टीमसाठी इयू सीई मार्क आणि यूएस एफडीएच्या मंजुरीचा पाठपुरावा करत आहोत आणि २०२५ च्या अखेरीस आणि २०२६ च्या सुरुवातीच्या काळात ही मंजुरी मिळण्याची अपेक्षा आहे. आम्हाला विश्वास आहे की नॅसडॅकवर सूचीबद्ध केल्याने आमच्या नवोपक्रमाबद्दल जागरूकता आणि पारदर्शकता वाढेल, आमचा गुंतवणूकदार आधार वाढेल, शेअर्सची लिक्विडीटी वाढेल आणि जागतिक व्यासपीठावर भारताच्या नवोपक्रमाचे प्रदर्शन करण्यास आम्हाला सक्षम करेल, असे डॉ. श्रीवास्तव म्हणाले.
एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनलने ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या वर्षात प्रभावी आर्थिक वाढ नोंदवली असून या कालावधीत कंपनीचा महसूल गेल्या वर्षीच्या ५.९ दशलक्ष डॉलर्सवरून ३.५ पटीने वाढून २०.६ दशलक्ष डॉलर्स झाला. त्याचप्रमाणे, २०२३ मध्ये एकूण नफा १२.३ टक्क्यांवरून ४०.९ टक्क्यांपर्यंत वाढला. हे आकडे कंपनीच्या मजबूत आर्थिक कामगिरीचे आणि बाजारपेठेतील वाढत्या उपस्थितीचे प्रतिबिंब आहेत.
याव्यतिरिक्त, एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनलने त्यांच्या वैद्यकीयदृष्ट्या प्रमाणित आणि पेटंट केलेल्या एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक सिस्टीमसह लक्षणीय प्रगती केली असून ती देशातील ७५ ठिकाणी ८० रुग्णालयांमध्ये स्थापित करण्यात आली आहे. सोबतच कंपनी नेपाळ, इक्वेडोर, ग्वाटेमाला, फिलिपीन्स, इंडोनेशिया, श्रीलंका, युक्रेन इत्यादी अनेक देशांमध्ये आपला विस्तार करत आहे. एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक सिस्टीमने किफायतशीर उपाय प्रदान करून मोठ्या संख्येने रुग्णांच्या आवाक्यात प्रगत रोबोटिक शस्त्रक्रिया आणल्या आहेत. नजीकच्या भविष्यात युरोप आणि अमेरिकेत विस्तार करण्याच्या योजनांसह एसएसआयायने वैद्यकीय रोबोटिक्समध्ये जागतिक स्तरावरील अग्रणी म्हणून स्वतःची स्थापना केली आहे, ज्यामुळे जगभरातील प्रगत आरोग्यसेवा तंत्रज्ञानात भारताची भूमिका आणखी मजबूत झाली आहे.

# डायबेटिक रेटिनोपॅथीचे व्यवस्थापन: लवकर तपासणी व निदान करत जीवनाचा दर्जा वाढवा

**नागपूर, ३० एप्रिल :** भारतात १०१ दशलक्षहून अधिक व्यक्तींना मधुमेह असण्यास देश जगाची मधुमेह राजधानी ठरला आहे. परिणामत: मधुमेह-संबंधित प्रतिबंध करता येऊ शकणाऱ्या दृष्टी गमावण्याच्या प्रमाणामध्ये मोठी वाढ होताना निदर्शनास आले आहे. डायबेटिक रेटिनोपॅथीसाठी वेळेवर तपासणी करण्यामध्ये, तसेच त्याच्या व्यवस्थापनासाठी ऑफ्थॅल्मोलॉजिस्टकडे (नेत्ररोगतज्ञ) संदर्भ करण्यामध्ये डायबेटोलॉजिस्ट महत्त्वाची भूमिका बजावतात. व्हिटेरो रेटिनल सोसायटी ऑफ इंडिया (व्हीआरएसआय) आणि रिसर्च सोसायटी फॉर द स्टडी ऑफ डायबेटिज इन इंडिया (आरएसएसडीआय) यांनी अद्वितीय डायबेटिक रेटिनोपॅथी स्क्रिनिंग गाइडलाइन्स तयार करण्यासाठी सहयोग केला, ज्या भारतातील प्रत्येक डॉक्टर व डायबेटोलॉजिस्टला त्यांच्या रूग्णांना डायबेटिक रेटिनोपॅथीबाबत माहिती देण्यास मदत करतील.
प्रशांत बावनकुळे, विठ्ठल शल्यचिकित्सक सराक्षी नेत्रालय अध्यक्ष, शैक्षणिक व संशोधन समिती अखिल भारतीय नेत्रविज्ञान समाज, नागपूर, म्हणाले, ''भारतात ७० दशलक्षहून अधिक व्यक्तींना मधुमेह असण्यासह मधुमेह आपल्या देशासाठी मोठे आव्हान बदले आहे. पाचपैकी एका मधुमेही व्यक्तीला त्यांच्या रेटिनामध्ये संसर्ग म्हणजेच डायबेटिक रेटिनोपॅथी (डीआर) असण्याची शक्यता आहे. डीआर सुरूवातीच्या टप्प्यांमधील मूक आजार आहे आणि याच कारणामुळे रेटिनाचे प्रगत नुकसान होत नाही तोपर्यंत त्याचे निदान होत नाही, तसेच नंतरच्या टप्प्यांमध्ये कायमस्वरूपी दृष्टीचे नुकसान होण्याचा धोका वाढतो. भारत सरकारने डीआरच्या लवकर निदानाची सुविधा देण्यासाठी आणि आजारामुळे होणाऱ्या विकृतीला प्रतिबंध करण्यासाठी आपल्या आयुष्मान भारत उपक्रमामध्ये डायबेटिक रेटिनोपॅथी तपासणीचा समावेश केला आहे. आज डॉक्टर, डायबेटोलॉजिस्ट, ऑफ्थॅल्मोलॉजिस्ट यांसारख्या आरोग्यसेवा प्रोफेशनल्सनी एकत्र येऊन सहयोगात्मक प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे, ज्यामुळे सर्वसमावेशक डीआर व्यवस्थापनासंदर्भातील ही मार्गदर्शकतत्त्वे दृढ होतील आणि दृष्टीदोषाला प्रतिबंध होईल.''
जीवनशैलीमधील बदल, शहरांकडे स्थलांतर, लठ्ठपणा आणि तणावामुळे देशामध्ये मधुमेहाने पीडित रूग्णांच्या संख्येत वाढ होत आहे, यासोबत मधुमेह संबंधित दृष्टी गमावण्याच्या केसेसची आकडेवारी देखील वाढत आहे. टाइप-२ मधुमेह श्रमजीवी व्यक्तींमध्ये सामान्य आहे, ज्याचा त्यांचा शारीरिक व मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. वेळेवर या स्थितीची तपासणी केली नाही तर भारतात अंधत्वाचे प्रमाण वाढण्याला प्रमुख कारण ठरू शकते, परिणामत: आर्थिक भार वाढू शकतो. देशामध्ये १२.५ टक्के डायबेटिक रेटिनोपॅथी आणि ४ टक्के दृष्टी गमावण्याचा धोका असलेले 'डायबेटिक रेटिनोपॅथी' असण्यासह जवळपास ३ दशलक्ष भारतीयांना दृष्टी गमावण्याचा धोका आहे. यामधून मधुमेह असलेल्या प्रत्येक रूग्णाने वेळेवर तपासणी करण्याची महत्त्वपूर्ण गरज निदर्शनास येते, ज्यामुळे अपरिवर्तनीय दृष्टी गमावण्याला प्रतिबंध करता येईल. या आजाराकडे सुरूवातीच्या टप्प्यामध्ये दुर्लक्ष केले जाते, ज्यामुळे त्याला 'सायलेण्ट थीफ ऑफ साइट' म्हणजेच 'दृष्टीचा मूक चोर' म्हटले जाते.
ही मार्गदर्शकतत्त्वे मधुमेह असलेल्या व्यक्तींचे पहिले संपर्कव्यक्ती असलेल्या आरोग्यसेवा प्रोफेशनल्सना लवकर निदान व हस्तक्षेपाला चालना देण्यासाठी आवश्यक टूल्स आणि माहितीसह सक्षम करतात, परिणामत: डायबेटिक रेटिनोपॅथीमुळे होणारा तीव्र दृष्टीदोष व आंधळेपणाचा धोका कमी होतो.

# सेन्को गोल्ड अॅण्ड डायमंड्सने नागपुरातील पहिल्या स्टोअरसह अस्तित्व केले वृद्धिंगत

**नागपूर, ३० एप्रिल :** सेन्को गोल्ड अॅण्ड डायमंड्स या भारतातील एका सर्वात मोठ्या आणि सर्वाधिक विश्वासार्ह ज्युलरी रिटेल चेनतर्फे अत्यंत अभिमानाने नागपुरातील त्यांच्या पहिल्या स्टोअरच्या अनावरणाची घोषणा करण्यात आली आहे. हे नवे स्टोअर या ब्रँडचे महाराष्ट्रातील आठवे तर भारतातील १७५ वे स्टोअर असल्याने हा उद्घाटनसोहळा म्हणजे महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. विशेष म्हणजे हे सेन्को गोल्ड अॅण्ड डायमंड्सचे राज्यातील पहिले फ्रँचाईझी स्टोअर आहे.





या प्रसंगी सेन्को गोल्ड अॅण्ड डायमंड्सच्या संचालक श्रीमती जोइता सेन म्हणाल्या, समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि दागिन्यांवरील प्रेमासाठी ओळखल्या जाणाऱ्या नागपूरमध्ये सेन्को गोल्ड अॅण्ड डायमंड्स सुरू करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. हे स्टोअर आमच्या प्रवासातील एक महत्त्वाचा अध्याय आहे. दर्जेदार कारागिरी, विश्वास आणि ग्राहकांचा आनंद याबद्दलची बांधिलकी जपत आम्ही फ्रँचायझी भागीदारीद्वारे आमची उपस्थिती वाढवत आहोत.
सेन्को गोल्ड अॅण्ड डायमंड्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुवांकर सेन म्हणाले, महाराष्ट्रात आमचे पहिले फ्रँचायझी-संचालित स्टोअर उघडणे हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. नागपूर ही एक वेगाने वाढणारी बाजारपेठ आहे आणि या फ्रँचायझी भागीदारीद्वारे, आम्ही अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचू इच्छितो आणि त्यांना विविध प्रकारचे सुंदर दागिने देऊ इच्छितो. आमच्या ग्राहकांना एक उत्तम खरेदी अनुभव देण्यासाठी आणि त्यांच्याशी दृढ, दीर्घकालीन संबंध निर्माण करण्यासाठी वचनबद्ध आहोत.
नागपुरातील सेन्को गोल्ड अॅण्ड डायमंड्स स्टोअरचे फ्रँचायझी देवेश लालदला यांनी आपला उत्साह व्यक्त करताना म्हटले की, सेन्को गोल्ड अॅण्ड डायमंड्सच्या यशोगाथेचा भाग होण्यासाठी आणि या प्रसिद्ध ब्रँडला नागपूरमध्ये आणण्यासाठी मी खूप उत्सुक आहे. शहरातील ग्राहकांना या ब्रँडच्या उत्कृष्ट दागिन्यांचे कलेक्शन आणि अतुलनीय सेवा देण्याची संधी आम्हाला या फ्रँचाईझी भागीदारीमुळे मिळाली आहे. त्यांच्या सर्व दागिन्यांच्या गरजांसाठी एक विश्वासार्ह ठिकाण बनण्यास आणि दृढ, दीर्घकालीन संबंध निर्माण करण्यास आम्ही उत्सुक आहोत.

## राशीभविष्य

**मेष :** जुन्या न्यायालयीन खटल्याचा निर्णय तुमच्या बाजूने लागेल. आज बँकेत जमा केलेल्या भांडवलात वाढ होईल. सरकारी मदतीने शेतीशी संबंधित काही महत्त्वाची कामे पूर्ण होतील.
**वृषभ :** आज तुम्हाला जवळच्या मित्राकडून पाठिंबा आणि साथ मिळेल. जुन्या प्रेमसंबंधात पुन्हा जवळीक निर्माण होऊ शकते. जे आनंद देईल. प्रेमविवाहाचे स्वप्न पाहणाजयांचे हे स्वप्न पूर्ण होऊ शकते.
**मिथुन :** आज तुम्हाला काही महत्त्वाचे काम करण्यात यश मिळेल. कामाच्या ठिकाणी तुमच्या धाडसाचे आणि शौयार्चे कौतुक होईल. नोकरीत काही महत्त्वाच्या कामाची जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे.
**कर्क :** तुम्हाला चांगले आर्थिक लाभ मिळतील. कामाच्या ठिकाणी काही विरोधक किंवा शत्रूमुळे तुम्हाला मोठे आर्थिक यश मिळेल. प्रेमसंबंधांमधील तणाव दूर होईल. प्रेमसंबंधात जवळीक वाढेल.
**सिंह :** राजकारणात तुम्हाला एखाद्या महत्त्वाच्या मोहिमेचे नेतृत्व करण्याची संधी मिळू शकते. घाबरलेल्या लोकांना त्यांच्या आजाराबद्दलच्या भीती आणि गोंधळापासून मुक्तता मिळेल. आरोग्य सुधारेल.
**कन्या :** आज तुम्हाला आजोबांकडून चांगली बातमी मिळेल. शत्रूचा पराभव करण्यात तुम्ही यशस्वी व्हाल. क्रीडा स्पर्धेत यश मिळेल. व्यवसायातील परिस्थिती सुधारेल.
**तुळ :** वैवाहिक जीवनात विशेष आकर्षण असेल. आज तुमचे आरोग्य चांगले राहील. कोणत्याही गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या लोकांना आराम मिळेल. आज आर्थिक बाबी काहीशा चिंताजनक असतील.
**वृश्चिक :** अनावश्यक धावपळ आणि ताणामुळे त्रास होऊ शकतो. तुम्हाला काही हंगामी आजार होऊ शकतात. आज तुमची आर्थिक परिस्थिती सुधारेल. उधार दिलेले पैसे परत मिळतील.
**धनु :** तुमच्या व्यवसायात परिश्रमपूर्वक काम करा. चांगला नफा होईल. पशुपालनाच्या कामात गुंतलेल्या लोकांना यश मिळेल. जनावरांच्या खरेदी-विक्रीतून आर्थिक फायदा होईल.
**मकर :** आज आईची खूप आठवण येईल. त्यांच्यापासून दूर राहणे तुमच्यासाठी वेदनादायक ठरेल. प्रेमसंबंधात जवळीकता येईल. आज तुम्ही तुमच्या प्रेमविवाहाच्या योजना तुमच्या कुटुंबातील सदस्यांना सांगू शकता.
**कुंभ :** कोणत्याही मानसिक आजाराने ग्रस्त असलेल्या लोकांना योग्य उपचार आणि कुटुंबातील सदस्यांकडून चांगली काळजी घेतल्यास आराम मिळेल. तुम्हाला अपार आनंद मिळेल.
**मीन :** आज आरोग्यात काही चढ-उतार येतील. कोणत्याही गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या लोकांना सरकारी मदत मिळेल. आज, कोर्ट केसमध्ये यश मिळाल्याने, एक मोठा भार कमी होईल.

## शब्दकोडे क्रमांक २१०१



**आडवे शब्द :-**
१) कारण
४) नाजूक, कोवळा
६) कैद
८) सोपे
११) एकाग्र नजर
१२) न्याय
१३) सामान
१४) दह्याचे पातळसर पेय
१५) डीर
१६) एक काटेरी आंबटगोड कंद
१९) पवित्र
२२) अंगठा व तर्जनी या मधील अंतर
२३) रमापती
२५) प्रजाजन
२६) वाकलेला
२७) अथवा
२८) पुष्पदल
२९) जंगलातील प्राणी
३२) खानदान
३३) मीठाची चव
३४) श्रीकृणाचे एक नाव
३५) पृथ्वीभोवतीचे हवेचे आवरण
३८) गंध,
३९) विरोध, प्रतिबंध
४०) व्यापारी नफा
४२) शोभणारा
४४) पातक
४७) खटला
४८) श्रेष्ठ पुरुष
५०) एक गड्डा भाजी
५३) केविलवाणा
५५) बडबड त्रास
५६) रुची, स्वाद
५७) वसुंधरा
५८) केसांना लावण्याचा रंग
६०) एक मराठी महिना
६१) मृत्यू नसलेला
६३) नाश पावणारे
६४) इंद्र
६६) मत्सर
६७) अरण्यवास
७१) राबता,
७३) जनन
७४) सत्ता
७६) मनाचा ओढा
७७) काव्य करणारा
७८) उष्ण
७९) दारूचा एक प्रकार

**उभे शब्द :-**
२) मोठे डोळे
३) बगळा
५) चिंतन
६) शेराचा आठवा भाग,
७) अर्धवर्तुळाकार
९) वल्लरी
१०) तीव्र भूक, वखवख
१७) नाकावरील मोत्याचा दागिना
१८) बाजूला होणे
२०) वरपांगी
२१) मुलींच्या खेळण्यातील एक वसस्पतीचे फळ
२४) बनकर
२५) नृत्य
२६) मेणा, पालखी
२८) पारद
३०) नृत्यकलेचे दैवत
३१) मालाचे येणेजाणे
३२) मोठा हातोडा
३३) विशेष
३६) धातूचा धागा
३७) रममाण
३८) शाब्दिक चकमक
४१) जेव्हा (सं.)
४२) खोटे कारण लपविण्यासाठी केलेला प्रयत्न
४३) अरण्य
४४) एक चतुर्थांश
४५) पुन्हा पुन्हा
४६) एक उष्ण सुगंधी पेय
४९) धोबी
५०) अभिनेता
५१) लटकट ठेवणे, अधांतरी ठेवणे
५२) चमक, मुरगळा
५४) मऊ
५५) कारस्थान
५९) लाख, अवधान
६१) अवास्तव
६२) लबाडीचा हेतू
६५) शिक्षा
६८) दृष्टी
६९) मनाला टोचलेले दुःख
७०) शपथ
७२) जपानी चलन
७५) दिवस, घाव

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दि | गं | ब | रा | दि | गं | ब | रा | श्री | पा | द | व | ह्ल | भ | |
| व | | क | स | | गा | ळ | णी | | क | र | डा | | ग | र्व |
| स | द | रा | | म | ध | | व | र | ळी | | ची | त्का | र | |
| | ह | | स | म | र | स | | म | | क | सा | | | शं |
| अ | स | मा | न | ता | | रा | जा | रा | णी | | ल | ख | ला | भ |
| प | | सा | द | | ता | ई | | ट | | | पिं | | ज | र |
| ह | र | | शी | र | | त | वा | | उ | प | प | द | | वे |
| र | वि | वा | र | | वा | | क | ल | मा | | ळ | | पो | ळ |
| ण | | न | | उ | | पा | डा | व | | क | ला | व | र | |
| | ज | व | ळ | पा | स | | ति | | नं | द | ला | ल | | द |
| क | ळ | सा | | ख्य | | चा | क | व | त | | व | | म | ई |
| सा | ज | | अ | | | रो | डा | | र | च | णे | | क | |
| ब | ळी | तो | का | न | पि | ळी | | वि | | ल | | स | ब | जा |
| सा | त | | र | | त | | ग | जा | न | न | म | हा | रा | ज |
| | | पा | ण | थ | ळ | | वा | र | स | | जीं | | | म |

## कटकवार विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा राष्ट्रीय सन्मान

### भारत उद्योग पुरस्कार २०२५ ने सन्मानित

**साकोली, दि. ३० एप्रिल :** कृष्णमुरारी कटकवार विद्यालय साकोली च्या माजी विद्यार्थी पंकज लंजे यांच्या ट्रान्सपॉवर सोल्युशन कंपनीला 'भारत उद्योग पुरस्कार २०२५' च्या 'इमर्जिंग सोलर टेक' विभागात सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार प्रसिद्ध अभिनेत्री अमिषा पटेल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

पंकज लंजे यांचं मूळ गाव चारगाव आहे. त्यांचं वर्ग पाच ते दहा पर्यंतचे शिक्षण कृष्णमुरारी कटकवार विद्यालय साकोली येथे झाले. त्याने इलेक्ट्रॉनिक्स मध्ये बीई केले. २०१३ मध्ये पंकज मुंबईमध्ये गेले. त्यांनी एका लाइटिंग कंपनीमध्ये जॉब केलं. चार वर्षाचा अनुभव घेतल्यानंतर त्यांनी ट्रान्सपॉवर सोल्युशन या स्टार्टअप ची स्थापना २०१७ मध्ये केली. आज ट्रान्सपावर सोलुशन ही कंपनी शासकीय प्रकल्प, प्रमुख हॉस्पिटल, हॉटेल्स आणि रियल इस्टेट क्षेत्रातील मोठ्या कंपन्यांसोबत प्रकल्प राबवत आहे. हा पुरस्कार म्हणजे आमच्या संपूर्ण प्रवासाची पावती आहे. संघर्ष, संधी आणि संयम याची कहाणी आहे.

ही कंपनी एलईडी व सौर ऊर्जा आधारित प्रकाशयोजना क्षेत्रातील एक नामांकित कंपनी बनली आहे.



# प्रत्येक गावाला कायमस्वरूपी पिण्याचे पाणी आणि जनावरांना पिण्याची पाण्याची तात्काळ उपाय योजना करा - खा.डॉ.प्रशांत पडोळे

***एकही गाव जिल्ह्यातील पाण्यासाठी वंचित राहता कामा नये याची खबरदारी घ्या.**
***पाणी टंचाई बाबत जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा येथे बैठक घेण्यात आली.**

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा, दि. ३० एप्रिल :** बैठकीत जिल्ह्यातील गावांची पाणी टंचाई बाबत विचारणा करण्यात आली. आज मंगळवार दिनांक २९ एप्रिल २०२५ ला जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा येथे घेण्यात आली.

बऱ्याच गावात पाणी टंचाई मोठ्या प्रमाणात आहे. परंतु जलजिवन मिशन योजनेअंतर्गत बऱ्याच गावात अपुरे कामे राहिलीत, तर कुठे पाण्याची टाकीचे, तर काही ठिकाणी पाईप लाईनचे काम अधूरे असल्याचे समजते. नाग नदीच्या दूषित पाणी आपल्या येते येत असल्याने कोणत्याच प्रकारची आपण उपाय योजना करू शकले नाहीत ही शोकांतिका आहे.

भंडारा जिल्ह्यात बरेच गावात पाणी टंचाईचे सावट निर्माण झाले आहे. हात बोअरवेलला पाणी नाही, विहिरी, नदी, नाले, बंधारे, तलाव कोरडे पडलेले आहेत. पाण्याची पातळी खोल्यात गेली आहे. तलावाचे खोलीकरण केल्या गेले नाही. गाळ किती तयार झाली आहे. शासकीय विहिरीचे उपसा अजून प्रर्यंत केला गेला नाही. किती ठिकाणी विजेचा पुरवठा आहे, खंडित किती आहे, अतिक्रमण कडे तुमचे लक्ष नाही.

जनावरांसाठी पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. शेतकरी तसेच पशुपालन व्यवसाय करणाऱ्यांना मोठा प्रश्न पडतो आहे. पाणी पुरवठा अधिकारी नेहमीच उडवाउडवीत उत्तरे देत राहिलीत. बऱ्याच गावात तीन ते चार महिने पाणी टंचाई नेहमीच निर्माण होत राहिली परंतु नियोजनात आपण त्या गावांना का वंचित ठेवली सांगा जिल्हाधिकारी महोदय ? आज पाण्यासाठी भटकंती निर्माण झाली आहे, किती दिवस सहन करायचे, प्रत्येक वर्षी उन्हाळा आला की पाण्याची समस्या कायम राहिली आहे साहेब, परंतु आपण कायम स्वरुपी उपाय योजना करू शकले नाहीत ही शोकांतिका आहे.



बऱ्याच गावातून मला पाण्यासाठी कॉल येत असतात. गेल्या चार महिन्यांपासून जिल्हाधिकारी महोदय तुम्हाला पाणी टंचाई बाबत पूर्व सूचना केली आहे, परंतु उपाय योजना न करता आपण पाण्यासाठी गांभीर्य नाहीत. गावकऱ्यांना पिण्याचे पाण्याची तपासणी करा. जलजिवन मिशन योजना फसवी असली तरी विशिष्ट लोकांच्या घशात जास्त घुसली, प्रादेशिक योजना बंद आहेत, जलयुक्त शिवार योजनेचे तीन तेरा वाजले दिसते. हर घर नल योजना फसवी निघाली, कारण नळाला पाणीच नाही, जनतेमध्ये तीव्र रोष असते. अधूरे काम पूर्ण करा, नवीन कामाला गती द्या पण लोकांना पिण्याचे पाणी मिळू द्या. नवोदय शाळेतील पाणी टंचाई दूर करा. ना पिण्याचे पाणी ना वापराचे पाणी मिळत, पाच दिवस तेथील विद्यार्थी आंघोळ करू शकले नाहीत, तेथील बाथरूम आणि शौचालय अस्वच्छतेने पसरले होते. रोगराईचे सावट निर्माण झाले आहे.

स्वतः भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ.प्रशांत पडोळे यांनी रात्री अडीच वाजता जावून शौचालयाची स्वच्छता केली. तेथील प्राचार्य हे विद्यार्थ्यांना दबावात ठेवतात हा प्रकार स्वतः अनुभवला. गावांची पाणी टंचाई बाबत यादी दिली आहे. त्यावर तात्काळ उपाय योजना करा, त्या गावाला भेट द्या. मला अहवाल कळवा. भंडारा जिल्हाधिकारी यांना पाणी टंचाई बाबत गांभीर्य घेण्याचे निर्देश केले. शहरात असो ग्रामीण भागात पाणी टंचाई कायम आहे. यावर लक्ष केंद्रित करून त्या-त्या गावा भेट द्या. टँकरने किती दिवस पाणी देणार हा काही उपाय नाही. नवीन योजना राबवा, शासनाला तात्काळ पाणी पुरवठा उपाय योजना बाबत प्रस्ताव पाठवा. माझे सहकार्य नेहमीच असेल असेही यावेळी भंडारा- गोंदिया लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांनी यावेळी सांगितले.

## समता सैनिक दलाचे ५ दिवसीय उन्हाळी प्रशिक्षण शिबिर संपन्न



**महासागर प्रतिनिधी**
**साकोली, दि. ३० एप्रिल :** समता सैनिक दल साकोली तालुकास्तरीय प्रशिक्षण शिबिर दिनांक २५ एप्रिल ते २८ एप्रिल २०२५ पर्यंत दिवंगत प्रज्ञाज्योती धम्मकुटी आलेबेदर साकोली येथे घेण्यात आले

त्याचे उद्घाटक पाहुणे म्हणून राष्ट्रीय अध्यक्ष दादासाहेब कोचें यांनी केलें तर अध्यक्षस्थानी राष्ट्रीय स्टाफ ऑफिसर गजेंद्र गजभिये कुवरलाल, रामटेके,आर सी फुलके, असिस्टंट जि ओ सी सी डी गवरे, समता सैनिक दलात भंडारा अधिकारी कैलास गेडाम, महाराष्ट्र भूषण डी जी रंगारी ,रोशन फुले, प्रज्ञाताई दिर्बुदे ,दादू बडोले ,दीपक मेश्राम इत्यादी मान्यवर उपस्थित संपन्न झाला

तर २६ तारखेला भीमगीत प्रभात व विपश्यना विषयी मार्गदर्शन गजेन्द्र गजभिये यांनी केले स्पर्धा परीक्षा बद्दल मार्गदर्शन तहसीलदार निलेश कदम यांनी केले .

जंगल व प्राण्यांबद्दल माहिती सहाय्यक व उपवन संरक्षण संदेश मेंढे, समता सैनिक दलाविषयी माहिती आर सी फुलके यांनी मार्गदर्शन दिनांक २७ तारखेला सुद्धा डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधान व प्रश्नमंजुषा प्रा शंकर बागडे त्यानंतर अंधश्रद्धा निर्मूलन व वैज्ञानिक दृष्टिकोन बद्दल माहिती सामजिक कार्यकर्ते तनुजा नागदेवे यांनी दिली तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर बद्दल माहिती सुद्धा तनुजा नागदेवे यांनी दिले दिनांक २८ एप्रिल तारखेला समारोपीय कार्यक्रम घेण्यात आले कार्यक्रमाचे संचालन शिबिर प्रमुख चिरंजीव बारसागडे यांनी केले.

याप्रसंगी जनसंपर्क अधिकारी साकोली ते प्रतिमा राऊत, तालुकाप्रमुख ज्योति शहारे, ट्रेनिंग चीप स्वप्ननिल गणवीर, बादशहा मेश्राम, गायत्री टेंभुर्ण, मंजुषा खोब्रागडे ,कल्पना सागोडे, प्रतीमा राऊत , प्रमिला टेंभुर्कर ,त्याचप्रमाणे प्रमुख म्हणून चिरंजीव बारासागडे शिबीर उपप्रमुख म्हणून आशा खोब्रागडे ,महिला शिबिर प्रमुख कविता जांभुळकर ,सांस्कृतिक प्रमुख म्हणून गुलाब नंदेश्वर या सर्वांनी मार्गदर्शन केले.

## सुसंस्कार शिबिराचा आनंदोत्सव उद्घाटन सोहळा

**साकोली :** अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या व नई तालीम समितीच्या तत्व प्रणालीनुसार श्री गुरुदेव सुसंस्कार गुरुकुल प्रकल्प पळसगाव सोनका याद्वारे साकोली तालुक्यातील मार्तंड राव पाटील कापगते विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय जांभळी सडक येथे स्व. मार्तंडराव पाटील कापगते यांच्या स्मरणार्थ १२ दिवसांच्या सुसंस्कार उन्हाळी शिबिराचे थाटात उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी उद्घाटक म्हणून पंचायत समिती सदस्य होमराज कापगते ,प्राचार्य अर्चना बावणे, सरपंच विलास नंदुरकर, प्रतिमा वरठी ,समीर कोरे ,पर्यवेक्षक रुपेश कापगते



यांच्या प्रमुख उपस्थितीत या शिबिराचा उद्घाटनिय सोहळा पार पडला. या शिबिर स्थळी धर्मसमभाव, बौद्धिक ध्यान व प्रार्थना ,भजन संगीत, योग ,प्राणायाम, मल्लखांब, लाठीकाठी ,रामधून, स्वच्छता, शेती , ग्रामोद्योग अशा विविध पैलू वर भर देण्यात आला आहे. हे शिबिर हसत खेळत संस्कारीत करणारे ठरले असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या शिबिराचे संयोजक प्राचार्य अर्चना बावणे व प्रा सहसराम बनसोड यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## प्रलंबित मानधनासाठी संघटना आक्रमक : मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन

### संगणक परिचालकांचे कामबंद आंदोलन सुरू

**महासागर प्रतिनिधी**
**सिहोरा, दि. ३० एप्रिल :** जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये कार्यरत असलेल्या सुमारे ५५० संगणक परिचालकांनी मागील अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या मानधनाच्या प्रश्नावरून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. यासंदर्भात संगणक परिचालक संघटनेच्यावतीने सोमवारी (दि.२८) ला जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदन गटविकास अधिकारी पंचायत समिती, जिल्हाध्यक्ष सरपंच संघटना, जिल्हाध्यक्ष ग्रामपंचायत अधिकारी संघटना, तसेच ग्रामपंचायत सरपंच व सचिव यांच्याकडेही सादर करण्यात आले. मागण्या तातडीने पूर्ण न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष सचिन खंगार यांनी दिला आला.

माहे डिसेंबर २०२४ पासून आजतागायत एकही महिन्याचे मानधन न मिळाल्यामुळे परिचालकांवर उपासमारीची वेळ आली आहे. काही परिचालकांचे जुलै २०२४ पासूनचेही मानधन प्रलंबित आहे. सततच्या कामानंतरही मानधन न मिळाल्याने संगणक परिचालकांचे जीवन असह्य झाले आहे. त्यामुळे आर्थिक व मानसिक त्रास सहन करत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदन देतेवेळी जिल्हाध्यक्ष सचिन खंगार, सचिव रुपेश मोहतुरे, पवनी तालुकाध्यक्ष दिगंबर वंजारी, साकोलीचे पद्माकर तरोने, मोहाडीचे किशोर मोहनकर, राजेश गजभिये, तुमसरचे विनोद तुरकर, खेमेंद्र राणे, भंडाऱ्याचे नवनीत बेहरे, लाखांदूरचे तेलमासरे आदी उपस्थित होते.



***कामबंद आंदोलनाचा फटका :***
या आंदोलनामुळे ग्रामपंचायत स्तरावर होणाऱ्या ऑनलाइन तसेच ऑफलाइन कामकाजावर मोठा परिणाम होणार आहे. विविध शासकीय सेवा व योजना प्रभावीत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

***संघटनेच्या मुख्य मागण्या :***
डिसेंबर २०२४ ते मार्च २०२५ पर्यंतचे थकीत मानधन त्वरित अदा करावे. जुलै २०२४ पासून तांत्रिक अडचणीमुळे थांबलेले मानधन त्वरित द्यावे. एप्रिल २०२५ पासून संगणक परिचालकांचे मानधन ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयानुसार निश्चित करावे. महाऑनलाइन व सीआयडी प्रणालीमध्ये संगणक परिचालकांचे नावे अधिकृतपणे नोंदवावे. संगणक परिचालकांवर अतिरिक्त कामाचा बोजा लादू नये.

### सरपंच व उपसरपंच पदाचे आरक्षण ठरविण्याबाबत सभा आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**पवनी, दि. ३० एप्रिल :** तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींना कळविण्यात येते की, सन २०२५ ते २०३० या कालावधीतील ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकांच्या अनुषंगाने, सरपंच व उपसरपंच पदांचे आरक्षण मुंबई ग्रामपंचायत निवडणूक अधिनियम १९६४ मधील कलम २ अ नुसार सोडतीद्वारे निश्चित करण्यात येणार आहे.

या आरक्षण प्रक्रियेमध्ये महिलांसाठी ५०टक्के पदे आरक्षित ठेवण्याची अट आहे. त्यामुळे दिनांक ०६ मे २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसिल कार्यालय, पवनी येथे आरक्षण सोडतीसाठी सभा आयोजित करण्यात आलेली आहे.

संबंधित ग्रामपंचायतीमधील सर्व नागरिकांनी व हितधारकांनी यावेळी उपस्थित राहावे, असे आवाहन तहसिलदार, पवनी यांच्यावतीने करण्यात येत आहे.

## रोजगार हमी कामे तात्काळ सुरू करा : चेतन बोरकर

***ग्रामसेवकांच्या टाळाटाळीला पायबंद घाला *कामगारांच्या हक्कासाठी बहुजन समाज पार्टी आक्रमक**

**महासागर प्रतिनिधी**
**लाखांदूर, दि. ३० एप्रिल :** तालुक्यातील बांधकाम कामगार आणि गरीब कुटुंबांची होत असलेली अडचण लक्षात घेता, बहुजन समाज पार्टीचे तालुकाध्यक्ष चेतन नेपाल बोरकर यांच्या नेतृत्वात आज पंचायत समिती लाखांदूर येथे गटविकास अधिकारी धारगावे साहेब यांना दोन निवेदने सादर केली.

बांधकाम कामगार नोंदणीच्या प्रक्रियेत ग्रामसेवकांकडून होणाऱ्या टाळाटाळीचा समाचार घेत चेतन बोरकर यांनी स्पष्ट शब्दात सांगितले की, 'कामगारांच्या नोंदणीसाठी ९० दिवसांच्या कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. मात्र काही ग्रामसेवक जाणीवपूर्वक प्रमाणपत्रावर स्वाक्षरी टाळत आहेत. ही बाब कामगारांच्या उपजीविकेवर घाला घालणारी आहे आणि अशा ग्रामसेवकांवर तात्काळ शिस्तभंगाची



कारवाई करावी.'

कामगारांच्या हक्कांच्या सुरक्षेसाठी ग्रामसेवकांना स्पष्ट आदेश देऊन तात्काळ प्रमाणपत्र देण्यास भाग पाडावे, अन्यथा बहुजन समाज पार्टी संघर्षाला सज्ज असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

त्याच बरोबर, लाखांदूर तालुक्यात रोजगार हमी योजनेतील कामे अद्याप सुरू न झाल्याने 'शेती हंगाम संपल्यावर मजुरांपुढे उपासमारीची वेळ आली आहे. रोजगार हमीच्या कामांची तातडीने सुरूवात झाली नाही, तर सामान्य जनतेच्या रस्त्यावर उतरल्याशिवाय पर्याय राहणार नाही,' असा ठाम इशारा त्यांनी दिला. बहुजन समाज पार्टी लाखांदूर नी पुढील ठाम मागण्या केल्या: तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये तातडीने कामे सुरू करावीत,कामांची जाहिरात गावोगावी करून लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवावी, महिला, अनुसूचित जाती-जमाती व दुर्बल घटकांना विशेष संधी द्यावी, कामांच्या ठिकाणी पाणी, छाया व साधनांची योग्य सोय करावी.

'कामगारांच्या हक्काशी खेळ माफक केला जाणार नाही. प्रशासनाने त्वरित योग्य निर्णय घ्यावे अशी बहुजन समाज पार्टी लाखांदूर तर्फे निवेदना मार्फत मागणी करण्यात आली आहे. निवेदन देतेवेळी तालुकाध्यक्ष चेतन बोरकर, जिल्हा सचिव सोपान दिवठे, चंद्रमणी गोंडाने जिल्हा प्रभारी, मा.सा. विधा. अध्यक्ष नितीन मेश्राम, सौरभ नंदेश्वर ,मनीष बंसोड, विश्वजीत सुखदेवे, प्रणय मेश्राम, उमेश कांबळे, स्वागत मेश्राम, निलेश नंदेश्वर, उत्तम नंदेश्वर उपस्थित होते.

# अर्धशतकापासून कृषी उत्पन्न बाजार समितीत सभापती पदाला हुलकावणी

### साकोलीतील कृषी समिती सभापती पदाचा गुंता सुटला!

**महासागर प्रतिनिधी**
**साकोली, दि. ३० एप्रिल :** साकोली विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात वित्त व नियोजन मंत्र्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणात' एक तालुका एक बाजार समिती योजनेची घोषणा केली गेली होती. ह्या घोषणेला निर्णायक स्वरुप देण्यात आल्याने साकोली कृषी उत्पन्न बाजार समितीमधील तब्बल ५३ वर्षानंतर सभापती पदाचा गुंता सुटणार आहे. गत अर्ध शतकापासून साकोली तालुक्यातील कृषी समिती संचालकांना सभापती पदाची हुलकावणी मिळत होती. सद्यस्थितीत राज्यात ३०५ कृषी उत्पन्न बाजार समिती असून ३५८ तालुके आहेत. त्यापैकी ६८ तालुक्यांमध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती अस्तित्वात नव्हत्या. मात्र कृषी कृषी उत्पन्न (विकास व विनियम) अधिनियम १९६३ मधील तरतुदीनुसार मुख्यमंत्री बाजार समिती योजने अंतर्गत तालुकास्त रावर नवीन बाजार समिती स्थापन करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. यामुळे साकोली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांसाठी सभापती पदाची सोनेरी संधी नव्याने चालून आलेली आहे. नव्या निणऱ्यानुसार लाखनी बाजार समितीमध्ये समावेश



असलेल्या साकोली व सानगडी यांचे विभाज न होऊन नव्याने साकोली बाजार समितीची निर्मिती होणार आहे. तब्बल ५३ वर्षापासून साकोली तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीत साकोली तालुक्यातील संचालकांना सभापती पद हुलकावणी देत होते. अर्धशतक उलटूनही तालुक्यात शून्याची बेरीज होऊ शकली नसल्याने तालुक्यात कृषी उत्पन्न बाजार समितीत सभापती पदाचे एक प्रकारे राजकीय ग्रहण लागल्याचे दिसून येत होते. जिल्ह्यात या आधी जे काही जुने तालुके अस्तित्वात होते त्यात साकोली तालुक्याचा समावेश होता आणि त्यातूनच लाखनी तालुक्याची नव्याने निर्मिती झाली. वास्तविक पाहता यापूर्वी साकोली तालुक्यात लाखनीचा समावेश होता, मूळ कृषी उत्पन्न बाजार समितीचे कार्यालय साकोलीत आहे.

कालांतराने साकोली तालुक्यातून लाखनी वेगळी होऊन लाखनी तालुक्याची निर्मिती झाली आणि तालुका वेगळा झाला. परंतु नंतर मात्र तत्कालीन राजकारणाने उचल खाल्ली. चक्क साकोली कृषी उत्पन्न बाजार समिती असताना देखील कृषी उत्पन्न बाजार समिती लाखनी असे कार्यालयीन फलकावर नामकरण करण्यात आले. मूळ बाजार समिती ही साकोलीच्या नावाने असताना लाखनी नावाने नामकरण करून राजकारण करण्याचा पहिला राजकीय फटका साकोली तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सदस्यांना बसला. नव्हे एक वेळ असे म्हणता येईल की साकोली कृषी उत्पन्न बाजार समितिच्या संचालकाचा एक प्रकारे सभापती पदाचा गेम करण्यात आला. साकोली कृषी उत्पन्न बाजार समितीचे मूळ कार्यालय साकोलीत असताना साकोली तालुक्यातील कृषी समितीच्या संचालकांना सभापती पद न मिळणे ही साकोलीसाठी सध्या तरी शोकांतिका ठरलेली होती. दरवेळी लाखनी तालुक्यातील संचालक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती होत असतील तर साकोली तालुक्यातील संचालक सभापती पदासाठी सक्षम नाहीत का आणि ते सक्षम नसतील तर मग निवडून का येतात हा प्रश्न विचार करण्यासारखा होता. परिणामी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती पद तालुक्यातील संचालकासाठी एक प्रकारे अवलक्षण ठरलेले होते. आता मात्र गत ५३ वर्षांपासून सभापती पदाच्या वादावर पडदा पडणार असून फडणवीस सरकारच्या काळात हा तिढा सुटलेला आहे. स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समिती होत असल्याने तब्बल ५३ वर्षांपासून साकोली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकां-साठी हुलकावणी देत असलेले सभापती पद आता मात्र सोन्याच्या ताटात वाढून येत आहेत.

## ग्रामपंचायत आरक्षणासाठी सभा दिनांक ६ मे रोजी

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा, दि. ३० एप्रिल :** भंडारा तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींसाठी २०२५ ते २०३० या कालावधीसाठी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांसंदर्भात सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी ६ मे २०२५ रोजी दुपारी १२ वाजता तहसील कार्यालय, मुस्लीम लायब्ररी चौक भंडारा येथे सभा आयोजित करण्यात आली आहे. इच्छुक नागरिकांनी वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

RNI No.- MAHAMAR-2010/35801 महासागर भंडारा
मालक, मुद्रक, प्रकाशक - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर - १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. संपादक- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-सुरेश लक्ष्मण कोटगले, फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)




# महाराष्ट्र दिन चिरायू हो!

महाराष्ट्र दिन हा दिवस महाराष्ट्राच्या मराठी भाषिक राज्याच्या निर्मितीच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. १ मे १९६० रोजी झालेल्या मुंबई राज्याच्या विभाजनापासून महाराष्ट्र दिन हा सामान्यतः परेड आणि राजकीय भाषणे तसेच समारंभांशी संबंधित आहे. तसेच इतर विविध सार्वजनिक आणि खाजगी कार्यक्रमांबरोबरच महाराष्ट्राचा इतिहास आणि परंपरा या दिवशी साजरे करतात.

राज्य पुनर्रचना कायदा, १९५६ सार भाषांच्या आधारे भारतातील राज्यांसाठी सीमा परिभाषित केल्या गेल्या. या कायद्याचा परिणाम म्हणून जे मुंबई राज्य निर्माण झाले, ते मात्र वेगवेगळ्या मराठी, गुजराती, कच्छी आणि कोकणी भाषा बोलल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या क्षेत्रांचे मिळून बनले होते. संयुक्त महाराष्ट्र समिती मुंबई राज्याचे दोन राज्यात विभाजन करण्याच्या चळवळीत आघाडीवर होती. एक भाग जेथे लोक प्रामुख्याने गुजराती आणि कच्छी बोलतात आणि दुसरा भाग जेथे लोक प्रामुख्याने मराठी आणि कोकणी बोलतात.

२५ एप्रिल १९६० रोजी भारतीय संसदेने लागू केलेल्या बॉम्बे पुनर्रचना कायदा, १९६० नुसार या चळवळीचा परिणाम म्हणून महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांची निर्मिती झाली. हा कायदा १ मे १९६० रोजी अंमलात आला.



२१ नोव्हेंबर १९५६ दिवशी फ्लोरा फाउंटनच्या परिसरात तणावाचे वातावरण होते कारण राज्य पुनर्रचना आयोगाने महाराष्ट्राला मुंबई देण्याचे नाकारले त्यामुळे मराठी माणसे चिडली होती.

सर्वत्र छोट्यामोठ्या सभांमधून या निर्णयाचा निषेध होत होता. या संगठनामुळे कामगारांचा एक विशाल मोर्चा सरकारचा निषेध करण्यासाठी फ्लोरा फाऊंटनासमोरील चौकात येण्याचे नियोजन झाले. त्यानंतर प्रचंड जनसमुदाय एका बाजूने चर्चगेट स्थानकाकडून व दुसऱ्या बाजूने बोरीबंदरकडून गगनभेदी घोषणा देत, फ्लोरा फाउंटनकडे जमला. मोर्चा पोलिसी ताकद वापरून उधळून लावण्यासाठी लाठीचार्ज करण्यात आला.

मात्र अढळ सत्याग्रहीं मुळे पोलिसांचे हे प्रयत्न अयशस्वी झाले आणि पोलिसांना गोळीबाराचा आदेश मुंबई राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्याद्वारे देण्यात आला. गोळीबार झाला आणि संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात १०६ आंदोलक हुतात्मे झाले. या हुतात्म्यांच्या बलिदानामुळे व मराठी माणसाच्या आंदोलनामुळे सरकारने नमते घेऊन १ मे, १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना केली.

त्यानंतर १९६५ मध्ये त्या जागी हुतात्मा स्मारकाची उभारणी करण्यात आली. जय जय महाराष्ट्र माझा....गर्जा महाराष्ट्र माझा... .सर्व मराठी बांधवांना आणि महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाला महाराष्ट्र आणि कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



**प्रविण बागडे**
**नागपूर. 9923620919**
pravinbagde@gmail.com

*आम्हाला अभिमान आहे*
*महाराष्ट्रीय असण्याचा,*
*आम्हाला गर्व आहे*
*मराठी भाषेचा..*
*आम्ही जपतो*
*आमची संस्कृती,*
*आमची निष्ठा*
*आहे मातीशी...*

■ ■ ■

# कामगारांचा हक्काचा दिवस १ मे

१ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. जगभरातील कामगारांचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. केवळ भारतातच नाही तर जगभरातील ८० हुन अधिक देशात या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते.

१९ व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर जगभरातील कामगारांना रोजगार मिळू लागला. रोजगार मिळाला पण कामगारांची पिळवणूक मात्र वाढली.

कोणत्याही सुविधा न देता तुटपुंजी मजुरी देत कामगारांना १२ ते १४ तास राबवून घेण्यात येऊ लागले. त्यामुळे कामगारात असंतोष निर्माण झाला. या असंतोषातूनच कामगार एकत्र आले व कामगार संघटनांची निर्मिती झाली. या संघटनांनी कामगारांची पिळवणूक थांबवण्यासाठी काही ठराव केले. त्या ठरावात केलेल्या प्रमुख मागण्या

१) कायद्याने आठ तासांचा दिवस
२) लहान मुलांना कामावर लावण्यास बंदी
३) महिला कामगारांच्या कामावर मयार्दा
४) रात्रीचे व धोक्याचे काम यासाठी खास नियम
५) कायद्याने साप्ताहिक सुट्टी
६) कामाचा मोबदला वस्तूरूपाने न देता नगद द्यावा
७) समान कामासाठी समान वेतन

या मागण्या २१ एप्रिल १८५६ रोजी ऑस्ट्रेलियातील कामगारांकडून करण्यात आल्या. ऑस्ट्रेलियातील कामगारांच्या मागार्ने जात अमेरिका व कॅनडातील संघटनांनी १ मे १८८६ रोजी मोर्चे व धरणे आंदोलनाची सुरवात केली. अशाच एका मोचार्ला पांगवताना ४ मे १८८६ रोजी झालेल्या गोळीबारात १ आंदोलनकारी ठार झाला.

त्याचा निषेध म्हणून जगभरातील कामगार संघटना रस्त्यांवर उतरल्या. त्यात एका अज्ञात व्यक्तीने पोलिसांवर बॉब टाकला. यात ८ पोलीस मृत्यू पावले, तर ५० पोलीस जखमी झाले. या घटनेच्या स्मरणार्थ १ मे १८८९ रोजी आंतरराष्ट्रीय आंदोलनाचे आयोजन करण्याची मागणी रेमंड लेविन याने पॅरिस येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत केली.

त्या परिषदेत १ मे १८९० हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित झाले. १८९१ च्या दुसऱ्या परिषदेत १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याची औपचारिक घोषणा करण्यात आली. तेंव्हापासून १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून जगभरात उत्साहात साजरा केला जातो.

१ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय ऐक्याचा, स्वातंत्र्याचा, मानवाकडून मानवाचे होणा?या पिळवणुकीचा अंत करण्याचा प्रतीक बनला आहे. १९०५ च्या १ मे या कामगार दिनाच्या पत्रिकेत लेनिनने लिहिले आहे, कामगार - कामगारात, राष्ट्रा - राष्ट्रात, धर्मा - धर्मात असणारे शत्रुत्व नष्ट करा. या शत्रुत्वाने फक्त लुटारुंचा आणि जुलूमशहांचा फायदा होतो. कारण ते कामगार वर्गातील अज्ञातावर आणि दुफळीवरच जगत असतात. ज्यू आणि ख्रिश्चन, फिन आणि स्वीडिश, आमेर्नीयम आणि तातार, पोलिश आणि रशियन, लॅटिन आणि जर्मन असे सारे भेदभाव विसरून समाजवादाच्या झेंड्याखाली आपण सारे आगेकूच करूया.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

सर्व देशातील कामगारांची ही ऐक्य शक्ती आंतरराष्ट्रीय समाजवादाची संघशक्ती १ मे ला आपल्या दलाची पाहणी करते आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यासाठीचा लढा निधार्राने आणि अविचलपणे पुढे नेण्यासाठी आपले बळ संघटित करते.

लेनिनचा हा विचार घेऊन जगभरातील कामगार संघटना आज मार्गक्रमित करीत आहेत. आज जगभरातील कामगार संघटनांपुढे नवे आव्हाने आहेत. जागतिकीकरणाची लाट व २१ व्या शतकातील कामगारांचे प्रश्न, बदललेली परिस्थिती, मस्तवाल झालेले भांडवलदार या नव्या आव्हानांचा मुकाबला कामगार संघटनांना करावा लागणार आहे.



काळाचे हे आव्हान कामगार संघटनांनी स्वीकारले पाहिजे. जनतेच्या जगण्याला व कामगारांच्या हक्काला मिळालेले हे आव्हान आहे. याचा मुकाबला संघटित व असंघटित कामगारांच्या एकजुटीनेच होऊ शकतो. कामगार एकजुटीचा विजय असो! जगभरातील कामगारांना कामगार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

■ ■ ■

# कामगाराच्या श्रमाला तोड नाही

श्रम हे भांडवलाच्या आधीचे
आणि तसेच स्वतंत्र आहे.
भांडवल हे केवळ श्रमाचे फळ
आहे आणि जर श्रम आधी
अस्तित्वात नसते तर ते कधीही
अस्तित्वात आले नसते. श्रम हे
भांडवलापेक्षा श्रेष्ठ आहे आणि ते
अधिक उच्च विचारास पात्र आहे.
- अब्राहाम लिंकन

----------------

आज जिकडे तिकडे सहज नजर टाकली तर आपल्याला सर्वत्र मोठं मोठ्या इमारती, पुल, फ्लाय ओव्हर, मॉल व भव्यदिव्य इमारती दिसतात. विमानतळांची, रेल्वे स्थानकांची संख्या व विस्तार मोठ्या प्रमाणात झाल्याचा आढळतो आहे. कुठल्याही शहरात प्रवेश करतांना आपल्याला बायपास तर मोठ्या शहरात एक्सप्रेस वे दिसतो. प्रवास करतांना मग रेल्वे, बस, कार, आणि विमानातून असो आपल्याला सर्व शेती अगदी हिरवीगार पिकांसह डोलतांना आढळते. हे सर्व चित्र बघितल्या नंतर असं वाटत की ह्या पृथ्वीतलावर नंदनवन थाटलेले आहे आणि ही पृथ्वी सुजलाम सुफलाम आहे. सर्व नागरिक अगदी आनंदाने आपले जीवन जगत आहेत.

परंतु आपली सहज नजर शेतीतल्या झोपडीत जाते, पुलाखालच्या, फ्लाय ओव्हरच्या खाली कोपऱ्यात / कडेला झोपडीकडे जाते. मोठं-मोठ्या इमारतीच्या कडेला बांधकाम करणाऱ्या मजुरांकडे जाते. तर आपले मन मात्र खिन्न होते. जो शेतकरी आपल्या शेतात राब राब राबतो व त्याच्या राबल्याने आपल्या देशातील अन्नधान्याची कोठारे तुडुंब भरलेली आहेत. मॉल मध्ये अन्नधान्याची रेलचेल आहे. मात्र शेतकऱ्याची काय अवस्था आहे? त्याला दोन वेळचे जेवण सुद्धा नशीब नाही आहे, ना अंगावर कापड झाकायला आहे. तिच परिस्थिती इमारती बांधणाऱ्या कामगारांची आहे.

कामगार सामान्य जीवन जगण्यासाठी संघर्ष करीत आहे तर बिल्डर मात्र आपले जीवन ऐषोआरामात काढत आहेत. तेच चित्र रस्ते-महामार्ग बांधणाऱ्याचे आहे. कामगार, मजुर हालाखीचे जीवन जगत आहे. तर ठेकेदार आपले जीवन रुबाबात जगत आहेत. हे सर्व बघितल्यावर ज्या मजुराने इमारत बांधली आहे त्याच्या मुलाला मात्र अभिमान असेल तो म्हणत असेल इस बिल्डिंग की ईट मेरे माँ, बाप और मेरे रिश्तेदारने उठाई है ! काही मजुर सांगत पण असतील की ही इमारत (बिल्डिंग) आमच्या नातेवाईकाने किंवा मी बांधलेली आहे. परंतु दिवार मधल्या (विजय) अमिताभ बच्चन सारखे सगळेच मजुर काही इमारती विकत घेऊ शकणार नाहीत हे मात्र खरे आहे.

कामगार आणि मालक ह्यात नेहमीच तफावत राहिलेली आहे. कामगार हा गरीबच राहिलेला आहे तर मालक हा श्रीमंतच होत गेलेला आहे. ही दुरी कायमच राहिली आहे. उलट ही कमी होण्या ऐवजी ती अधिक वेगाने वाढत आहे. कामगारांची ही अवस्था सुधारण्यासाठी ब?याच समाज सुधारकांनी कार्य केले आहे. ह्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे खूप मोठे योगदान आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांनी १८८० मध्ये हाक दिली होती. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकऱ्यांचे न्याय, मागण्या व हक्कासाठी १९३५ मध्ये संपाची हाक दिली होती.



आपण दिल्ली येथे शेतकऱ्यांचा संप बघितला आहे. नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यात कांद्यासाठी होत असलेल्या संपाबद्दल आपल्याला माहिती आहे. कापसाचे शेतकऱ्यांचे आंदोलन आपणास माहित आहे. इतिहासाकडे बघितले तर एकंदरच कामगारांच्या उन्नतीसाठी सर्वांचीच अनास्था आढळते आहे. मालकाची मानसिकता असते की, कमी भावात मजुर भेटला पाहिजे. धनाढ्य शेती मालक नेहमीच म्हणत असतात आता मजुरी खूप वाढलेली आहे. आता शेती परवडत नाही. शेती कोणाला परवडत नाही मजुराला की मालकाला हा संशोधनाचा विषय आहे.

श्रम आणि भांडवल हे एकत्र आले की राष्ट्राची प्रगती होते. आत्ता प्रश्न हा पडतो की श्रम आणि भांडवल ह्यात काय महत्वाचे? श्रम मोठे की भांडवल? अगोदर कोणाची निर्मिती झाली? श्रमाची की भांडवलाची? अर्थातच श्रमाचीच. श्रम उदयाला आले, मानवाने खूप कष्ट केले उत्पादन झाले आणि अर्थातच भांडवलाची निर्मिती झाली. सर्वात आश्चर्याची बाब ही की श्रम अगोदर उदयास आले पण भांडवलाची निर्मिती नंतर होऊन सुद्धा आज जगत भांडवलाला अधिक महत्व आहे. भांडवलाला जो दर्जा किंवा मूल्य आहे ते श्रमाला आढळत नाही.

आज कामगाराला त्याच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळत नाही. किमान वेतनाचा कायदा असून सुद्धा त्याला किमान वेतन मिळत नाही. ही कामगाराची अवस्था आहे. कामगारांचे सर्वत्र शोषण होतांना दिसत आहे. सर्वत्र कंत्राटीकरणाचा बोलबाला आहे. कंत्राटीकरणात कामगारांना कमी वेतन आहे तर कंत्राटदारांना नफाच नफा आहे.

तसे बघितले तर कंत्राटीदार केवळ मलाई खातात. अल्प श्रमात कामगारांकडून काम करून घेतात व संस्थेला / कंपनीला जास्त मोलात कामगारांचे श्रम विकतात. कंत्रादाराचे ह्यात काहीच श्रम नसतात. केवळ मध्यस्थी म्हणून भूमिका निभावतात व नफेखोरी करतात. ह्या कंत्राटीकरणामुळे कामगारांना योग्य श्रमाचे दाम न मिळाल्यामुळे त्यांचे शोषण होते.

वास्तविक हा जो विश्वाचा डोलारा व्यवस्थित चालू आहे ते केवळ कामगारांच्या श्रमामुळेच. कामगारांचे शोषण थांबविल्या गेले पाहिजे. त्यांचे राहणीमान सुधारले पाहिजे तरच गुणवत्तापूर्ण उत्पादन होईल. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अगदी बरोबर म्हणाले होते 'ही पृथ्वी शेष नागाच्या फण्यावर नाही तर ही कामगारांच्या तळ हातांवर तरली आहे'. जेव्हा आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले तर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे म्हटले होते की, यह आझादी झूठी है, देश की जनता भुखी है ! खरोखर आज इतके वर्ष देश स्वातंत्र्य होऊन सुद्धा कामगारांना रोजगार नाही, किमान वेतन नाही असा हा कामगार कसा जगेल? कामगार खरोखर उपाशीच आहे. कामगार जगणे ही काळाची गरज आहे.



**अरविंद मोरे**
**नवीन पनवेल (पूर्व)**
**9820822882**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांसाठी खूप कायदे केले. बोनस कायदा, पी.एफ., ग्रॅज्युइटी, कामाचे आठ तास, ओव्हर टाइम, वैद्यकीय सुट्टी, बाळंतपणाची सुट्टी, २४० दिवसांचा अखंडित काम केल्याचा कायदा आदी. हे सर्व कायदे करून कामगारांना संरक्षण दिले. परंतु कायद्यात कामगार कसे बसू नयेत ह्यासाठी मालकाचे कामगारांवर आक्रमण होत आहे. त्यामुळे कामगार पिंजल्या जातो आहे.

कुठल्याच मालकाला कामगार संघटना नको आहेत. त्यांना मालकाला व सरकारला प्रश्न विचारणारा आवडत नाही. त्यांना सर्व कामगार ओझे वाटतात. वास्तविक कामगार काम करतात म्हणून राष्ट्राचे उत्पादन होते. तसे बघितले तर कामगारांचे हे विश्व आहे. ते खरे राष्ट्रनिर्माते आहेत.

१ मे ला महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. म्हणून आपण मोठ्या अभिमानाने 'महाराष्ट्र दिन' साजरा करतो. महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची स्थापना महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ नुसार करण्यात आली. मंडळातर्फे आर्थिक लाभाच्या योजना, सर्वसाधारण शिष्यवृत्ती, परदेश उच्चशिक्षण शिष्यवृत्ती, क्रीडा शिष्यवृत्ती, पाठयपुस्तक अर्थसहाय्य, गुणवंत विद्यार्थी गौरव, साहित्य प्रकाशन अनुदान, शिवण मशीन अनुदान योजना, गंभीर आजार उपचार अर्थसहाय्य, गुणवंत कामगार पुरस्कार, कामगार भूषण पुरस्कार व विविध २८ कामगारांसाठी उपक्रम राबविल्या जातात. त्यामुळे महाराष्ट्र राज्यात कामगारांना बळ मिळून प्रोत्साहन सुद्धा मिळते.

वास्तविक कामगाराच्या घामाच्या अंघोळीने आपला देश अविरतपणे घडतो आहे. आज गरज आहे कामगारांना त्याच्या श्रमाच्या योग्य मोबदला व त्यांना सन्मान देण्याचा. हे म्हणणे वावगे होणार नाही की, ईडा पिडा टळो कामगारांचे राज्य येवो. कामगार व महाराष्ट्र दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

■ ■ ■

# अखंडता व एकजुटीचे दर्शन हवे...

भारताचे नंदनवन असलेल्या काश्मीरमधे पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या निरपराध २६ पर्यटकांच्या हत्येने सारा देश हळहळला. बंदुकीचा धाक दाखवत पर्यटकांना नाव आणि धर्म विचारून दहशतवाद्यांनी समोरून अगदी जवळून त्यांच्या डोक्यात, छातीत गोळ्या घातल्या.

निसर्गाचा आनंद लुटायला आलेल्या परिवारासमोर २६ हिंदू पर्यटकांच्या रक्ताचा सडा पडला. पहलगामच्या या थरारक घटनने सारा देश हादरला. सर्वत्र संताप प्रकटला, दहशतवाद्यांना पोसणाऱ्या व भारतावर परोक्ष हल्ले घडविणाऱ्या पाकिस्तानला कायमची जबर अद्दल घडवावी, अशी देशातून मागणी होऊ लागली. पण दोनच दिवसानंतरच काँग्रेसने आपले खरे रंग दाखवायला सुरुवात केली.

काँग्रेस पक्षाचे काही नेते आणि सोशल मीडियावरील काही अतिशहाणे रोज पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपला टार्गेट करीत आहेत. काँग्रेस पक्षाच्या वाचाळ नेत्यांना आणि युट्यूबवरील मस्तवाल निवेदकांना पहलगाम हत्याकांडानंतर मोदी व भाजपावर हल्ले चढवायला जणू धारदार हत्यारच मिळाले आहे. देशवासीयांचे संरक्षण करायला मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे कसे अकार्यक्षम, अपयशी आणि कुचकामी ठरले आहेत, हे सांगण्याची काँग्रेस पक्षात व युट्यूबवर सध्या चढाओढ चालू आहे.

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या, सोनिया गांधींचे जावई व प्रियंका गांधींचे पती रॉबर्ट वड्रा, काँग्रेस नेते आर बी तिम्मापूर, मणिशंकर अय्यर, तारीक हमीद कारा, सैफुद्दीन सोज, महाराष्ट्रातील विजय वड्डेट्टीवार अशा वाचाळवीरांची नावे सर्व देशाला ठाऊक झाली आहेत. भाजपाने या नेत्यांना जाब विचारताच, काँग्रेसची भंबेरी उडाली. अखेर काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी खुलासा करून, पक्षाच्या नेत्यांची विधाने ही त्यांची वैयक्तिक मते आहे, ती पक्षाची भूमिका नाही, त्यांना पहलगाम हत्याकांडावर बोलण्याचा पक्षाने कोणताही अधिकार दिलेला नाही, असे स्पष्ट केले.

पहलगाममधे दहशतवाद्यांनी घडवलेले पाशवी व क्रूर हत्याकांड ही संवेदनशील घटना आहे. या संदर्भात पक्षाने पारीत केलेला प्रस्ताव, तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे व राहुल गांधी यांनी मांडली भूमिका ही काँग्रेसची अधिकृत भूमिका असेल. संवेदनशील विषयावर अन्य नेत्यांनी बोलण्याची गरज नाही, असेही जयराम रमेश यांनी म्हटले आहे.

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी म्हटले की, पाकिस्तानविरुद्ध युद्ध करण्याची गरज नाही. दहशतवादाला रोखण्यासाठी कठोर उपाय योजले पाहिजेत. युद्ध व्हावे असे आम्हाला वाटत नाही, शांतता तसेच सुरक्षा महत्त्वाची आहे... राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर तसेच देशाच्या सुरक्षा व्यवस्थेवर खरगे व राहुल गांधी बोलत असताना, सिद्धरामय्या यांना भूमिका मांडण्याची गरजच काय? ते एका राज्याचे मुख्यमंत्री आहेत, याचे भान ते विसरले असावेत.

आर. बी. तिम्मापूर म्हणाले, दहशतवादी हल्ला करीत होते, तेव्हा त्यांनी पर्यटकांना त्यांच्या धर्माबद्दल विचारले नव्हते. जरी विचारले असले तरी या मुद्दयाचे राजकारण करणे हा वेडेपणा आहे... मृतांचे परिवार दहशतवाद्यांनी नाव व धर्म विचारून हत्या केली असे सांगत आहेत. मग तिम्मापूर यांच्याकडे वेगळी माहिती कोठून आली?

विजय वड्डेट्टीवार यांनीही तसाच सूर लावला होता. ते म्हणाले, दहशवाद्यांकडे लोकांचा धर्म विचारायला वेळ तरी असतो का? भाजपाचे नेते, प्रवक्ते, स्वतः मुख्यमंत्र्यांनीही वडेट्टीवारांना चांगलेच फैलावर घेतले. मग वड्डेट्टीवारांनी सारवासारवी करीत माफी मागितली. आपले वक्तव्य अर्धवट दाखवले म्हणून त्यांनी माध्यमांनाच जबाबदार धरले.

माझे भाषण पूर्ण दाखवा, सरकारचे अपयश लपविण्यासाठी काहीतरी संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करू नका असे बजावले. दहशतवादी हल्ला करताना लोकांशी बोलतात का, त्यांच्या धमार्ची चौकशी करीत बसतात का? काही पर्यटक म्हणतात हल्लेखोरांनी धर्म विचारला. काही म्हणतात, असे काही घडलेच नाही... या वड्डेट्टीवारांच्या विधानावरून वाद निर्माण झाला.

तारीक हमीद कारा यांनी तर भारताने पाकिस्तानबरोबर चर्चा करायला हवी असा अनाहूत सल्ला सरकारला दिला आहे. फाळणीमुळे न सुटलेले प्रश्न म्हणजे पहलगाममधील दुर्घटनेचे प्रतिबिंब आहे का? अशी शंका मणिशंकर अय्यर यांनी बोलून दाखवली आहे. पहलगाममधील हल्ल्यात कोणताही सहभाग नाही, हे पाकिस्तानचे म्हणणे भारताने स्वीकारले पाहिजे असा सल्ला सैफुद्दीन सोझ यांनी दिला आहे.

**इंडिया कॉलिंग**
**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

जेव्हा २६/११ चा दहशतादी हल्ला झाला तेव्हा काँग्रेस पक्ष सत्तेवर होता. तेव्हा भाजपने वेगवेगळी वक्तव्ये करून सरकारला टार्गेट केले नव्हते. आम्ही सरकारबरोबर आहोत अशी भूमिका भाजपाने घेतली होती. दहशतवादी हल्ल्यानंतर देशाची एकजूट, अखंडता व एकता सर्व जगाला दिसली पाहिजे, या उलट काँग्रेसचे नेते रोज नवनवीन सल्ले सरकारला देत आहेत. जो सूज्ञपणा व पोक्तपणा व सामाजिक भान जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुला यांनी दाखवले, त्याच्या किंचितही १४० वर्षे वयाच्या काँग्रेस पक्षाकडे नाही असे चित्र देशाला दिसले.

पहलगाम हत्याकांडानंतर घटनेचे गांभीर्य ओळखून ओमर अब्दुल्ला यांनी जम्मू काश्मीर विधानसभेचे एक दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावले. विधानसभेत हत्याकांडात मरण पावलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ओमर अब्दुल्ला म्हणाले, राज्याचा मुख्यमंत्री म्हणून पर्यटकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी आपली होती.

त्यांच्या परिवाराची माफी कशी मागावी, यासाठी आपल्याकडे शब्द नाहीत. जम्मू-काश्मीरच्या सुरक्षिततेच्या जबाबदारी लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींची नाही. पण राज्याचा मुख्यमंत्री व पर्यटनमंत्री म्हणून आपण त्यांना इथे बोलावले होते. त्यांना आपण सुरक्षित परत पाठवू शकलो नाही याचे मला मोठे दुःख आहे. ज्या मुलांनी आपल्या पित्याला रक्ताच्या थारोळ्यात पडताना पाहिले, त्यांना मी काय सांगू शकतो? नुकताच विवाह झालेल्या पण विधवा झालेल्या नौदलाच्या अधिकाऱ्याच्या पत्नीचे मी कसे सांत्वन करू शकतो? काही जण तर प्रथमच काश्मीरला आले होते पण परत जाताना आपल्या घरातील कर्त्या पुरुषाची शवपेटी घेऊन गेले...

पहलगाममधील बैसरनमध्ये झालेला हल्ला हे २१ वर्षांनंतर काश्मीर खोऱ्यात निरपराध लोकांचे झालेले सर्वात मोठे हत्याकांड आहे. जम्मू-काश्मीर हा केंद्र शासित प्रदेश आहे. विधानसभा निवडणूक झाली असली तरी काश्मीरला राज्याचा पूर्ण अधिकार केंद्राने दिलेला नाही. सरहद्दीवरील संवेदनशील राज्य म्हणून तेथील सुरक्षा व्यवस्था केंद्र सरकारच्या हाती आहे. तरीही ओमर अब्दुला यांनी राज्याचा मुख्यमंत्री म्हणून हत्याकांडातील मृतांच्या कुटुंबीयांची माफी मागितली आहे. विशेष म्हणजे त्यांनी एका शब्दानेही केंद्र सरकारला दोष दिलेला नाही किंवा सुरक्षा दलाकडे बोट दाखवलेले नाही. ओमर अब्दुल्ला यांच्याकडे जो संयम, नम्रता आणि शहाणपणा दिसला तो काँग्रेसच्या नेत्यांना का दाखवता आला नाही ?

सोशल मीडिया विशेषतः युट्यूबवरून मोदी-शहांनाच पहलगाम हत्याकांडाविषयी दोष दिला जातो आहे. हत्याकांडात ज्यांच्या परिवारातील कर्ते पुरुष गेले, त्यांच्या घरी काय परिस्थिती आहे, याचा विचार त्यात कुठेही नाही. एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी पहलगाम घटनेचा वापर केला जातो आहे ही चिंतेची बाब आहे.

३२ वर्षांपूर्वी, दि. २५ जून १९८९ रोजी पंजाबमध्ये मोगा येथे खलिस्तानवाद्यांनी जवाहरलाल नेहरू पार्कमधील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेवर अंदाधुंद गोळीबार केला व त्यात २५ स्वयंसेवकांची हत्या झाली. पार्कमध्ये सकाळी फिरायला येणारे ३५ लोकही जखमी झाले होते. खलिस्तानवाद्यांनी संघाच्या शाखेवर ध्वज फडकवू नये असे सांगितले होते. पण ध्वज फडकवून संघाची शाखा भरल्याने त्याचा रक्तरंजित बदला दहशतवाद्यांनी घेतला.

मोगा हत्याकांडाने सारा देश हादरला होता. या घटनेनंतर दुसऱ्या दिवशी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व भाजपाचे नेते प्रमोद महाजन यांनी मुंबई मराठी पत्रकार संघात पत्रकार परिषद घेतली आणि महाराष्ट्र बंदची घोषणा केली. तेव्हा एका महिला पत्रकाराने शिवसेनाप्रमुखांना विचारले, महाराष्ट्र बंदमध्ये जर मुंबईत एका मोटारीवर दगड पडला तर...? त्यावर शिवसेनाप्रमुख म्हणाले, दहशतवाद्यांनी मोगा हत्यांकांडात २५ जणांना एकाच वेळी मारले आहे. हा देशाच्या एकतेवर अखंडतेवर घाला आहे. देश अखंड आहे व देशातील लोकं दहशवादाच्या विरोधात एकजूट आहे हे जगाला दाखविण्यासाठी आम्ही महाराष्ट्र बंद पुकारला आहे. त्या बंदमध्ये एखाद्या मोटारीवर दगड पडून काच तडकली तर बिघडले कुठे ?

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व भाजपा नेते प्रमोद महाजन हे दोघेही आज हयात नाहीत. पण पहलगाम येथील हत्याकांडाच्या निषेधार्थ देशाची एकजूट व अखंड भारताचे दर्शन घडविणारे कोणतेही नेतृत्व पुढे आणले नाही... म्हणूनच आज शिवसेनाप्रमुखांची आठवण होते...

■ ■ ■

# बुलढाणा जिल्ह्यातील तिघांना पोलीस महासंचालक पदक जाहीर



■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. ३० :
पोलीस विभागातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस महासंचालक पदक देण्यात येते. या वर्षासाठी बुलढाणा जिल्हा पोलीस दलातील तीन पोलीस कर्मचारी या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. त्यांना १ मे रोजी अर्थात महाराष्ट्र दिनी बुलढाणा येथे आयोजित मुख्य शासकीय समारंभात पालकमंत्री मकरंद पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

पोलीस महासंचालक पदकासाठी जिल्ह्यातील चिखली पोलीस ठाण्याचे ठाणेदार संग्राम पाटील, बुलढाणा सायबर पोलीस ठाण्यात कार्यरत तांत्रिक विश्लेषण विभागातील पोलिस हवालदार राजू आडवे व पोलिस नियंत्रण कक्षातील हवालदार सुनिल जाधव यांचा समावेश आहे. या तिघांना उल्लेखनीय सेवेबद्दल महाराष्ट्र पोलीस महासंचालक पदक जाहीर करण्यात आले आहे.

संग्राम पाटील यांनी गेल्या १५ वर्षांत पुणे ग्रामीण, बुलढाणा, अकोला, मुंबई आदी भागांत उत्कृष्ट सेवा बजावली असून त्यांच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. सध्या चिखली पोलीस ठाण्याचे ठाणेदार म्हणून ते कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी बुलढाणा जिल्ह्यातील धाड, धामणगाव बढे, साखरखेर्डा पोलीस ठाणे येथे ठाणेदार म्हणून काम केले आहे.

सायबर गुन्ह्याचे वाढते प्रमाण लक्षात घेता बुलढाण्यात काही वर्षांपूर्वी स्वतंत्र सायबर ठाणे कार्यान्वित करण्यात आले. तसेच तांत्रिक विश्लेषण कक्ष कार्यरत आहे. या कक्षात कार्यरत पोलीस हवालदार राजू आडवे यांनी सायबर गुन्हेच नव्हे तर पारंपरिक गुन्ह्यातील उकल करण्यात हातभार लावला आहे.

पोलीस नियंत्रण कक्षातील पोलीस हवालदार यांनी उत्कृष्ट सेवा दिली. याबद्धल ते पोलीस महासंचालक पदकाचे मानकरी ठरले आहे. राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी ही निवड केली आहे.

या सन्मानासाठी जिल्हाभरातून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे. बुलढाणा येथील पोलीस मुख्यालय परिसरातील पोलीस कवायत मैदानात गुरुवार १ मे रोजी सकाळी ९ वाजता हा सोहळा पार पडणार आहे.

# माजी आमदार रामदास आंबटकर यांचे उपचारादरम्यान निधन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :
भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार डॉ. रामदास आंबटकर यांचे आज चेन्नई येथील महात्मा गांधी मेडिकल मिशन हॉस्पिटल मध्ये उपचारादरम्यान निधन झाले. ते ६४ वर्षांचे होते.

किडनीच्या आजारामुळे त्यांच्यावर काही दिवसांपासून उपचार सुरू होते. त्यांनी संघाच्या कामातूनच राजकारणात प्रवेश केला आणि विधान परिषदेवर निवडून येत आमदार म्हणून कार्य केले.

डॉ. रामदास आंबटकर यांचा जन्म १ जूलै १९६० रोजी वडनेर, वर्धा येथे झाला. त्यांच्या वडिलांनी सलग तीन वेळा भाजप जिल्हाध्यक्ष म्हणून काम पाहिले आणि संपूर्ण आयुष्यभर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांची शिकवण रुजवली.

डॉ. रामदास आंबटकर यांना लहानपणापासून वडिलांपासून मिळालेल्या प्रेरणेतून राष्ट्र उभारणीसाठी आणि लोकसेवेसाठी स्वतःचे जीवन समर्पित करण्याचा निर्णय घेतला. शालेय जीवनात असतानाच, १९६५ साली ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघात सामील झाले आणि तेव्हापासून त्यांनी संघाचे कार्य सातत्याने आणि निष्ठेने केले.

डॉ. आंबटकर हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जुने कार्यकर्ते होते आणि विद्यार्थी जीवनातच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात उतरल्यानंतर त्यांनी भाजपच्या माध्यमातून राजकीय वाटचाल सुरू केली.

२००४ मध्ये त्यांनी अधिकृतपणे भाजपमध्ये प्रवेश केला आणि पक्षाच्या विविध संघटनात्मक जबाबदाऱ्या यशस्वीरीत्या पार पाडल्या. २०१८ मध्ये ते वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेवर निवडून आले होते.

केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांनी रामदास आंबटकर यांच्या निधनानंतर अतिशय दुःख झाल्याची प्रतिक्रिया दिली. त्यांनी सोशल मीडियावर आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. माजी आमदार डॉ. रामदास आंबटकर यांच्या निधनाचे वृत्त ऐकून अतिशय दुःख झाले. विदर्भात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि भाजपचे संघटन मजबूत करण्यासाठी रामदासजींनी कठोर परिश्रम घेतले. विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या हितासाठी त्यांनी कायम आवाज उठवला. कुशल संघटक आणि विचारधारेप्रती कायम समर्पित असलेल्या रामदास आंबटकर यांच्या निधनाने सामाजिक-राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. ईश्वर दिवंगत आत्म्यास शांती देवो. ॐ शांती, असे गडकरी यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस अखेर 'वर्षा' बंगल्यावर



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि. ३० :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बुधवारी अखेर अक्षय्य तृतीयेचे मुहूर्त साधत वर्षा या मुख्यमंत्र्यांच्या अधिकृत शासकीय निवासस्थानी राहण्यासाठी गेलेत.

देवेंद्र फडणवीस यांनी गतवर्षी ५ डिसेंबर रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून पद व गोपनीयतेची शपथ घेतली होती. पण तेव्हापासून ते 'सागर' या आपल्या जुन्याच निवासस्थानी राहत होते. कारण, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वर्षा बंगला सोडला नव्हता. त्यामुळे मुख्यमंत्री वर्षा बंगल्यावर केव्हा राहण्यास जाणार? असा प्रश्न सातत्याने विरोधकांकडून उपस्थित केला जात होता. अखेर अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर फडणवीस यांनी वर्षा बंगल्यात सपत्नीक गृहप्रवेश केला. अमृता फडणवीस यांनी एका पोस्टद्वारे या गृहप्रवेशाची माहिती दिली. तसेच काही फोटोही शेअर केले.

आजच्या शुभमुहूर्तावर वर्षा या निवासस्थानी आम्ही छोटीशी पूजा संपन्न करीत गृहप्रवेश केला. आमची सुकन्या दिविजा ही १० वी च्या बोर्ड परीक्षेत ९२.६० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे, असे अमृता फडणवीस यांनी एका पोस्टद्वारे सांगितले आहे.



■ नागपूर : अक्षय तृतियेला सोने खरेदीसाठी महिलांची मोठी गर्दी उसळते. आज अक्षय तृतियेचा शुभ मुहूर्त साधून नागपूर येथे सोने खरेदीसाठी सराफा दुकानात महिलांची प्रचंड गर्दी झाल्याचे दिसून आले.

# कॅबिनेट मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांवर गुन्हा दाखल

## साखर कारखान्यात ९ कोटींचा अपहार केल्याचा गंभीर आरोप



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि. ३० :
राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अडचणींमध्ये वाढ झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के आणि इतर ५४ जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाल्याने जिल्ह्याच्या राजकीय वतुर्ळात खळबळ माजली आहे. साखर कारखान्याच्या कर्जमाफी प्रकरणात ९ कोटी रुपयांच्या कथित अपहाराच्या प्रकरणी लोणी पोलिस ठाण्यात ही तक्रार नोंदवण्यात आली आहे.

शेतकऱ्यांच्या नावावर राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्ज घेऊन शेतकऱ्यांना वितरित न केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. २००४-२००५ आणि २००७ साली अपहार केल्याचे फियार्दीत नमूद केले आहे. तसेच कारखान्याच्या तत्कालीन संचालक मंडळावर गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी प्रवरा कारखान्याचे सभासद बाळासाहेब केरूनाथ विखे यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

त्यानुसार सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राधाकृष्ण विखे पाटलांसह ५४ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राधाकृष्ण विखे पाटील हे राज्यातील नेते तसेच कॅबिनेट मंत्री आहेत, त्यामुळे पोलिस त्यांच्या विरोधात तक्रार दाखल करून घेण्यास टाळाटाळ करत होते. त्यामुळे तक्रारदार बाळासाहेब केरूनाथ विखे यांनी राहता येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांच्या न्यायालयात फिर्याद दाखल केली होती. येथील न्यायालयाने फिर्यादीची चौकशी करून सर्व संचालकांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश दिले होते. परंतु विखे पाटलांनी औरंगाबाद खंडपीठात दाद मागितली तेव्हा औरंगाबाद उच्च न्यायालयाने न्यायालयाचा आदेश अमान्य केला होता.

यानंतर बाळासाहेब विखे यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाचा निकाल ग्राह्य धरत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह ५४ जणांवर गुन्हा दाखल करत चौकशीचे आदेश दिले आहेत.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर विरोधकांनी विखे पाटील यांच्यासह महायुती सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. विखे पाटलांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे.

: लोक सेवार्थ :

# गरिबांना मोफत अन्नदान करणारे अक्षय चैतन्यचे महास्वयंपाकघर!



लोकजागर

मुंबईत सर्वाधिक श्रीमंत लोक राहत असले तरी याच शहरात हजारो लोकांना भुकेलं झोपावं लागतं. नेमकी हीच गंभीर बाब ध्यानात घेऊन अक्षय चैतन्य या सेवाभावी संस्थेने भायखळ्यात महास्वयंपाकघर उभारले आहे. या महास्वयंपाक घरात दररोज तब्बल 25 हजार गरजू लोकांसाठी मोफत जेवण बनवले जाणार आहे. त्यामुळे या मायानगरीत आता कुणीही उपाशी झोपणार नाही.

कोणत्याही दिवशी तब्बल 25 हजार लोकांना जेवण देऊ शकेल अशा क्षमतेच्या या संस्थेच्या केंद्रीय स्वयंपाकघराचे (सेंट्रलाइज्ड किचन) उद्घाटन राज्याचे माजी पर्यटन व पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या हस्ते झाले होते . सरकारी रुग्णालयांमध्ये उपचारार्थ दाखल रुग्णांच्या नातेवाईकांना उपाशी रहावं लागू नये, यासाठी मुंबईतील अक्षय चैतन्य ही सेवाभावी संस्था कौतुकास्पद कार्य करत आहे.

संस्थेच्या केंद्रापासून १० मैल त्रिज्येच्या परिसरात कुणीही उपाशी राहणार नाही, ही या संस्थेची शपथ प्रत्यक्षात उतरत आहे. हरे कृष्ण मूव्हमेंट चॅरिटेबल फाऊंडेशनचा उपक्रम असलेल्या अक्षय चैतन्यने मुंबई महानगरपालिका आणि राज्याचे वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांच्यासोबत समन्वय साधून भूकमुक्तीसाठीच्या अन्नदानाचा हा उपक्रम राबवला जाणार आहे. गरिबांना किमान डाळ, भात, भाजी आणि पोळी असा मुलभूत आहार देऊन त्यांना जगविण्याचा संस्थेचा उदात्त असा उद्देश आहे.

रुग्णालयांतील केवळ रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांसाठीच नव्हे, तर स्थलांतरीत मजूर, झोपडपट्ट्यांमध्ये राहणारे गोरगरीब यांनाही जेवण दिले जाणार आहे. मनपाच्या शाळेमध्ये शिकणारी अनेक मुल पौष्टिक खान्याभावी कुपोषित असतात अशा बालकांना पौष्टिक अन्न पुरविणे आणि देशाची भावी सुदृढ पिढी घडविणे हा हेतू आहे, अशी माहिती अक्षय चैतन्यचे सीईओ विकास परछंदा यांनी दिली.

हैदराबादमध्ये अशाच प्रकारचे विविध सामाजिक उपक्रम यशस्वीपणे राबवून संस्थेने हैदराबादला भूकमुक्त केले आहे. संस्थेच्या हैदराबादमधील केंद्रीय कम्युनिटी किचनची क्षमता दररोज ५० हजार लोकांना जेवण पुरवण्याइतकी आहे. संस्थेमार्फत ह्यस्वस्थ आहारह्न हा कार्यक्रमही राबवण्यात येतो, ज्या अंतर्गत हैदराबादमधील ४०० सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांना दररोज बाजरी आदी भरड धान्याचा नाश्ता पुरवला जातो. याच धर्तीवर आता मुंबईतील गोरगरीब- गरजू कुटुंबांतील व्यक्तींना, रुग्णांच्या नातेवाईकांना तसंच बालकांना पोषक जेवण मोफत उपलब्ध करुन देण्याचा अक्षय चैतन्यचा निर्धार आहे.

■ ■ ■

शून्यातून विश्व

# तुपाच्या व्यवसायातून तरुण करोडपती



देशातील अनेक तरुण सध्या शेतीकडे वळत आहेत. अशाच तरुण शेतकऱ्याची यशोगाथा पाहणार आहोत. ज्याने आपल्या शेतीला जोडून केवळ तीन हजार रुपये गुंतवणूकीतून व्यवसायाला सुरुवात केली. मात्र, आज तो आपल्या व्यवसायातून वर्षाला कोट्यवधी रुपये कमावत आहे. तरुण उद्योजक भावेश चौधरी असे या तरुण शेतकऱ्याचे नाव असून, तो हरियाणाचा आहे.

उच्च शिक्षण घेतल्यानंतर भावेश याने सरकारी नोकरीसाठी प्रयत्न केले. मात्र, यश आले नाही. त्याने कसुतम बिलोना घी नावाचा व्यवसाय सुरू केला. पारंपारिक पद्धतीचा वापर करून बनवलेले तूप विकून त्यांनी करोडोंचा यशस्वी व्यवसाय उभा केला आहे. भावेश याने केवळ तीन हजार रुपयांच्या गुंतवणुकीतून या व्यवसायाला सुरुवात केली. आज कोट्यवधींचा व्यवसाय आहे.

भावेश यांच्या कुटुंबातील बहुतांश लोक लष्करात आहेत. त्यांना सैन्यात भरती होण्यासही सांगण्यात आले. अभ्यास सोडून पैसे उधळण्याचे टोमणेही त्याला ऐकावे लागले. भावेशने बीएससीला प्रवेश घेतला, पण शिक्षण अर्धवट सोडावे लागले. भावेश यांना शुद्ध देशी तुपाच्या व्यवसायाची कल्पना सुचली. पॅकेजिंगचे ज्ञान आणि मार्केटिंगचे ज्ञान नसल्याने त्याला अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. यूट्यूबची मदत घेत त्याने आईचे गावातील शुद्ध तूप बनवतानाचे व्हिडिओ सोशल मीडियावर अपलोड करण्यास सुरुवात केली. इतकेच नाही तर तो इतरांच्या पोस्टवर जाऊन आपला नंबर द्यायचा. इथे तुम्हाला शुद्ध तूप मिळेल, अशा आशयाने तो मार्केटिंग करू लागला. त्यातूनच हळूहळू त्याच्या शुद्ध देशी तुपाची मागणी वाढू लागली.

आज तो शुद्ध देशी तुपाचा करोडोंचा व्यवसाय करत आहे.भावेश हा बिलोना पद्धतीने अ 2 गायीच्या दुधापासून तूप बनवण्यास सुरुवात केली. सोशल मीडियाच्या माध्यमातून त्याला अवघ्या आठवडाभरात पहिली ऑर्डर मिळाली. या ऑर्डरमधून त्याला ११२५ रुपये मिळाले. ही त्यांच्या यशस्वी प्रवासाची सुरुवात होती.

आज भावेशने आपल्या मेहनतीने आणि चिकाटीने १५,००० हून अधिक ग्राहकांचा विश्वास जिंकला आहे. आज त्याच्या तुपाला देशभरात मागणी आहे. त्यांना दर महिन्याला ७० लाख रुपये उत्पन्न मिळत आहेत. आज भावेश व्यवसाय तब्बल आठ कोटींपर्यंत पोहोचला आहे. त्याला वर्षाला तब्बल १ कोटींची कमाई होत आहे. ■ ■

**शब्दार्थ**

CID

Crime investigation department म्हणजेच सीआयडी होय. सीआयडी चा जन्म हा फार जुना आहे. 1902 साली ब्रिटिश राजवटीमध्ये उकऌची स्थापना करण्यात आली. देशामध्ये कायदा व सुव्यवस्था टिकवणे हा याचा मुख्य उद्देश होता.आपल्या महाराष्ट्रातील पुणे येथे सीआयडी चे मुख्यालय आहे. CID हे असं विभाग आहे जिथे गुन्ह्यांची पडताळणी अगदी गुप्त पद्धतीने होते. पोलिसांसारखा किंवा आर्मी सारखा सीआयडी ऑफिसर्सला कोणताही स्पेशल युनिफॉर्म नसतो, ते सिव्हिल युनिफॉर्म मध्येच गुन्हेगारांना पकडतात.

■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# ऐतिहासिक निर्णय : शिंदे



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि. ३० :
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने घेतलेल्या जातनिहाय जनगणनेच्या ऐतिहासिक निर्णयाचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुक्तकंठाने स्वागत केले आहे.

महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला मिळालेली ही घोषणा म्हणजे देशाला मिळालेली सामाजिक न्यायाची अनमोल भेट असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

जातनिहाय जनगणनेच्या मागे अनेक वर्षांचा संघर्ष आहे. पण कॉंग्रेसने नेहमीच या मुद्द्यावर तोंडदेखली भूमिका घेतली. स्वतःच्या राजवटीत असा निर्णय घेण्याची हिंमत त्यांनी दाखवली नाही. मात्र पंतप्रधान मोदींनी निवडणूक, मतांचे गणित न पाहता हा निर्णय घेतला आहे, हे धाडसाचे प्रतीक आहे, असे ते म्हणाले.

मोदी सरकारने 370 कलम हटवून काश्मीरला मुख्य प्रवाहात आणले, नारीशक्ती वंदन विधेयक, वक्फ बोर्ड सुधारणा यांसारखे निर्णय घेतले आणि आता जातनिहाय जनगणना जाहीर करून सामाजिक न्यायाची दिशा स्पष्ट केली आहे, जातनिहाय जनगणनेमुळे देशातील प्रत्येक घटकाचे वास्तव स्पष्ट होईल आणि समाजघटकांमध्ये समतेचा विचार अधिक दृढ होईल. यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकार होईल, असेही शिंदे म्हणाले. शिवसेनेतर्फे आम्ही केंद्र सरकारचे अभिनंदन करतो आणि या निर्णयाला संपूर्ण पाठिंबा देतो, असे त्यांनी सांगितले.

## समतेचा विचार बळकट होईल...

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि. ३० :
केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना घेण्याच्या निर्णयाला मंजुरी दिल्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. हा निर्णय ऐतिहासिक असून यामुळे देशातील समतेचा विचार अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून जातनिहाय जनगणनेची मागणी सातत्याने होत होती. समाजातील विविध घटकांचे अचूक सामाजिक आणि आर्थिक चित्र समोर यावे, त्यांच्या गरजा समजून सरकारने योजनांची आखणी करावी यासाठी ही जनगणना अत्यावश्यक असल्याचे शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सांगितले.

# मुंबईच्या पोलीस आयुक्तपदी देवेन भारती

## विवेक फणसाळकर यांची जागा घेणार



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई,दि. ३० :
मुंबईच्या पोलिस आयुक्तपदी वरिष्ठ पोलिस अधिकारी देवेन भारतीय यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते मावळते पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर यांची जागा घेतील. फणसाळकर आज पोलिस दलातून निवृत्त होणार आहेत.

देवेन भारती हे 1994 च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. ते सध्या मुंबईचे विशेष पोलिस आयुक्त आहेत. त्यांनी 30 जून 2022 रोजी या पदाची सूत्रे स्वीकारली होती. सरकारने बुधवारी जारी केलेल्या एका आदेशानुसार, त्यांची आता मुंबईच्या पोलिस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

विद्यमान पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर हे आज आपल्या 2 वर्षांच्या कारकिर्दीनंतर मुंबईच्या पोलिस आयुक्तपदावरून निवृत्त होणार आहेत. देवेन भारती हे त्यांच्याकडून आपल्या नव्या जबाबदारीची सूत्रे स्वीकारतील. उल्लेखनीय बाब म्हणजे मुंबईचे पोलिस आयुक्तपद हे पोलिस दलात अत्यंत मानाचे मानले जाते. त्यामुळे विवेक फणसाळकर यांच्या निवृत्तीनंतर हे पद कुणाला मिळणार? याकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले होते.

या प्रकरणी वरिष्ठ पोलिस अधिकारी सदानंद दाते, संजयकुमार वर्मा, रितेश कुमार, महिला पोलिस अधिकारी अर्चना त्यागी आदी बड्या पोलिस अधिका?यांची नावे चर्चेत होती. पण देवेन भारती यांनी या सर्वांवर वरचढ ठरले.

55 वर्षीय देवेन भारती हे मूळचे बिहारच्या दरभंगा येथील आहेत. त्यांनी झारखंड येथून मॅट्रिक केली. त्यानंतर दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून पदवीचे शिक्षण घेतले. त्यांनी मुंबईत डीसीपी, झोन-9 व डीसीबी गुन्हे शाखा म्हणूनही काम केले आहे. त्यांनी अतिरिक्त पोलिस आयुक्त, गुन्हे शाखा व त्यानंतर सह पोलिस आयुक्त (कायदा सुव्यवस्था) पदावरही काम केले आहे.

ते पोलिस महानिरीक्षक (कायदा सुव्यवस्था) व महाराष्ट्र एटीएसचेही प्रमुख होते. तत्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या काळात त्यांची बदली राज्य सुरक्षा महामंडळात अतिरिक्त महासंचालक म्हणून करण्यात आली होती. 1994 च्या बॅचचे आयपीएस अधिकारी असणारे देवेन भारती हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय मानले जातात.

# सामाजिक समतेसाठी क्रांतीकारी पाऊल : अजित पवार



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि. ३० :
केंद्र सरकारने आगामी जनगणनेत जातनिहाय जनगणना करण्याचा घेतलेल्या निर्णयाचे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर स्वागत केले आहे. या निर्णयामुळे सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे ध्येय वेगाने साध्य होईल आणि भविष्यात जातव्यवस्था संपुष्टात येण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, या क्रांतीकारी निर्णयासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि संपूर्ण केंद्रीय मंत्रिमंडळाचे त्यांनी आभार मानले आहेत.

जातनिहाय जनगणनेच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयावर प्रतिक्रिया देताना अजित पवार म्हणाले, हा निर्णय सामाजिकदृष्ट्या दुर्बल, वंचित आणि उपेक्षित समाजघटकांच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. यामुळे सरकारला मागास समाजघटकांसाठी अधिक निधी देऊन त्यांचा शैक्षणिक आणि आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होईल. सर्व समाजघटकांना त्यांचा न्याय्य हक्क मिळेल आणि सामाजिक समतेच्या दिशेने एक मोठे पाऊल पडेल. या निर्णयाला त्यांनी सामाजिक समतेसाठी केंद्र सरकारने टाकलेले क्रांतीकारी पाऊल असे संबोधले.

पवार पुढे म्हणाले, गेल्या अनेक दशकांपासून अनेक व्यक्ती, संस्था आणि संघटना जातनिहाय जनगणनेची मागणी करत होत्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्यासारख्या संवेदनशील नेतृत्वामुळे ही मागणी पूर्ण झाली. आतापर्यंत अनुसूचित जाती, जमाती वगळता इतर जातींची आर्थिक आणि सामाजिक माहिती उपलब्ध नव्हती, ज्याचा फटका ओबीसींसह इतर समाजघटकांना बसत होता. आता या निर्णयामुळे केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना योग्य समाजघटकांपर्यंत पोहोचतील आणि सर्वांना समान संधी मिळतील. यामुळे भविष्यात जातव्यवस्था संपुष्टात येण्यासही मदत होईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. या निर्णयामुळे सामाजिक समतेसाठी नवे दालन खुले होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.